CMYK


सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ६ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ९० | पाने १२ | किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### विक्रमी तेजीनंतर बाजारांत घसरण

**मुंबई :** मंगळवारच्या तेजीनंतर बुधवारी देशांतर्गत शेअर बाजारांत घसरण नोंदविण्यात आली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ३१२ अंकांनी खाली आला, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ४२ अंकांनी घसरून २३,६९६ वर बंद झाला. निफ्टीतील हिंदाल्कोचे शेअर्स सर्वाधिक २.९० टक्क्यांनी वधारले. त्यापाठोपाठ आयटीसी, ओएनजीसी, अपोलो हॉस्पिटल आणि बीपीसीएल हे शेअर्स वाढले होते. याशिवाय सर्वाधिक घसरण एशियन पेंट्समध्ये नोंदविण्यात आली. निर्देशांकातील एकूण बाजार भांडवल ४२७.१२ लाख कोटी रुपये झाले. म्हणजेच भांडवलात १.६२ लाख कोटींची भर पडली.



### रुपयाची घसरगुंडी सुरूच

**नवी दिल्ली :** भारतीय चलन म्हणजेच रुपया पुन्हा एकदा त्याच्या सर्वकालीन विक्रमी नीचांकी पोहोचला आहे. बुधवारी व्यापारादरम्यान, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत तो २५ पैशांनी घसरून ८७.३७ च्या पातळीवर पोहोचला. ही रुपयाची सर्वांत कमी पातळी आहे. सोमवारी याआधी तो ६७ पैशांनी घसरून ८७.२९ वर पोहोचला होता. रुपया घसरण्याच्या प्रमुख कारणांमध्ये व्यापारी तूट, चालू खात्यातील तूट, अमेरिकी राष्ट्राध्यक्षांचे टेरिफबाबतचे धोरण आदी मुद्यांचा समावेश आहे.

### आरबीआय पतधोरण आढावा समितीची बैठक सुरू

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँक म्हणजेच आरबीआयच्या पतधोरण आढावा समितीची बैठक बुधवारपासून सुरू झाली. ही तीन दिवसांची बैठक ७ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहील. रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत व्याजदराचा निर्णय घेतला जाईल. त्यांच्या अध्यक्षतेखाली ही पहिलीच बैठक आहे. आरबीआयने रेपो दर ६.५ टक्क्यांवर कायम ठेवला आहे. यावेळी याविषयी काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### एटीएममधून पैसे काढणे महागणार?

**नवी दिल्ली :** एटीएममधून पैसे काढण्याचे शुल्क वाढण्याची शक्यता आहे. बँकांद्वारे पाच मोफत व्यवहार मर्यादेपेक्षा जास्त व्यवहार करणाऱ्या ग्राहकांकडून जास्त शुल्क आणि एटीएम इंटरचेंज शुल्क वाढविण्याची रिझर्व्ह बँकेची योजना आहे. शुल्कवाढ झाल्यास एटीएममधून पैसे काढणे महाग होईल. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने पाच मोफत व्यवहार मर्यादा संपल्यानंतर कमाल रोख व्यवहार शुल्क हे सध्याच्या २१ रुपये प्रती व्यवहारावरून २२ रुपये करण्याची शिफारस केली आहे.

### स्पेनमध्ये कामाचे तास कमी करण्याचा प्रस्ताव

**वॉशिंग्टन :** स्पॅनिश सरकारने कर्मचाऱ्यांचे कामाचे तास आठवड्यातून कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. नुकत्याच झालेल्या साप्ताहिक मंत्रिमंडळ बैठकीत कामगार मंत्री योलांडा डियाझ यांनी हा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावात, आठवड्याला कामाचे तास ४० वरून ३७.५ तासांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### १२ वे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन जयसिंगपूरला

**वर्धा :** १२ वे अखिल भारतीय म राठी शेतकरी साहित्य सेंलन आयोजित करण्यात आले आहे. हे सेंलन शनिवार ८ व रविवार ९ फेब्रुवारीला युगात्मा शरद जोशी विद्यानगरी सहकारम हर्षी श्यामराव पाटील यड्रावकर नाट्यगृह जयसिंगपूर, जि. कोल्हापूर येथे होणार आहे. नवसाहित्यिकांना सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या शेती अर्थशास्त्र, अनर्थशास्त्र व नवतंत्रज्ञानाविषयीच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी, मराठी साहित्य-सारस्वतांची कृषिउद्योग जगतासोबत सांगड घालून त्यांना कर्तव्यपूर्तीसाठी प्रेरित करण्यासाठी आणि लेखणीच्या माध्यमातून शेतीची दुर्दशा थांबवून शेतकऱ्यांच्या आयुष्यात सुखाचे व सन्मानाचे दिवस खेचून आणण्याइतपत शक्तिशाली सृजनशील साहित्यिकांची नवीन पिढी निर्माण करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न म्हणून या सं ेलनाचे आयोजन करण्यात आहे. सं ेलनाध्यक्षपद ज्येष्ठ शेतकरी नेत्या, माजी आमदार तथा लेखिका सरोज काशीकर भूषविणार आहेत.

# दिल्ली भाजपाचीच!

## आपला 'जोरका' झटका

## काँग्रेसला पुन्हा दिल्लीकरांनी नाकारले

## सर्वच एक्झिट पोलने दिल्लीची सत्ता दिली भाजपाकडे

| | मॅट्रिझ | चाणक्य स्ट्रॅटेजीज | पोल डायरी | पीपल्स इन्साईट | पी मार्क | जेव्हीसी |
|---|---|---|---|---|---|---|
| भाजपा | ३५-४० | ३९-४४ | ४२-५० | ४०-४४ | ३९-४४ | ३९-४५ |
| आप | ३२-३७ | २५-२८ | १८-२५ | २५-२८ | २१-३१ | २२-३९ |
| काँग्रेस | ००-०१ | २-३ | ०-२ | ०-१ | ०-१ | ०-२ |

**नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

मागील १२ वर्षांपासून सत्तेत असलेल्या आम आदमी पार्टीला विशेषतः या पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांना यावेळी दिल्लीकरांनी धक्का देण्याचे ठरविले असल्याचे बहुतेक सर्वच एक्झिट पोलच्या निकालांवरून स्पष्ट झाले आहे. गेल्या २७ वर्षांपासून सत्तेबाहेर असलेल्या भाजपाकडे दिल्लीच्या सत्तेची किल्ली सोपविण्याचे मन दिल्लीकरांनी बनविले असल्याचेही यातून दिसून आले आहे. तिथेच, काँग्रेस खातेही उघडण्याच्या स्थितीत दिसत नसल्याचे पोल पंडितांचे मत आहे.

दिल्ली विधानसभेच्या मतदानाची प्रक्रिया पूर्ण होताच विविध वृत्तवाहिन्यांनी त्यांच्या एक्झिट पोलचे निकाल जाहीर केले.



मतदान केल्यानंतर बोटावरील शाई दाखवताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

यात सर्वच वृत्तवाहिन्यांनी भाजपाला स्पष्ट बहुमत दिले आहे. भाजपा ४० ते ५० जागांसह दिल्लीत सत्तेत येणार असल्याचे भाकीत त्यांनी व्यक्त केले आहे. मुख्यमंत्रिपदासाठी बाशिंग बांधून तयार असलेल्या केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीला दिल्लीकरांनी नाकारल्याचे एक्झिट पोलमध्ये दिसत आहे. केजरीवाल यांना पराभवाची जाणीव आधीच झाली होती. म्हणून त्यांनी मागील काही दिवसांपासून भाजपा आणि काँग्रेसवर अनेक गंभीर आरोप करीत वारंवार निवडणूक आयोगाची भेट घेतली होती. मतदानाच्या आदल्या रात्रीच अनेक मतदारांच्या बोटांवर शाई लावली जाईल आणि त्यांच्या ऐवजी बोगस मतदार मतदान करतील, असा आरोपही त्यांनी केला होता. (वृत्तसंस्था)

# भगवे वस्त्र, रुद्राक्ष परिधान करून पंतप्रधान मोदींचे महाकुंभात स्नान

### सूर्याला अर्घ्य, माता गंगेला साडी अर्पण



### शांती, समाधान मिळाले

संगममध्ये स्नान केल्यानंतर पंतप्रधान मोदींनी समाज माध्यमांवर पोस्ट केले. ते म्हणाले, आज महाकुंभातील पवित्र संगमात स्नान केल्यानंतर पूजा करण्याचे परम भाग्य लाभले. गंगा मातेचा आशीर्वाद मिळाल्याने मनाला अपार शांती आणि समाधान मिळाले आहे. सर्व देशवासीयांच्या आनंद, समृद्धी, आरोग्य आणि कल्याणासाठी शुभेच्छा. महाकुंभातील श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा संगम सर्वांनाच भारावून टाकतो.

**प्रयागराज, ५ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी प्रयागराजमधील संगमात स्नान केले. त्यांनी भगव्या रंगाचे कपडे घातले होते. हातात आणि गळ्यात रुद्राक्षाच्या माळा होत्या. मंत्रोच्चाराच्या दरम्यान, मोदींनी संगमात स्नान केले.

स्नानानंतर, पंतप्रधानांनी सूर्याला अर्घ्य अर्पण केले. सुमारे पाच मिनिटे मंत्र जप करून सूर्यपूजा केली. संगम नोझवर गंगेची पूजा केली. गंगा मातेला दूध आणि साडी अर्पण केली. भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून, पंतप्रधान मोदी बामरौली विमानतळावरून हेलिकॉप्टरने अरैलला पोहोचले. तिथून ते बोटीने जत्रेच्या परिसरात आले. पंतप्रधानांच्या भेटीमुळे, मेळ्यातील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली. संगम परिसरात निमलष्करी दल देखील तैनात करण्यात आले होती. गंगेची पूजा केल्यानंतर मोदी बोटीने थेट अरैल घाटावर पोहोचले. तिथून ते दिल्लीला रवाना झाले. मोदींच्या संगम स्नानादरम्यान मुख्यमंत्री योगीदेखील त्यांच्यासोबत होते. (वृत्तसंस्था)

### भाविकांना त्रास नको म्हणून....

महाकुंभात भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून पंतप्रधानांनी त्यांचा कार्यक्रम मर्यादित ठेवला. ते प्रयागराजमध्ये सुमारे दोन तास राहिले. ते कोणालाही भेटले नाहीत. संगमात स्नान करून पूजा केल्यानंतर, ते बोटीने अरैलच्या व्हीआयपी घाटावर पोहोचले. तिथून त्यांचा ताफा डीपीएसला पोहोचला. तिथून हेलिकॉप्टरने बामरौलीला पोहोचले. येथून ते हवाई दलाच्या विमानाने दिल्लीला रवाना झाले.

# दिल्लीत ५७.७८ टक्के मतदान

**नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत बुधवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५७.७८ टक्के मतदान झाले होते. तुरळक घटना वगळता मतदान शांततेत पार पडले.

आजच्या मतदानाने आपच्या मुख्यमंत्री आतिशी, माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, नवी दिल्ली मतदारसंघातील भाजपा उमेदवार परवेश वर्मा, काँग्रेसचे संदीप दीक्षित, कालकाजी मतदारसंघातील भाजपा उमेदवार रमेश बिधुरी यांच्यासह ६९९ उमेदवारांचे भाग्य इव्हीएममध्ये बंद झाले. मतमोजणी शनिवार ८ फेब्रुवारीला होणार आहे.

७० सदस्यीय दिल्ली विधानसभेसाठी बुधवारी सकाळी ७ वाजता मतदान सुरू झाले. दुपारनंतर मतदानाचा वेग वाढला. सायंकाळी ५ वाजेपर्यंत दिल्लीत ५७.७८ टक्के मतदान झाले होते. मुस्तफाबाद मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे ६६.६८ टक्के, तर करोलबागमध्ये सर्वां[illegible]त कमी म्हणजे ४७ टक्के मतदान झाले होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, दिल्ली प्रदेश भाजपा अध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांच्यासह अनेक मान्यवरांनी मतदानाचा अधिकार बजावला. दिल्ली, आप, भाजपा आणि काँग्रेस या तीन पक्षात खरी लढत आहे. कालकाजी विधानसभा मतदारसंघातील मादीपूरमध्ये एका मतदान केंद्रावर व्हीव्हीपॅटमध्ये झालेल्या बिघाडामुळे मतदान १५ मिनिटांसाठी थांबवावे लागले. कालकाजीतील काँग्रेसच्या उमेदवार अलका लांबा यांनी याच मतदान केंद्रावर मतदान केले. सीलमपुरा मतदान केंद्रावर मुस्लिम महिलांनी बुरखा घालून बोगस मतदान केल्याचा आरोप भाजपा कार्यकर्त्यांनी केला. त्यामुळे याठिकाणी काही वेळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. (तभा वृत्तसेवा)

# फोर्ट विल्यमचे नवे नामकरण 'विजय दुर्ग'

**कोलकाता, ५ फेब्रुवारी**

कोलकाता येथील लष्कराच्या पूर्व कमांडचे मुख्यालय असलेल्या फोर्ट विल्यमचे नाव बदलून 'विजय दुर्ग' असे ठेवण्यात आले आहे. फोर्ट विल्यममधील इतर काही ऐतिहासिक वास्तूंची नावे देखील बदलण्यात आली आहेत, असे संरक्षण मंत्रालय, कोलकाता येथील मुख्य जनसंपर्क अधिकारी विंग कमांडर हिमांशू तिवारी यांनी सांगितले.

फोर्ट विल्यममधील किचनर हाऊसचे नाव बदलून माणेकशॉ हाऊस करण्यात आले आहे, तर दक्षिण गेट, ज्याला पूर्वी सेंट जॉर्ज गेट म्हटले जात होते, ते आता शिवाजी गेट म्हणून ओळखले जाईल, असे विंग कमांडर तिवारी म्हणाले.ईस्टर्न कमांडच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मते, सध्याचा फोर्ट विल्यम सुमारे १७७ एकरमध्ये पसरलेला आहे. (वृत्तसंस्था)

# घुसखोर बांगलादेशींचा बीएसएफ जवानांवर हल्ला

**कोलकाता, ५ फेब्रुवारी**

भारत-बांगलादेश सीमेवर बांगलादेशी घुसखोरांनी सीमा सुरक्षा दलाच्या जवानांवर दोन वेळा हल्ला करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. हे हल्ले ४ आणि ५ फेब्रुवारी रोजी रात्री झाले. पश्चिम बंगालच्या दक्षिण दिनाजपूर सीमेवरील मलिकपूर गावात तस्करी आणि दरोडा घालण्यासाठी बांगलादेशींनी मध्यरात्री घुसखोरी केली होती.

घुसखोरी करणाऱ्या बांगलादेशींना बीएसएफच्या जवानांनी आव्हान दिले. मात्र, त्यांनी जवानांना घेरून त्यांच्यावर तलवार, कट्यारींसारख्या धारदार आणि अणकुचीदार शस्त्रांनी हल्ला केला. त्यानंतर जवानांनी आत्मरक्षणासाठी गोळीबार केला. बांगलादेशींच्या हल्ल्यात बीएसएफचा जवान जखमी झाला, तर एका घुसखोराला पकडण्यात यश आले. जवानांनी बांगलादेशींना हुसकावून लावले.

बांगलादेशींकडे तलवार, कट्यारीसारखी धारदार शस्त्रे होती. मागे ढकलल्यानंतर केवळ सहा तासांच्या अंतराने त्यांनी पुन्हा घुसखोरी करीत बीएसएफच्या जवानांवर हल्ला केला. पहिला हल्ला रात्री बारा वाजताच्या सुमारास, तर दुसरा हल्ला पहाटे करण्यात आला. दोन्ही वेळा बीएसएफच्या जवानांनी त्यांना झोडपून पिटाळले. दक्षिण दिनाजपूरच्या मलिकपूर गावात ही घुसखोरी झाली होती.

दुसऱ्या वेळी बांगलादेशी घुसखोरांची संख्या मोठी होती. बीएसएफच्या जवानांनी आव्हान देताच त्यांनी हल्ला केला आणि जवानांच्या हातून शस्त्रे हिसकावण्याचा प्रयत्नही केला. या झटापटीत एक जवान जखमी झाला. (वृत्तसंस्था)

# सरकारी कार्यालयांमध्ये 'एआय' ॲपवर बंदी

## सरकारी कर्मचाऱ्यांनी वापर न करण्याचा आदेश

**नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

केंद्रीय अर्थ मंत्रालयाने चॅटजीपीटी आणि डीपसीकसारख्या एआय टूल्स आणि ॲप्लिकेशनच्या वापरावर बंदी घालण्याचा आदेश जारी केला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांनी या ॲप्लिकेशनचा वापर करू नये, असे २९ जानेवारी रोजी जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे. सरकारी डेटा सुरक्षित ठेवणे आणि संभाव्य सायबर धोके रोखणे हा त्यामागील उद्देश आहे.

सरकारी संगणकांवर एआय सक्षम ॲप्लिकेशनचा वापर केल्यास गोपनीय सरकारी माहिती धोक्यात येऊ शकते. त्यामुळे मंत्रालयाने सर्वच कर्मचाऱ्यांनी अधिकृत उपकरणांवर अशा प्रकारच्या टूल्सचा वापर करू नये, असा सल्ला संयुक्त सचिव प्रदीपकुमार सिंह यांची स्वाक्षरी असलेल्या आदेशात दिला आहे.

वित्त सचिवांनी दिलेल्या मंजुरीनंतर हा आदेश जारी करण्यात आला. या बाबतचे पत्र महसूल, आर्थिक व्यवहार, व्यय विभाग, सार्वजनिक उपक्रम, डीआयपीएएम आणि वित्तीय सेवांसह मुख्य सरकारी विभागांना पाठवण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

### यासाठी घातली बंदी


- डेटा फुटण्याचा धोका
- एआय मॉडेलवर सरकारी नियंत्रण नाही
- डेटा संरक्षण धोरणाचे पालन

# पाश्चात्य उदारमतवादी विचार देशाच्या संस्कृतीसाठी घातक

## दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

देशात पाश्चात्य उदारमतवादी विचारांचा प्रभाव वेगवेगळ्या प्रकारे वाढत आहे. यामुळे देशाच्या सांस्कृतिक अस्मितेला धोका निर्माण होत आहे. लोकांना विशेषतः नव्या पिढीला यापासून दूर राहायला हवे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले. 'हू इज रेझिंग युवर चिल्ड्रन : ब्रेकिंग इंडिया विथ युथ वॉरियर्स' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे बोलत होते. हे पुस्तक राजीव मल्होत्रा आणि विजया विश्वनाथन् यांनी लिहिले आहे.



सरकार्यवाह होसबळे म्हणाले, हा अतिशय गंभीर विषय आहे. एकदा पाश्चात्य विचारसरणी नवीन पिढीच्या मनात शिरली की ती पिढी उद्ध्वस्त होईल. आपली सांस्कृतिक ओळख नष्ट होईल. ही एक अतिशय गंभीर बाब आहे. त्याबद्दल आपण सावध असायला हवे. भारतीय समाज नेहमीच इतर संस्कृती आणि विचारांसाठी उदार राहिला आहे. पण कोणतीही नवीन कल्पना येत आहे, ती चांगली आहे की नाही, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. पुस्तकाद्वारे धोक्याचा इशारा या पुस्तकात उपस्थित केलेल्या प्रश्नांवर होसबळे म्हणाले की, शिक्षणाचे पाश्चात्य मॉडेल आणि लैंगिकतेशी संबंधित कल्पना स्वीकारणे चिंताजनक आहे. आपल्या घरांमध्ये, शाळांमध्ये आणि नवीन पिढीच्या मनात ज्या गोष्टी स्थान मिळवत आहेत त्या चांगल्या आहेत का, मूल्यांशी जोडलेल्या आहेत का, सभ्यतेनुसार आहेत का आणि सांस्कृतिकदृष्ट्या मजबूत आहेत का, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. पाश्चात्त्यांकडून येत असलेल्या शिक्षण पद्धतीतील दोष आणि कामुकता या गोष्टी आपल्या नव्या पिढीत शिरणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे. याविषयी हे पुस्तक धोक्याचा इशारा देते.

### सांस्कृतिक सीमा रक्षण गरजेचे

देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक सीमा आता कमकुवत होत आहेत. आपल्या सीमांचे रक्षण करण्यासाठी आपल्याकडे सैन्य आहे, परंतु आपल्याला आपल्या सांस्कृतिक सीमांचेही रक्षण करावे लागेल. त्याचे उल्लंघन झाले तर ते मोठे संकट निर्माण करू शकते, असेही सरकार्यवाह होसबळे म्हणाले

# स्वेच्छेने माहेरी राहणाऱ्या महिलेला खावटी नाही

### शेगाव न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**खामगाव, ५ फेब्रुवारी**

स्वेच्छेने माहेरी राहणाऱ्या महिलेला पतीकडून खावटी मिळविण्याचा हक्क नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल शेगाव न्यायालयाने दिला आहे. न्यायाधीश एन. डी. मेश्राम यांनी हा निकाल दिला आहे.

शेगाव तालुक्यातील टाकळी धारव येथील दीपाली प्रदीप शेकोकारे या विवाहित महिलेने पती आणि सासरकडील सहा सदस्यांविरुद्ध कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ अंतर्गत अर्ज केला होता.

त्यामध्ये प्रदीप नामदेव शेकोकारे, सुमन नामदेव शेकोकारे, संदीप नामदेव शेकोकारे, कविता मंगेश नन्नावरे, मंगेश मोहन नन्नावरे यांचा समावेश होता. त्यात तिने पतीकडून घरभाडे आणि निर्वाह निधी मिळविण्यासाठी अर्ज केला होता. परंतु, न्यायालयाने नमूद केले की, पती आपल्या पत्नीला नांदवायला तयार असताना, पत्नीने कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय नांदण्यास नकार दिला आहे. ती आपल्या इच्छेनुसार माहेरी राहत असल्याचे सिद्ध झाल्याने ती खावटी आणि घरभाडे मिळवण्यास पात्र नाही.

न्यायालयाने हेही स्पष्ट केले की, अर्जदाराची याचिका फेटाळण्याचे कारण म्हणजे पतीने मुंबईतील कौटुंबिक न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेला विरोध करण्यासाठी ही याचिका दाखल केली होती. त्यामुळे अर्जदार नुकसानभरपाई मिळण्यासही पात्र नाही. हा निकाल उच्च न्यायालयाच्या निर्णयावर आधारित असून, दोन्ही पक्षांची बाजू ऐकून घेतल्यावर दिला गेला. यामध्ये गैरअर्जदाराच्या वतीने ॲड. दीप्ती शेषराव पाटील यांनी काम पाहिले. (तभा वृत्तसेवा)

# वारकरी संप्रदायाचे वैचारिक नेतृत्त्व शिरीष महाराज मोरे यांचे निधन

**पुणे, ५ फेब्रुवारी-**

वारकरी संप्रदायातील वैचारिक नेतृत्व आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज ह.भ.प. शिरीष महाराज मोरे (वय ३०) यांचे आकस्मित निधन झाले. श्रीक्षेत्र देहूगाव येथील वैकुंठ स्मशानभूमीत (बुधवार, दि. ५ फेब्रुवारी) रोजी सायंकाळी चार वाजता अंत्यविधी होणार आहे. वारकरी संप्रदायाचे एक समर्थ नेतृत्व पडद्यामागे गेल्याने समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रांतून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनाने इतिहास आणि संत साहित्य विश्वातला एक जाणकार हरपला. समस्त हिंदू सम ाज आणि हिंदुत्वविषयक अभियानांचे मोठे नुकसान झाल्याची खंत शिवशंभू विचार मंचाचे महाराष्ट्र राज्य संयोजक सुधीर थोरात यांनी व्यक्त केली. महाराष्ट्रातील हजारो तरुणांना हिंदुत्व चळवळीशी जोडण्याचे काम शिरीष म हाराज मोरे यांनी केले. त्यांनी नुकत्याच झालेल्या विशाळगड मुक्ती संग्रामात आक्रमी भूमिका घेत प्रशासनाला न्याय देण्यास भाग पाडले. बालपणापसूनच ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. प्रखर वक्ते, संत साहित्याचे जाणकार, विशेषतः डाव्या पुरोगामी चळवळीकडून संत विचारांची जी चुकीची मांडणी केली जात आहे. त्याविषयी त्यांनी वेळोवेळी योग्य आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडली होती. त्या निमित्ताने त्यांचा महाराष्ट्रभर प्रवास होत होता. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्या इतिहासाच्या विद्रुपीकरणा विरोधात त्यांनी शेकडो सभा घेऊन निर्भिड सत्यनिष्ठ भूमिका घेतली होती. एक विचारवंत, अभ्यासक आणि संत परपरेचा वारसा लाभलेला युवा नेतृत्त्व हरपल्याने महाराष्ट्राचे भरून निघणारे नुकसान झाले आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### राहुल सोलापूरकर यांच्या प्रतिमेला जोडोमार आंदोलन

**सोलापूर, ५ फेब्रुवारी-**

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बाबत मराठी अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी वादग्रस्त वक्तव्य केले असून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सामर्थ्याचे आणि कर्तृत्वाचे अवमूल्य केल्यामुळे राहुल सोलापूरकर यांनी तसे पुरावे द्यावेत अन्यथा त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, यावेळी संभाजी ब्रिगेडच्यावतीने राहूल सोलापूरकरांच्या प्रतिमेला जोडेमार आंदोलनही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केले. यावेळी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, संपर्कप्रमुख छत्रगुण माने, उपाध्यक्ष सीताराम बाबर, फिरोज सय्यद, दिलीप निंबाळकर, लखन गायकवाड, आकाश नाईकवाडी, वैभव धुमाळ, ज्ञानेश्वर कदम उपस्थित होते.



### सहस्रार्जुन प्रशालेतील विद्यार्थ्यांनी घेतली अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांची भेट

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार जाहीर झालेले सोलापुरातील जेष्ठ साहित्यिक पद्मश्री मारुती चितमपल्ली यांची सहस्रार्जुन शैक्षणिक संकुलाच्या वतीने विद्यार्थी आणि शिक्षक यांनी साहित्यिक भेट घेऊन संवाद साधला. या भेटीत सातवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी संवाद साधला. संस्काराने माणूस घडतो यासाठी वाचनाचे महत्त्व सांगितले. पक्षी निरीक्षण, जंगलातफिरणे वन्यजीवांचा अभ्यास करणे आवश्यक आहे असा संदेश त्यांनी दिला. एक लाख पुस्तकांचे वाचन केले आहे. तुम्ही वाचन करा. स्वतः चे ग्रंथालय घरी असावे असा प्रेरक संदेश चितमपल्ली यांनी दिला. मराठीत एक लाख मराठी शब्दांची भर घातली मराठीचे वैभव वाढविले. त्यांना सोळा भाषा अवगत आहेत. कोळीण या सातवीच्या गद्य पाठावरही मुलांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्यांचे मार्गदर्शन प्रेरक होते. चकवाचांदण या आत्मचरित्राचे वाचन करण्याची प्रेरणा मिळाली. याप्रसंगी प्रशालेतील शिक्षक वैशाली अघोर, जयलू कबाडे, संतोषी जाधव व प्रीतम खत्री आदींच्या मार्गदर्शनाखाली संवाद साधला.

### सोलापूरचे पवन भोसले महाराष्ट्र राज्य शालेय तलवारबाजी संघाचे प्रशिक्षक

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी -**



पटना (बिहार) येथे ९ ते १४ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या १९ वर्षाखालील ६८ व्या शालेय राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी महाराष्ट्र मुलींच्या संघाचे प्रशिक्षक म्हणून पवन भोसले यांची निवड झाली. महाराष्ट्र संघाचे सराव शिबीर ८ फेब्रुवारी पर्यंत छ. संभाजीनगर येथे सुरु आहे. या संघात सोलापूरच्या यज्ञेश्वर पाटील, श्रेयस वाघमारे, श्रुतिका चव्हाण व श्रावणी शिंदे यांचा समावेश आहे. पवन भोसले हे बी.एफ. दमाणी प्रशाला व श्री सिद्धेश्वर इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये क्रीडा शिक्षक आहेत. त्यांचे महाराष्ट्र तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश काटुळे, सचिव उदय डोंगरे व जिल्हा सचिव दीपक शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### सोलापूर जिल्हा सब ज्युनियर मैदानी स्पर्धा शनिवारी

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा थलेटिक्स असोसिएशनच्या वतीने जिल्हा सब ज्युनियर मैदानी स्पर्धा शनिवार ८ फेब्रुवारी रोजी शासकीय मैदान नेहरूनगर येथे आयोजित केली आहे. ही स्पर्धा ८, १०, १२ व १४ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात होईल. ८ वर्षेसाठी (जन्मतारीख १ मार्च २०१७ ते २८ फेब्रुवारी २०१९), १० वर्षेसाठी (१ मार्च २०१५ ते २८ फेब्रुवारी २०१७), १२ वर्षेसाठी (१ मार्च २०१३ ते २८ फेब्रुवारी २०१५) व १४ वर्षेसाठी ( १ मार्च २०११ ते २८ फेब्रुवारी २०१३) या दरम्यान जन्मलेले खेळाडू असावेत. या स्पर्धेसाठी जन्म दाखला महानगरपालिका नगरपालिका व ग्रामपंचायतचे असणे अनिवार्य आहे. जिल्हा स्पर्धेत यशस्वी झालेल्या खेळाडूंची निवड २३ व २४ फेब्रुवारी दरम्यान के.बी.पी. कॉलेज पंढरपूर येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य सब ज्युनियर थलेटिक्स स्पर्धासाठी होणार आहे इच्छुक खेळाडूंनी तांत्रिक नियोजन प्रमुख चेतन धनवडे (मो.नं ९९२१११४१४२), सुर्याजी लिंगडे (मो नं ८८०५०४२०९९) अथवा स्पर्धा प्रमुख दशरथ गुरव (मो. नं. ९६८९२८३८५९) यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा संघटनेचे सचिव राजू प्याटी यांनी कळविले आहे.

### अक्कलकोटमधील हळदी-कुंकू कार्यक्रमात ७०० महिलांचा सहभाग

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

यशोधन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शाखा अक्कलकोट आयोजित हळदी-कुंकू समारंभात ७०० महिलांनी सहभाग घेतला. यावेळी मल्लम्मा पसारे, डॉ. गिरीजा राजीमवाले, डॉ. सुवर्णा मलगोंडा, सुनंदा तेली, शांताबाई अचलेरकर, वनिता तंबाके, सुवर्णा साखरे, निलीमा खजुरगीकर, वालूबाई कांबळे, काशिनाथ पुजारी उपस्थित होते. प्रास्ताविक सुखदा ग्रामोपाध्याय यांनी केले. सूत्रसंचालन पल्लवी पवार यांनी केले तर आभार चेअरमन पुजारी यांनी मानले.

# जुना विडी घरकुलमध्ये रंगला विठ्ठल-रुक्मिणी कल्याणोत्सवम्

## श्रीरामायण भाव कथा निरुपण उत्स्फूर्त प्रतिसाद, श्रीमार्कंडेय जन्मोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

हैद्राबाद रोडवरील जुना विडो घरकुलमधील बी ग्रुप येथील श्रीहरिओम समाजसेवा न्यास संचलित श्रीमार्कंडेय उत्सवमुर्ती व विठ्ठल रुकिमणी मंदिरच्या वतीने आयोजित केलेला विठ्ठल-रुकिमणी कल्याणोत्सवम् रंगतदार ठरला. यानिमित्त हभप अभिनंदन महाराज गायकवाड यांचे श्रीरामायण भाव कथा या विषयावर निरुपणचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, पद्मशाली समाजाचे कुलदैवत भगवान श्रीमार्कंडेय जन्मोत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात पार पाडण्यात आले.



रुकिमणी म्हणजेच वधूपक्षाकडून विश्वनाथ यलदंडी शिवाजी चन्ना यांनी विठ्ठल म्हणजेच वरपक्षाकडून यजमानपद स्वीकारले होते. बी ग्रुपमधील श्रीगणेश देवस्थानम् येथे प्रतानम तर श्रीविठ्ठल रुकिमणी मंदिर येथे अक्षता सोहळा पार पाडण्यात आले. विठ्ठल व रुकिमणी मातेच्या मुर्तीला आभुषणाने अलंकृत करण्यात आले होते. खास दाक्षिणात्य पध्दतीचे विवाह मंडप उभारण्यात आले होते. महिला, पुरुष, अबाल, वृध्द असे सारेचजण अस्सल तेलुगु संस्कृतीला साजेसे अशा पेहरावात व-हाडी म्हणून आले हात.

या उत्सवांतर्गत ब्र. स. नृसिंहानंद गज्जल महाराज यांच्या कृपाशिर्वादाने, ह.भ.प. राकेश महाराज अन्नम यांच्या अधिपत्याखाली ह.भ.प. श्रीनिवास द्यावनपल्ली महाराज यांच्या नेतृत्वाखाली श्रीज्ञानेश्वरी पारायण, श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर महिला मंडळाच्या नेतृत्वाखाली हरिपाठ, ह.भ.प. अंजय्या दुस्सा महाराज, अशोक चिठ्याल महाराज, हणमंतू चिलवेरी महाराज यांच्या नेतृत्वाखाली श्रीमार्कंडेय जन्मोत्सव व गुलाल कार्यक्रम करण्यात आले.

महाप्रसाद वाटपाने उत्सवाची सांगता करण्यात आली. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी वासुदेव यलदंडी, नागनाथ सामल, दत्तात्रय गुर्रम, अंबादास चव्हाण, रामकृष्ण गुन्नाल, गिरीष मादास, रामकृष्ण सुंचू, अंकुश गोरट्याल, पांडुरंग पोतन, नरेंद्र जटला, श्रीपाद भंडारो, राजकुमार कुस्मा, श्रीधर गंजी, ज्ञानेश्वर गज्जम, डॉ. आनंद गुंडू, महेश ठेसे, आनंद नारा, अजय संगा, सुनील बोनाकृती, श्रीहरी पसुल, विवेकानंद चन्ना, राजेश कुडकयाल, महेश ताटी, विनायक कोंडा, विठोबा कैरमकोंडा, शिवकुमार दिड्डी, विनायक वल्लाल, प्रशांत बिनगुंडी, विजयकुमार माधुरी, सत्यप्रकाश भंडारी, श्रीकांत झुंजुर, आनंद मुशन, गोवर्धन ताला आदींनी परिश्रम घेतले.

# आता निराधारांच्या खात्यावर 'डीबीटी'द्वारे अनुदान वितरीत : तहसीलदार किरण जमदाडे

### आधारकार्ड बँक पासबुकला संलग्न करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

संजय गांधी योजना व श्रावणबाळ निराधार योजनांच्या दक्षिण तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांचे सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान तहसिल कार्यालयाकडून त्यांच्या बँक खात्यावर आरटीजीएसद्वारे जमा करणेत येत असून, डिबीटी प्रणालीद्वारे हे अनुदान वितरीत होत असल्याची माहिती तहसीलदार किरण जमदाडे यांनी दिली आहे. दरम्यान, यासाठी आधारकार्ड बँक पासबुकला संलग्न करून घेण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

शासनाकडील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील पत्र क्रं. विसयों-२०२४/प्र.क्र.२४/विसयो दि.१८/१२/२०२४ अन्वये संजय गांधी योजना/श्रावणबाळ योजना या योजनेतील सर्व लाभार्थ्यांना फेब्रुवारी २०२५ पासूनचे अर्थसहाय्य केवळ डीबीटी पोर्टलवर आधार अपडेट झालेल्या लाभार्थ्यांनाच करण्यात येणार आहे. मोबाईल आधार लिंक व आधार अपडेट नसलेल्या तसेच डीबीटी पोर्टलवर लाभार्थ्यांची नोंदणी न केलेल्या लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य फेब्रुवारी २०२५ पासून बंद करण्याचे आदेश आहेत.

शासनाच्या नवीन धोरणानुसार डिबीटी प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यांवर अनुदान वितरीत करण्याचे असलेने लाभार्थ्यांच्या खात्यांवर थेट राज्यशासनामार्फत अनुदानाची रक्कम जमा करण्यात येणार आहे. या करिता सदर योजनांच्या सर्व लाभार्थ्यांनी तात्काळ त्यांचे आधार कार्डला संलग्न असलेल्या मोबाईलसह आपल्या नजीकच्या महा-ई-सेवा केंद्र, आधार कार्ड केंद्रामध्ये जाऊन आधार व्हेरीफीकेशन (आधार कार्ड अपडेट करणे, जन्म दिनांकांची संपूर्ण माहिती दिनांक, महिना, वर्ष या नमून्यात, मोबाईल लिंक करणे इत्यादी) करुन घेणे. तसेच आपले बँक पासबूक हे ईकेवायसी, सीकेवायसी करून घेणे बंधनकारक आहे.

त्यानुसार जे लाभार्थी आधार व्हेरीफीकेशन करून आपले आधारकार्ड बँक पासबुकला संलग्न करुन घेणार नाहीत; त्यांचे अनुदान फेब्रुवारी २०२५ पासून बंद करण्यात येईल. त्यामुळे सर्व संबंधित लाभार्थ्यांनी आधारकार्ड बँक पासबुकला संलग्न करावेत असे आवाहन दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी केले आहे.

# १० लाखांसाठी विवाहितेचा छळ; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

हॉटेल व्यवसाय करण्यासाठी माहेरून १० लाख रुपये आणले नाही तर पतीचे दुसरे लग्न लावण्याची धमकी देऊन विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सहाजणांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सायमा मोहिद्दीन अत्तार (वय २३, रा. मुक्तेश्वर नगर, मित्र नगर, शेळगी, सोलापूर) या विवातिच्या फिर्यादीवरुन पती मोहिद्दीन अत्तार, सासू शाबेरा, सासरे मुबारक, नवऱ्याचे काका दिलावर अत्तार, काकू हसिना अत्तार, पतीची मावशी साहेरा अत्तार (रा. मोरवाडी, पिंपरी चिंचवड, पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जून २०२१ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत सायमा या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती मोहिद्दीन व इतरांनी मिळून सायमा हिस घरातील किरकोळ कारणावरून टोचून बोलून शिवीगाळ व मारहाण केली.

तसेच तुझ्या आई-वडीलांनी लग्नात आमचा मानपान के नाही, लग्नात जास्त भांडी दिली नाही तसेच पती मोहिद्दीन याला हॉटेल व्यवसायासाठी माहेरून १० लाख रुपये घेऊन ये म्हणून सायमा यांना माहेरी पाठवून दिले.

माहेरून पैसे आणले तरच तु नांदण्यास परत ये, नाही तर आमच्या मुलाचे दुसरे लग्न लावून देऊ अशी धमकी देऊन सायमा हिचा शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंके पुढील तपास करीत आहेत.



# वैभवशाली राष्ट्र बनवण्यासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची : आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी राष्ट्रसेवेचे व्रत अंगीकारले आहे. वैभवशाली राष्ट्र बनवण्यासाठी युवकांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. त्याचबरोबर आता सोलापूर जिल्ह्यातील गाव-खेडे समृद्ध बनवण्यासाठी तरुणांनी योगदान द्यायला हवे, असे प्रतिपादन राज्याचे माजी मंत्री तथा सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार साखळी शिबिराचे उद्घाटन आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, विद्यापीठ विकास प्रबोधनीचे अभिजीत पाटील, सिनेट सदस्य चन्नवीर बंकुर, सुदर्शन यादव, महेंद्र घागरे यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले. या साखळी शिबिरात हिराचंद नेमचंद कॉलेज, फार्मसी कॉलेज, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सिंहगड कॉलेज, डीएव्ही वेलणकर महाविद्यालयाचा समावेश आहे. २८० विद्यार्थी पुढील सात दिवस विद्यापीठात वृक्षारोपण तसेच श्रमदान करणार आहेत.

## ७ हजार ६९१ उमेदवारांनी दिली एमपीएसीची परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ साठी २ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत एक सत्रात घेण्यात आली. यासाठी एकूण २७ केंद्रांवर ९ हजार ६४० उमेदवार परीक्षा देणार होते. यासाठी तयारीही झाली मात्र या परीक्षेसाठी ७ हजार ६९१ उमेदवार उपस्थित राहिले. तर १ हजार ९४९ उमेदवार अनुपस्थित राहिल्याची माहिती आरडीसी मनिषा कुंभार यांनी दिली.

परीक्षेसाठी सोलापूर जिल्हा केंद्रावरील सोलापूर शहरातील २७ उपकेंद्रांवर एकूण ९ हजार ६४० उमेदवारांची बैठक व्यवस्था लावण्यात आली होती. या परीक्षेसाठी उपकेंद्रप्रमुख २७, पर्यवेक्षक १३४, समवेक्षक ४५७, लिपीक ५४, चतुर्थश्रेणी कर्मचारी २३६ याप्रमाणे कर्मचाऱ्यांची परीक्षा केंद्रांवर नियुक्ती करण्यात आली होती. तर १३५ पोलिस अधिकारी/कर्मचारीही तैनात केले होते. कडक बंदोबस्तात ही परीक्षा पार पडली.

# शनिवारी गडीनाड कन्नड संमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

कर्नाटक सीमा क्षेत्र विकास प्राधिकरण बेंगलोर आणि न्यासा मानव विकास संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ८ फेब्रुवारी रोजी शिवस्मारक येथे गडीनाड कन्नड सांस्कृतिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रा. रविकुमार सोलापुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सकाळी ८.३० वाजता मल्लिकार्जुन मंदिर ते शिवस्मारक पर्यंत शोभायात्रा काढण्यात येणार आहे. संमेलनाचे उद्घाटन प. पू. श्रीकाशी जगद्गुरु डॉ. मलिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. गुरुलिंगप्पा धबाले, खा. प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे, आ. सचिन कल्याणशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळमुंडे, बेंगलोरचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजशेखर मठपती, उद्योजक विनोद दुधनी, विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा आदी उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कर्नाटक गडी प्रदेश अभिवृद्धी प्राधिकरणाचे अध्यक्ष सोमण्णा बेविनमरद, प्रकाश मत्तीहळ्ळी हे भूषविणार आहेत.

संमेलनामध्ये स्वरयोगिनी साधना योगलक्ष्मी यांचे वचन अनुभुती हा कार्यक्रम होणार आहे. डॉ. राजशेखर मठपती, बेगलोर यांच्या गडीनाड कन्नड साहित्य संस्कृती समस्या या उपन्यासाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर अनिता काराजेनगी यांचे सोलापूर जिल्ह्यातील वचन साहित्य या विषयावर प्रवचन होईल. त्यानंतर डॉ. गुरुसिद्धय्या स्वामी यांचे सोलापूर जिल्ह्यातील संत साहित्य या विषयावर विवेचन होईल. त्यानंतर डॉ. शिवानंद तडवळ यांचे सोलापुरातील आधुनिक कन्नड साहित्य या विषयावर व्याख्यान होईल. त्यानंतर डॉ. सुजाता शास्त्री यांचे सोलापुर जिल्ह्यातील भाषा व संस्कृती या विषयावर व्याख्यान होईल. दुपारी २ ते ४ या वेळेत बहुभाषिक कवीगोष्टी सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक सत्रात शंकरलिंग महिला मंडळ, सोलापूर यांचे अमर ज्योती अक्कमहादेवी या नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस भीमाशंकर हुबळी, विनोद दुधनी, मीना बागलकोटी, रूपा स्वामी, सुनिल सोलापुरे, निर्मला लातुरे, महादेवी तेली, रेणुका बागलकोटी आदी उपस्थित होते.

# देशातील निवडणुकांवर काँग्रेसची करडी नजर

## 'ईगल' समितीला सर्वप्रथम महाराष्ट्र निवडणुकीच्या विश्लेषणाचे दिले काम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

देशात भयमुक्त वातावरणात आणि निष्पक्षपणे निवडणुका होत आहेत की नाही, हे पाहण्यासाठी काँग्रेस पक्षाने 'इम्पॉवर्ड ऍक्शन ग्रुप ऑफ लिडर्स अँड एक्सपर्ट्स (ईगल) समितीची स्थापना केली आहे. प्रत्येक निवडणुकीचा निकाल आणि मतदार याद्यांचे विश्लेषण करण्याचे काम ही समिती करेल. 'ईगल' समितीला सर्वप्रथम महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या विश्लेषणाचे काम देण्यात आले आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दहा लाख मतांची हेराफेरी झाल्याचा आरोप काँग्रेस पक्षाकडून करण्यात आला होता. निवडणूक आयोगाने रात्री ११.५९ वाजता मतदानाची टक्केवारी अपडेट केली होती. मात्र त्याच्या दुसऱ्या दिवशी मतदान टक्केवारीत १.३ टक्क्यांनी कशी काय वाढ झाली, असा सवाल काँग्रेसकडून उपस्थित करण्यात आला होता.

अनियमिततेच्या अनुषंगाने ही समिती तिचा अहवाल पक्षप्रमुखांना देणार आहे. देशातील निवडणुका स्वतंत्रपणे आणि निष्पक्षपणे होणे गरजेचे आहे. या दृष्टीने निवडणूक आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या निवडणुका योग्य प्रकारे होत आहेत की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी काँग्रेस अध्यक्षांनी तत्काळ प्रभावाने एक कार्यसमितीची स्थापना केली आहे. या समितीमध्ये आठ सदस्यांचा समावेश आहे, अशी माहिती काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी दिली.

### या सदस्यांचा समावेश

काँग्रेसकडून स्थापन करण्यात आलेल्या 'ईगल' समितीमध्ये ज्या नेत्यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे, त्यात नितीन राऊत, अजय माकन, दिग्विजय सिंग, अभिषेक मनू सिंघवी, प्रवीण चक्रवर्ती, पवन खेडा, गुरदीप सिंह सप्पल आणि चल्ला वामशी चंद रेड्डी यांचा समावेश आहे.



### राज्यातील निवडणुकीचे याद्वारे विश्लेषण

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीवेळी मतदारयाद्यांमध्ये फेरफार झाल्याचा आरोप झाला होता. त्यामुळे महाराष्ट्रातील निवडणुकीचे विश्लेषण करण्याचे काम या समितीला देण्यात आले आहे. मागील काही काळात विविध राज्यांमध्ये निवडणुका झाल्या होत्या, या निवडणुकांचेदेखील विश्लेषण केले जाणार आहे.

**-प्रणिती शिंदे, खासदार**



# रिद्धपूर हे मराठी संस्कृतीच्या उदयाचे केंद्र : कुलगुरू डॉ. आवलगावकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

सरहद, पुणे आयोजित अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त घेण्यात येणाऱ्या ९८ कार्यक्रमांच्या अंतर्गत सरहद महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे 'मराठी साहित्यात महानुभाव साहित्याचे योगदान' या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी रिद्धपूर अमरावती मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर बोलत होते.

कला शाखा व मराठी विभाग प्रमुख डॉ. वंदना चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रयोजन सांगून महानुभाव साहित्याचे स्वरूप प्रस्ताविकाद्वारे विशद केले. मराठी विभागाची माजी विद्यार्थिनी दिव्या कपाटे हिने महानुभाव पंथाची दिनचर्या स्वानुभवातून कथन करून पद्यरचना सादर केली.

कार्यक्रमाच्या प्रसंगी स्वरगंधार संस्थेचे अध्यक्ष गोपाळ कांबळे, सरहदचे समन्वयक झाहिद भट, प्राचार्य डॉ. संगीता शिंदे, डॉ. सुनील उकले, सर्व विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. कोमल मोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अनुपमा वाटकर यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अमेरिका ताब्यात घेईल गाझा

## डोनाल्ड ट्रम्प यांची भूमिका

◆ **वॉशिंग्टन, ५ फेब्रुवारी**

गाझामधील विध्वंसामुळे पॅलेस्टिनींना तेथून निघून जाण्याशिवाय पर्याय उरला नाही. जॉर्डन आणि इजिप्तने पॅलेस्टिनींना आश्रय द्यावा. यानंतर अमेरिका गाझा पट्टी ताब्यात घेऊन तिचा पुनर्विकास करेल, अशी भूमिका अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पत्रपरिषदेत जाहीर केली.

ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यात व्हाईट हाऊसमध्ये बैठक झाली. बैठकीनंतर दोघांनी घेतलेल्या संयुक्त पत्रपरिषदेत ट्रम्प म्हणाले, गाझापट्टीचे पुनर्वसन करण्याऐवजी पॅलेस्टिनींना नवीन ठिकाणी वसवणे योग्य राहील. योग्य जागा सापडल्यास तिथेच घरे आणि सोयीसुविधा निर्माण करता येतील.


पत्रकार परिषदेत माहिती देताना बेंजामिन नेतान्याहू व डोनाल्ड ट्रम्प

गाझात विकास करण्यापेक्षा हा उपाय चांगला असेल. गाझातील २० लाख नागरिकांनी मध्यपूर्वेतील इतर देशांमध्ये स्थायिक व्हावे. अमेरिका गाझा ताबा घेईल आणि तेथे विकास करेल. अमेरिका तिथे असलेले धोकादायक बॉम्ब आणि इतर शस्त्रे काढून टाकू शकते. अमेरिका ही जागा स्वच्छ करू शकते आणि आर्थिक विकास घडवू शकते ज्यामुळे तिथील लोकांसाठी अमर्याद नोकऱ्या आणि घरे निर्माण होतील. गेल्या काही महिन्यांत गाझातील परिस्थिती मी जवळून समजून घेतली आहे आणि गाझा ताब्यात घेण्याच्या आणि विकसित करण्याच्या योजनेला जगातील सर्वोच्च नेत्यांकडून प्रचंड पाठिंबा मिळाला आहे. मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी ही एक प्रभावी योजना आहे.

**कमकुवत नेतृत्वामुळे निर्माण झाल्या समस्या**

ट्रम्प म्हणाले की, मी लवकरच इस्रायल, गाझा, सौदी अरेबिया आणि मध्य पूर्वेतील इतर देशांना भेट देईल. मध्य पूर्व हे एक अद्‌भुत ठिकाण आहे. परंतु, कमकुवत नेतृत्वामुळे तेथे अनेक समस्या निर्माण झाल्या. गाझावर कायमस्वरूपी ताबा मिळविण्याबाबत विचारले असता ते म्हणाले, या योजनेत मला दीर्घकालीन मालकीची भूमिका दिसून येत आहे तसेच यामुळे या भागात स्थिरता निर्माण होऊ शकते. यावेळी नेतान्याहू यांनी ट्रम्पच्या प्रस्तावाचे वर्णन गाझाच्या भूमीसाठी एक नवीन भविष्य असे केले आणि त्याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

## नक्षल्यांनी पेरलेल्या आयईडीचा स्फोट, कामगार जखमी

◆ **नारायणपूर, ५ फेब्रुवारी**

छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यातील एका खाणकाम ठिकाणी बुधवारी नक्षलवाद्यांनी पेरलेल्या आयईडीचा स्फोट होऊन एक कामगार जखमी झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

राज्याची राजधानी रायपूरपासून ३५० किमी अंतरावर असलेल्या छोटे डोंगर पोलिस ठाणे हद्दीतील आमदाई घाटी लोहखनिज खाणीत सकाळी ही घटना घडली, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. जखमी कामगाराला छोटे डोंगर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. जयस्वाल नेको इंडस्ट्रीज लिमिटेडला (जेएनआयएल) आमदई घाटी येथील लोहखनिज खाण देण्यात आली आहे. ◂(वृत्तसंस्था)



ओला कंपनीने इलेक्ट्रिक स्कूटरनंतर आता इलेक्ट्रिक बाईक बाजारात उतरवली आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी भावेश अग्रवाल यांनी बुधवारी याबाबत घोषणा केली

# रामललाचे दर्शन आता सकाळी ६ ते रात्री १० पर्यंत

## फक्त १५ मिनिटांसाठी द्वार बंद होणार

◆ **अयोध्या, ५ फेब्रुवारी**



अयोध्येत रामललाच्या दर्शनाचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे. आता मंदिर दररोज सुमारे १६ तास खुले राहील. शृंगार आरतीनंतर, मंदिराचे दरवाजे सकाळी ६ वाजता भाविकांसाठी उघडतील. रात्री १० वाजेपर्यंत रामलला दर्शन देतील.

या काळात सायंकाळच्या आरतीसाठी फक्त १५ मिनिटे बंद द्वार बंद असतील. पूर्वी मंदिर सकाळी ७ ते रात्री ९.३० पर्यंत उघडे असायचे. म्हणजेच आता भाविकांना रामललाच्या दर्शनासाठी दीड तास जास्त वेळ मिळेल.

प्रयागराज महाकुंभातून परतणाऱ्या भाविकांच्या गर्दीमुळे वेळापत्रकात बदल करण्यात आल्याचे राम मंदिर ट्रस्टने म्हटले आहे.

रामललाची मंगला आरती पहाटे ४ वाजता होईल. यानंतर दरवाजे बंद केले जातील. दरवाजे सकाळी ६ वाजता उघडतील. शृंगार आरती होईल. यानंतर भाविकांना रामललाचे दर्शन घेता येईल. दुपारी १२ वाजता भोग आरती होईल. यानंतर, भाविकांना पुन्हा रामललाचे दर्शन घेता येईल.

संध्याकाळी ७:०० वाजता संध्याकाळची आरती होईल. या काळात मंदिराचे दरवाजे १५ मिनिटांसाठी बंद राहतील. रात्री १० वाजता शयन आरती होईल. यानंतर मंदिराचे बंद केले जातील. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे अधिकाधिक भाविकांना रामललाचे दर्शन घेता येईल. दर्शनाचा कालावधी सकाळी अर्धा तास आणि सायंकाळी एक तासाने वाढवण्यात आला आहे. ◂(वृत्तसंस्था)

## तिरुपती मंदिर समितीने १८ गैरहिंदू कर्मचाऱ्यांना हटवले

◆ **तिरुपती, ५ फेब्रुवारी**

तिरुमला तिरुपती देवस्थानम्‌ मंदिर समितीने मंदिरात कार्यरत गैरहिंदू कर्मचाऱ्यांसाठी नवा ठराव मान्य केला आहे. या ठरावानुसार मंदिरात काम करणाऱ्या १८ गैरहिंदू कर्मचाऱ्यांना हटवण्यात आले आहे.

त्यांच्यासमोर आंध्रप्रदेशच्या इतर सरकारी विभागांमध्ये नोकरीचा पर्याय स्वीकारा किंवा स्वेच्छानिवृत्ती घ्या, असे दोन पर्याय ठेवले आहेत. या निर्णयाची सर्वत्र चर्चा रंगली आहे.

काही महिन्यांपूर्वी चंद्राबाबू नायडूंनी या मंदिराच्या प्रसाद लाडूंमध्ये वायएसआर सरकार असताना शुद्ध तुपाऐवजी जनावरांची चरबी वापरण्यात आली, असा आरोप केला होता. ज्यामुळे एकच खळबळ माजली होती. आता मंदिर समितीने १८ गैरहिंदू कर्मचाऱ्यांना हटवले आहे. तिरुमला तिरुपती देवस्थानम् स्वतंत्र सरकारी विश्वस्त मंडळ आहे. देवस्थानच्या नियमांमध्ये तीनवेळा दुरुस्ती करण्यात आली. १९८९ मध्ये या मंदिराशी संबंधित एका आदेशात नमूद करण्यात आले आहे की, मंदिर प्रशासनाच्या प्रशासकीय पदांवर फक्त हिंदूंचीच नियुक्ती झाली पाहिजे. मंदिर प्रशासकीय सेवेतील सात हजार कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांपैकी ३०० जणांना हा बदल स्वीकारावा लागेल. ◂(वृत्तसंस्था)

# संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार परिषदेतून अमेरिका बाहेर

## ट्रम्प यांची घोषणा

## पॅलेस्टिनी निर्वासितांचा निधी बंद

◆ **वॉशिंग्टन, ५ फेब्रुवारी**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंतर्गत काम करणारी मानवाधिकार परिषद अर्थात् यूएनएचआरसी आणि पॅलेस्टिनी शरणार्थींसाठी मदत करणारी संयुक्त राष्ट्राची मदत व कार्य संस्था अर्थात् यूएनआरडब्ल्यूएमधून बाहेर पडण्याची घोषणा मंगळवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. दोन्ही संस्थांना यापुढे अमेरिकेकडून देण्यात येणारा निधी बंद करण्यात येणार आहे.

ट्रम्प यांनी दोन्ही संस्थांमधून बाहेर पडण्याच्या आणि निधी गोठविण्याच्या कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. ७ ऑक्टोबर २०२३ मध्ये दक्षिण इस्रायलमध्ये हल्ला करून तेथील नागरिकांचे अपहरण करणाऱ्या हमासच्या दहशतवाद्यांना आश्रय दिल्याचा आरोप या संस्थांवर करण्यात आला.



अमेरिकेने यापूर्वीच जीनेव्हा येथील मानवाधिकार परिषदेसह पॅलेस्टिनी निर्वासितांना मदत करणाऱ्या यूएनआरडब्ल्यूए संस्थेला निधी देणे बंद केले. दोन्ही जागतिक संस्था इस्रायलविरोधात पक्षपाती भूमिका घेत असल्याचा आणि यहुदीविरोधात असल्याचा आरोप इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी केला. व्हाईट हाऊसमध्ये नेतान्याहू आणि ट्रम्प यांची भेट झाल्यानंतर दोन्ही संस्थांमधून अमेरिका बाहेर पडत असल्याची घोषणा करण्यात आली हे विशेष.

**निधीत प्रचंड असमानता**

ट्रम्प यांनी जारी केलेल्या कार्यकारी आदेशात म्हटले की, जागतिक संस्थांमध्ये मोठी क्षमता असताना संयुक्त राष्ट्र त्याचे योग्य व्यवस्थापन आणि नियोजन करण्यात अपयशी ठरली आहे. शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात युनेस्कोचा सहभाग आणि विविध देशांमधील निधीत असेलेली प्रचंड असमानता याचा आढावा घेण्याची गरज आहे. विशेष म्हणजे संयुक्त राष्ट्राच्या नियमित अर्थसंकल्पातील २२ टक्के निधी अमेरिका देते, तर दुसऱ्या क्रमांकावर चीनचे योगदान आहे.

> ट्रम्प यांच्या मंगळवारच्या आदेशाने फारसा परिणाम होणार नाही. कारण, अमेरिका मानवाधिकार परिषदेतून आधीच बाहेर पडला असून तो सदस्य नाही.
>
> **पास्कल सिम,**
> मानवाधिकार परिषद, संयुक्त राष्ट्र

**निष्पक्षतेचा अभाव**

प्रसार माध्यमांशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, संयुक्त राष्ट्र सध्या क्षमतेनुसार काम करीत नाही. त्यांनी सर्वांसाठी समान धोरणानुसार आणि निष्पक्ष राहून काम करणे अपेक्षित आहे. मात्र, काही देशांसाठी त्यांचे धोरण बदलते आणि त्यांनाच प्राधान्य दिले जाते. मी त्या देशाचे नाव घेऊ इच्छित नाही. इस्रायलचा आरोप आहे की, गाझातील यूएनआरडब्ल्यूएतील १३ हजार कर्मचाऱ्यांपैकी १९ जणांनी हमासच्या बाजूने युद्धात सहभाग घेतला होता. संयुक्त राष्ट्राच्या चौकशीत नऊ जणांचा सहभाग आढळून आला होता. ◂(वृत्तसंस्था)

### आतापर्यंत काय घडले?

- यापूर्वी ट्रम्प राष्ट्राध्यक्ष असताना जून २०१८ मध्ये मानवाधिकार परिषदेतून अमेरिका बाहेर पडली
- त्यावेळच्या अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री निक्की हिली यांनी संयुक्त राष्ट्रावर इस्रायलविरोधात पक्षपात केल्याचा आरोप केला.
- ज्यो बायडेन राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर ऑक्टोबर २०२१ मध्ये मानवाधिकार परिषदेला पाठिंबा देत निधी सुरू केला होता. ■




# महाकुंभासाठी विमान तिकिटे आता ४० टक्के स्वस्त



## हॉटेल्समधील ॲडव्हान्स बुकिंग रद्द, दरही घसरले

महाकुंभातील मौनी अमावास्येच्या रात्री झालेल्या चेंगराचेंगरीनंतर, जत्रेवर आणि शहराच्या अर्थव्यवस्थेवरही मोठा परिणाम झाला. येणाऱ्या भाविकांची संख्या पूर्वीसारखी राहिलेली नाही. यामध्ये घट झाली आहे.

दुकानदारांच्या विक्रीत ४० टक्क्यांनी घट झाली आहे. विमान तिकिटांचे दर ४० टक्क्यांपर्यंत कमी झाले. मौनी अमावास्येला हॉटेल चालकांनी वाढवलेले दर कमी झाले आहेत. यापूर्वी केलेले सर्व आगाऊ बुकिंग रद्द करण्यात आले आहेत.

चेंगराचेंगरीनंतरच्या परिस्थितीमुळे इतर राज्यांमधून कमी लोक प्रयागराजला येत आहेत. त्यामुळे हॉटेल बुकिंगमध्ये घट झाली आहे. प्रयागराजमध्ये सुमारे २५० लहान-मोठी हॉटेल्स आहेत. संगम परिसरातील तंबू शहर आणि जवळच्या हॉटेल्सनी मौनी अमावास्येला खोलीचे दर २० ते ३० टक्क्यांनी वाढवले होते.

आता लोकांच्या कमतरतेमुळे वाढलेले दर कमी करण्यात आले आहेत. संगम वगळता इतर भागांतील हॉटेल्सचे दर पूर्वीसारखेच आहेत. पण, येथील बुकिंगची परिस्थितीही फारशी चांगली नाही. हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशनचे अध्यक्ष हरजिंदरसिंग म्हणाले की, चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर हॉटेलमधील बुकिंग रद्द करण्यात आली आहेत. परिस्थिती सुधारल्यावर त्यांना कळवण्यास त्यांनी आम्हाला सांगितले आहे.

हॉटेल व्यावसायिक रौनक गुप्ता म्हणतात, चेंगराचेंगरीनंतर प्रयागराज पोलिसांनी जिल्ह्याच्या प्रवेशद्वारांवर सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. वाहनांना आत येऊ दिले जात नाही. जे लोक त्यांच्या कुटुंबासह कारने येथे येत आहेत त्यांना प्रवेश बिंदूवरच थांबवले जात आहे. लोक सीमेवर त्यांची वाहने पार्क करू शकत नाहीत आणि त्यांचे सर्व सामान घेऊन पायी येऊ शकत नाहीत. यामुळे हॉटेल बुकिंग रद्द होत आहेत. ■

## मेळा परिसरातील दुकानातील विक्री निम्म्यावर

महाकुंभ परिसरात पाच हजारांहून अधिक दुकानदार आहेत. चेंगराचेंगरीनंतर गर्दी कमी झाल्यामुळे त्यांच्या विक्रीवर परिणाम झाला आहे. संगम नाक्याजवळ पिशव्या विकणाऱ्या एका दुकानदाराने सांगितले की, विक्री ६० टक्क्यांनी कमी झाली आहे. पूर्वीइतके ग्राहक राहिलेले नाहीत. संगम नाक्यावर पाय ठेवायलाही जागा नव्हती, पण आता लोक आरामात आंघोळ करीत आहेत. इथे दुकान असलेले राम गोपाल म्हणतात की व्यवसायात घट झाली आहे. पूर्वी आम्ही २-३ हजार रुपयांचे प्लॅस्टिकच्या कॅन विकत होतो. आता मी दररोज फक्त १०००-१५०० रुपये कमवत आहे. सगळे गावाला जात आहेत. जत्रेतील लोकांची संख्या कमी झाली आहे. मेळ्यात स्वीट कॉर्न विकणारे मॅकुअलाल म्हणतात की आता पूर्वीसारखे ग्राहक येत नाहीत. ■



## मार्ग वळवल्यामुळे प्रवास बुकिंगवर परिणाम

२८-२९ जानेवारी रोजी मौनी अमावास्येच्या रात्री चेंगराचेंगरी झाली तेव्हा पोलिस प्रशासनाने २९ जानेवारी दिवसा प्रयागराजच्या सीमा सील केल्या. जेव्हा ही बातमी देशभर पसरली तेव्हा महाकुंभाला येणारे भाविक चिंतेत पडले. तथापि, ३१ जानेवारी रोजी, प्रयागराजच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पुष्टी केली की मार्ग बंद नाहीत, तर फक्त वळवले आहेत. वळवल्यामुळे, प्रयागराजच्या सीमेवर लांब वाहतूक कोंडी होते. चेंगराचेंगरीनंतर बाहेरून लोक प्रयागराजला येत नाहीत. चार दिवसांच्या टूरसाठी आलेले लोक अवघ्या दोन दिवसांत परतत आहेत. अयोध्येसाठी आणि वाराणसीसाठी बरेच बुकिंग रद्द करण्यात आले आहेत. याचे कारण म्हणजे, प्रयागराज पोलिसांनी झुसी पुलावरून वाहने वळवली आहेत. ■

# डोळ्यांवर पट्टी बांधून पेंटिंग करणारी कलावंत

बिहारमधील दरभंगा येथील मोनिका गुप्ता प्रयागराजच्या महाकुंभात आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधून मोठ्या कॅनव्हासवर देवी-देवतांचे चित्र साकारते आहे. याशिवाय ती दोन्ही डोळे बंद करून जमिनीवर रांगोळीसुद्धा साकारताना दिसते आहे. आपल्या या अनोख्या कलाकारीने ती लोकांच्या चर्चेचा विषय ठरली आहे.

मोनिकाने सांगितले की, ही कला तिने आपली मोठी बहीण निशाकडून शिकली आहे. मागील आठ वर्षांपासून ती हे काम करते आहे. तिची बहीण, भाऊ आणि आई सारेच पेंटिंग करतात.

मोनिका योग-ध्यानही करते. योगाद्वारेच तिने त्रिनेत्र जागृत करण्यात यश मिळवले आहे. याच आधारे ती अगदी दोन्ही डोळ्यांवर कापूस ठेवून आणि नंतर त्यावर काळी पट्टी बांधूनही अगदी सहजपणे चित्र साकारू शकते. एवढेच नाही तर रांगोळीही काढू शकते. यापूर्वी, मोनिकाने अयोध्येत श्रीरामलला प्राणप्रतिष्ठेच्या वेळीही डोळ्यांवर पट्टी बांधून भगवान श्रीरामांची रांगोळी साकारली होती.



मोनिकाने रसायनशास्त्र विषयात बी. एस्सी. केले असून, सध्या ती एम. एस्सी. करते आहे. लहानपणी तिची आई महाभारताच्या गोष्टी सांगायची. महाभारतातील संजय आणि अर्जुन या दोन्हींपासून ती अतिशय प्रभावित होती. वयाच्या चौथ्या वर्षापासूनच तिने डोळे बंद करून काम करण्याचा सराव सुरू केला होता. सातव्या वर्षीपर्यंत तिला यात बऱ्यापैकी यश मिळाले होते. ■

# महाकुंभानंतर नागा साधू नेमके कुठे जातात?

**नागा बाबाने सगळे रहस्य उलगडले**

महाकुंभात तीन अमृत स्नान पूर्ण झाले आहेत आणि आता आखाडे रिकामे होण्यास सुरुवात झाली आहे. महाकुंभमधील सर्वांत मोठे आकर्षण नागा साधूच होते. अनेकांच्या मनात प्रश्न येतो की, हजारो-लाखोंच्या संख्येने येणारे नागा साधू अमृत स्नानानंतर कुठे गायब होतात? निरंजनी आखाड्याचे नागा बाबा दिगंबर दर्शन गिरीजी महाराज यांनी याचा खुलासा आहे. यामध्ये त्यांनी नागा साधू नेमके कुठे जातात? आणि काय करतात, हे सांगितले आहे.

दिगंबर दर्शन गिरीजी महाराजांनी सांगितले की, तीन अमृत स्नान झाले आहेत आणि एक स्नान बाकी आहे, गुरू बंधू त्रिवेणीत होणाऱ्या वेगळ्या स्नानासाठी जातात जे त्रिवेणीत पार पडते. त्यानंतर छावणीत परत येतात. त्यानंतर पंच परमेश्वराची प्रक्रिया ७ तारखेपर्यंत चालू राहते. नवीन पंच निवडला जातो आणि ७ तारखेला पूजा-हवन केल्यानंतर आम्ही काशीकडे निघतो.

**काशीत साजरी केली जाते होळी आणि महाशिवरात्री**

काशीमध्ये आमचे स्थायी आखाडे आहेत तिथे महाशिवरात्री मेळा आणि मसान होळी साजरी करून आम्ही आमच्या ठिकाणांसाठी निघतो. त्यांनी सांगितले, शिवरात्री आणि होळी फक्त नागांच्या काशीमध्येच साजरी केली जाते. तिथे महादेवाला अभिषेक केल्यानंतर ते आखाड्यात येतात. होळी खेळल्यानंतर, आम्ही तिथून हरिद्वारला निघतो. नागा साधू भारताच्या विविध ठिकाणी राहतात. देशाच्या वेगवेगळ्या भागांत काही साधू त्यांच्या गुरूंच्या आखाड्यात सेवा करतात. काही जण हिमालय, केदारनाथ, बद्रीनाथ, हिमाचल, जम्मू-काश्मीर, नर्मदखंड येथे जातात, तर काही जण नेपाळला जातात, जिथे त्यांचे कायमचे वास्तव्य आहे. जिथे जिथे लोकांना आसक्ती असते तिथे ते जातात, म्हणजेच ते चारही दिशांना पसरतात. त्यांचे काम म्हणजे साधना आणि उद्देश फक्त एकच तो म्हणजे सनातन धर्माचा प्रचार, प्रसार करणे. ■

## चित्रपट वार्ता

### केस कापल्यामुळे ट्रोल झाली कीर्ती

**मुंबई** : ‘पिंक’, ‘मिशन मंगल’सारख्या चित्रपटांत झळकलेली अभिनेत्री कीर्ती कुल्हारी नुकतीच आर. माधवनसोबत ‘हिसाब बराबर’मध्ये दिसते आहे. ही मालिका संपताच कीर्तीने केस कापले आणि त्यानंतर तिच्यावर उलटसुलट प्रतिक्रियांचा नुसता भडिमार सुरू झाला. अभिनेत्री असूनही तिने बॉबकट केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. तिने नुकतेच याविषयी एका मुलाखतीत भाष्य केले. ती म्हणाली, मला केस कापल्यानंतर काही चांगल्या प्रतिक्रिया आल्या आणि काहींनी टोकाची टीकाही केली. टीका करणाऱ्यांनी मला असेही म्हटले की आता मी लेस्बियन असल्याचे जाहीर करणार आहे की काय? माझे केस लांब असतील तर मी लेस्बियन नाही आणि जर शॉर्ट केले, तर मी लेस्बियन झाले? मला या लोकांच्या विचारांमुळे अतिशय आश्चर्य वाटल्याचे ती सांगते. ■




### नोरा फतेहीच्या मृत्यूची अफवा

**मुंबई** : बॉलिवूड सेलिब्रिटींचे फेक छायाचित्र आणि व्हिडीओ बरेचदा समाज माध्यमांवर व्हायरल होत असतात. यावेळी नोरा फतेही लक्ष्य बनली आहे. समाज माध्यमांवर एक व्हिडीओ फिरतो आहे. यात दावा केला जात आहे की, नोराने बंजी जंपिंग केले आणि त्याच दरम्यान अपघातात तिचा मृत्यू झाला. नोराच्या नावाने व्हायरल झालेल्या या व्हिडीओतील मुलगी नोरा नक्कीच नाही. हा कोणता तरी जुना व्हिडीओ असून, नोराच्या नावाने खपवला जात आहे. नोराचा व्हिडीओ म्हणून लाखो जणांनी तो वारंवार पाहिला. ■



### शाहिदला ‘विवाह’ नव्हता करायचा!

**मुंबई** : सुरज बडजात्या यांच्या कौटुंबिक चित्रपटांनी भारतीयांच्या मनात स्वत:चे एक अढळ स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या चित्रपटातील सोज्वळपणा कायमच भारतीयांना भावला आहे. २००६ मध्ये आलेल्या ‘विवाह’ चित्रपटाबाबतही प्रेक्षकांचे प्रेम आजही कायम आहे. यात शाहिद कपूर मुख्य भूमिकेत होता. हा चित्रपट चांगला चालला. मात्र, एक वेळ अशीही आली होती की चित्रीकरणादरम्यान शाहिदने स्वत: बडजात्यांना म्हटले होते की मला चित्रपटातून काढून टाका. याविषयी शाहिद सांगतो की, माझा तो काळ अतिशय वाईट होता. माझे तीन चित्रपट अगदी ओळीने फ्लॉप ठरले होते. म्हणून मी बडजात्यांना म्हटले की, माझ्याऐवजी दुसऱ्या कोणाला घ्या. त्यांना माझ्यावर विश्वास होता. ते मला म्हणाले, तू फक्त तुझे काम कर. बाकीचे मी बघतो. त्यांनी मला संधी दिली त्यामुळे तो माझ्यासाठी अविस्मरणीय क्षण आहे. ■



## अग्रलेख...

# अर्बन नक्षल्यांबद्दलच्या प्रेमाचे न उमजणारे कोडे

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर लोकसभेत झालेल्या दोन दिवसांच्या चर्चेला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या ओघवत्या शैलीत कुणाचेही नाव न घेता गांधी घराणे, काँग्रेस पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांना चांगलेच आडव्या हाताने घेतले. संविधानाचे नाव घ्यायचे, हातात संविधानाची प्रत बाळगायची आणि घटनाविरोधी कृत्ये करायची, हे धोरणच या साऱ्यांनी गेल्या काही काळापासून भारतीय राजकारणात राबवले आहे. पंतप्रधानांनी म्हटल्याप्रमाणे शहरी नक्षलवाद्यांना संविधान समजू शकत नाही, ही बाब यापूर्वीही अनेकवार अधोरेखित झाली आहे. देशातील अनेक राजकारण्यांवर या विचारांचे गारुड रुंजी घालत आहे. स्वतः मुख्यमंत्री असताना अरविंद केजरीवाल यांनी नवी दिल्लीत रस्त्यावर उतरून केलेले आंदोलन देशाची जनता आजही विसरलेली नाही. अर्बन नक्षल्यांच्या पाठिंब्याने दिल्लीत झालेल्या शाहीनबाग आंदोलनाला काँग्रेस आणि आम आदमी पार्टीची फूस होती हे लपून राहिलेले नाही. किसान आंदोलनामागील शक्तीही उजागर झाल्या, ज्यांची जवळीक अर्बन नक्षलवाद्यांशी होती. देशात ठिकठिकाणी होणारी आंदोलने आणि त्यामागील शक्ती ज्या पूर्वी ओळखणे दुरापास्त होते, ते मोदींच्या कार्यकाळापासून सहजसाध्य झाले आहे. या साऱ्या शक्तींची बोलण्याची भाषा एक आणि कृती मात्र देशविरोधी असते. म्हणूनच पंतप्रधानांना म्हणावे लागले की, भारतीय संघराज्याविरुद्ध लढायची घोषणा करणारे संविधानातील भावना समजू शकत नाहीत. देशाची एकता, अखंडता काय हेदेखील समजू शकत नाही. संविधानाचे नाव घ्यायचे, गरिबांबद्दल कणव असल्याचे दाखवायचे आणि शिशमहल उभारायचा, दारू घोटाळा करायचा, मंत्र्यांच्या घोटाळ्यांवर पांघरूण घालायचे, सातत्याने केंद्र सरकारसोबत पंगा घेण्याचे केजरीवालांचे राजकारण आपण बघितले आहे. आता तर विरोधी पक्षनेते राहुल गांधी हेदेखील त्याच मार्गाने निघाले आहेत. आम आदमी पार्टी आणि काँग्रेस यांच्यात कोण अर्बन नक्षल्यांच्या जास्त जवळ आहे, हे दाखवून देणारी कृती करण्याची स्पर्धाच लागली आहे. काँग्रेसने गतकाळात आणि वेळोवेळी गरिबी हटावचा नारा दिला पण कधीच देशातील गरिबी हटविली नाही. सातत्याने भांडवलशाही आणि घराणेशाहीचे राजकारण केले. सत्ता शाबूत ठेवण्यासाठी गावगुंड, अर्बन नक्षल, माओवादी, मार्केट फोर्सेस, सांस्कृतिक मार्क्सवाद, डीप फेक, बाह्य शक्ती, जिहाद्यांची मदत घेतली. आता तर काँग्रेसचे युवराज डाव्या विचारसरणीच्या कोंडाळ्यामध्ये पुरते फसलेले दिसत आहेत. आम्ही तर म्हणतो राहुल गांधींच्या रूपात सात दशकांनंतर हिंसक आणि देशद्रोही नक्षलवादी चळवळीला नेतृत्व प्राप्त झाले आहे. त्यांनी इंडियन स्टेटविरुद्ध पुकारलेल्या 'एल्गार'मुळे काँग्रेसच्या अत्यंत घातक आणि अराष्ट्रीय मानसिकतेचे दर्शन घडत आहे. आपण असेही म्हणून शकतो की, त्यांच्या वेळोवेळीच्या हिंदूविरोधी, कम्युनिस्टधार्जिण्या कृतींमुळे देशातून नाहीशा होत चाललेल्या नक्षल चळवळीला जणू काही अघोषित नेतृत्वच झाले आहे.

राहुल गांधी, अरविंद केजरीवाल, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव आदी इंडिया आघाडीतील नेते मंडळींनी ज्या शहरी नक्षलवाद्यांना अभय दिलेले आहे, त्यांनी देशाच्या शैक्षणिक क्षेत्रात नुसता हैदोस घातला आहे. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील डाव्या विचारांच्या आणि काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनांचा राष्ट्रविरोधी कृत्यांमध्ये असलेला सहभाग लपून राहिलेला नाही. जी जी म्हणून राष्ट्रीय प्रतीके आहेत, ती नाकारण्याचा धंदाच यांनी आरंभला आहे. एकीकडे महाराष्ट्रासह देशभरात नक्षल चळवळ नेस्तनाबूत होत असताना शहरी नक्षलवादी आणि त्यांच्यामार्फत नक्षलवाद्यांना मिळणारे सैद्धांतिक पाठबळ कसे काय खपवून घेतले जाऊ शकते? आज जगभरातील हिंदूंना आपल्या हिंदू असण्याबद्दल गौरव वाटत असताना, ही मंडळी साऱ्या अहिंदू कृत्यांची री ओढत आहेत. वर्षानुवर्षे शहरी नक्षलवाद हा आपल्यामध्ये उच्चभ्रू मुखवटा घेऊन उजळ माथ्याने वावरत आहे. आजपर्यंत व्यवस्थेवर काँग्रेस आणि डाव्या विचारसरणीच्या लोकांचे वर्चस्व असल्याने त्यांच्याद्वारे पोषित शहरी नक्षलवाद सर्व व्यवस्थांमध्ये खोलवर रुजला. कधी भांडवलदारांना विरोध करणे, कधी पर्यावरणाचा मुद्दा उपस्थित करून विकास प्रकल्पांना विरोध करणे, कधी वनवासींच्या अस्मितेचा मुद्दा मांडून ग्रामीण भागातील विकास प्रकल्पांना विरोध करणे, कधी शेतकऱ्यांच्या गरिबीचा मुद्दा उपस्थित करून रासायनिक खते आणि औषधांना विरोध करणे, अशा एक ना अनेक मुद्यांचे भांडवल करून, जनतेत कायम अस्वस्थता निर्माण करायची आणि त्यांना सरकारविरुद्ध पेटवायचे, हा शहरी नक्षलवाद्यांच्या कार्यप्रणालीचा भाग झालेला आहे. भारतीय शिक्षणव्यवस्था पाश्चिमात्यांच्या मानसिकतेच्या चौकटीत अडकवून ठेवण्याचे काम शहरी नक्षलवाद्यांनी बेमालूमपणे केले. आज आपली तरुण पिढी जो इतिहास शिकते आहे, तो डाव्या विचारसरणीने कलुषित केलेला आहे. याचा परिणाम असा झाला की येथील विद्यार्थ्यांना आपल्याच इतिहासाचा, संस्कृतीचा, धर्माचा, आपल्या तत्त्वज्ञानाचा, आपल्या साध्या जावनशैलीचा विसर पडलेला दिसतोय. भारताची परंपरा सर्व विचारांचे स्वागत करणारी असली तरी यात स्वतःच्या अस्तित्वाचे व मूळ भारतीय विचारांचे विस्मरण व्हावे, असा निश्चितच याचा अर्थ होत नाही. माओवाद्यांनी कायम भारताच्या अस्तित्वावर घाला घातला व यासाठी त्यांनी परिणामकारक पद्धतीने शिक्षण प्रणालीच्या माध्यमातून भारतीयांना स्व:चे विस्मरण करायला भाग पाडले. भारतीयत्वाचे अर्थात् राष्ट्रीयत्वाचे अर्थात् हिंदुत्वाचे विस्मरण झाल्याने आपल्याच प्रथा, परंपरांबद्दल आक्षेप घेणारे अभारतीय निर्माण झाले. काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खडगे यांनी केलेले वक्तव्य याठिकाणी उपस्थित केले जायला हवे. खडगे महाशय म्हणतात, गंगेत डुबकी लावल्याने देशातील गरिबी नाहीशी होईल का? त्यांचे म्हणणे याच विचारसरणीचे समर्थन करणारे आहे. ते म्हणतात त्या प्रमाणे गंगेत डुबकी मारल्याने गरिबी नाहीशी होणार नसली तर त्या मिळालेल्या ऊर्जेत लक्षावधी लोकांची बेरोजगारी दूर करण्याची निर्माण होणारी धर्मशक्ती कशी काय दुर्लक्षित केली जाऊ शकते? एकीकडे शासनाला धोरणलकवा झाल्याचा आरोप करायचा आणि एखादी कृती केली किंवा निर्णय घेतला तर त्याविरुद्ध हो हल्ला करायचा, संपाची हाळी द्यायची, आंदोलनाचा इशारा द्यायचा, यातसुद्धा शहरी नक्षलवाद्यांचा हातखंडा आहे. कुठल्याही शासकीय निर्णयाविरुद्ध कधी आदिवासींना उकसवायचे, कधी शेतकऱ्यांचा मुद्दा उपस्थित करायचा, कधी महिलांच्या गळचेपीचा मुद्दा लावून धरायचा आणि कधी मागासवर्गीय, अनुसूचित जाती, धार्मिक अल्पसंख्यक आदींचा मुद्दा आळवायचा हे त्यांना वर्षानुवर्षांच्या अनुभवाने चांगलेच ठावूक झालेले आहे. मुळात १०० वर्षांचा इसिहास असलेल्या काँग्रेस पक्षाने आणि या पक्षाच्या नेतृत्वाने शहरी नक्षलवाद्यांसोबत उभेच का म्हणून राहावे, हा खरा प्रश्न आहे. शहरी नक्षलवाद आता अखेरचे आचके देऊ लागला आहे. त्याच्या पाठिंब्याने सुरू झालेली नक्षलवादी चळवळ आता देशातील उण्यापुऱ्या ८-१० जिल्ह्यांपुरती उरलेली आहे. कर्नाटक राज्यातील अखेरच्या नक्षलवाद्याने शरणागती पत्करल्याने हे राज्य नक्षलमुक्त म्हणून घोषित करण्यात आले आहे. नक्षल्यांचा बालेकिल्ला असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातही नक्षलवादाला अखेरची घरघर लागली आहे. या परिस्थितीत काँग्रेस पक्षाकडून त्यांना मिळणारी रसद अजूनही का थांबलेली नाही, हा शोधाचा विषय आहे. राहुल गांधी यांच्या विधानांकडे केवळ 'बालिश' आणि 'अज्ञानी' या भूमिकेतून बघून चालणार नाही. लोकसभेचे विरोधी पक्षनेतेपद भूषविणारा हा आधुनिक चारू मुझुमदार देशासमोरील अत्यंत गंभीर संकट म्हणून उभा ठाकला आहे, ही बाब ध्यानात घेतली जायला हवी. चारू मुझुमदार हे नक्षल चळवळीचे जनक होते. त्यांच्याच पुढाकारातून नक्षल चळवळ सुरू झाली. प्रारंभी केवळ सरकारी यंत्रणा आणि भांडवलदारांविरोधात उभ्या ठाकलेल्या नक्षलवादाला कधी आणि केव्हा आपल्याच बांधवांच्या रक्ताची चटक लागली हे कळलेच नाही. जेव्हा आपल्याच बांधवांच्या रक्ताला चटावलेल्या नक्षल चळवळीचा बुरखा फाटायला लागला तसतशी या चळवळीबद्दलची वनवासींची सहानुभूतीही आटू लागली. त्यांच्याबद्दलचे आटलेले प्रेम राहुल गांधी आणि त्यांचा पक्ष पुन्हा का मिळवून देऊ पाहात आहे, हे न उमजणारे कोडे आहे?

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# शुद्धी सभेची स्थापना

पाच दिवसांनी येणाऱ्या ११ फेब्रुवारी या दिवसाचे खरे तर विशेष महत्त्व आहे. पण काळाच्या ओघात अनेक घटना व्यक्ती, समाजाच्या विस्मृतीत जातात. त्यातही इतिहासाची मोडतोड करून ठरावीक विचारसरणी, विशिष्ट व्यक्ती समूह आणि एकारलेल्या अब्राहमिक धर्मांचेच हित साधण्यासाठी सगळी बुद्धिमत्ता गहाण टाकण्याच्या काळात तर सामाजिक विस्मृती विशेषत्वाने लक्षात येते. राज्यकर्ता पक्ष आणि त्याच्या नेत्यांचे यामुळेच भले होत असते. या देशात स्वातंत्र्यापासून असेच लोक सत्तेवर होते. त्यांनी डाव्या विचारसरणीच्या लोकांना समाजाच्या डोळ्यापुढे सातत्याने असत्य कथन करीत एक पडदा उभा करण्याच्या बोलीवर, या देशातील शिक्षण व्यवस्था आंदण देऊन टाकली. परिणामतः काँग्रेस पक्षाचे ज्या लोकांशी मतभेद होते किंवा ज्यांनी कोणत्याही कारणाने गांधी-नेहरू यांना विरोध केला त्यांचे कर्तृत्व पुसून टाकण्याचाच प्रयत्न केला गेला. ज्यांचे कार्यकर्तृत्व पुसून टाकण्याचा प्रयत्न केला गेला, अशाच अनेक लोकांपैकी एक म्हणजे स्वामी श्रद्धानंद. ११ फेब्रुवारी १९२३ ला त्यांनी भारतीय शुद्धी सभेची स्थापना केली. त्या दिवसापासूनच त्यांनी आपल्या शुद्धीकरण आंदोलनाला सुरुवात केली. ज्याप्रमाणे मुसलमानांना आणि ख्रिश्चनांना हिंदूचे धर्मांतरण करण्याचा अधिकार आहे, त्याप्रमाणे मलाही त्यांचे शुद्धीकरण करून त्यांना स्वधर्मात परत घेण्याचा अधिकार आहे. भूतकाळात घडलेल्या कोणत्याही कारणाने जर माझे कोणी हिंदू बांधव धर्मांतरित झाले असतील तर त्यांना परत हिंदू धर्मात घेणे हे माझे कर्तव्य ठरते. त्यांना हिंदू धर्मात परत येण्याचा हक्क आहे. सनातन धर्मात प्राचीन काळापासून ही प्रथा अस्तित्वात आहे, असे ते सांगत असत.

१९१२ मध्ये ते कलकत्ता प्रांताच्या प्रवासात असताना त्यांचे या प्रश्नांकडे लक्ष गेले. १९११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारावर कर्नल मुखर्जी यांनी एक सिद्धांत मांडला होता; ज्याद्वारे मुखर्जींनी असे प्रतिपादन केले की, जर हिंदूंची संख्या याच वेगाने कमी होत राहिली तर, ४०० वर्षांनंतर या देशात हिंदू समाजाचे अस्तित्व शिल्लक उरणार नाही. या सिद्धांताचा स्वामी श्रद्धानंदांनी सखोल अभ्यास केला आणि ते या निष्कर्षाप्रत पोहोचले की, यासाठी हिंदू समाजाने संघटित होणे आवश्यक आहे. संघटित होऊन हिंदू समाजाने आपल्यातील सामाजिक विषमता, जातिवाद, अस्पृश्यता आणि स्त्री अवहेलना आदी दोषांचे निराकरण केले पाहिजे तसेच परधर्मात गेलेल्या वा हिंदू धर्मात येऊ इच्छिणाऱ्या सर्वांना हिंदू धर्मात सामावून घेतले पाहिजे. हिंदू धर्मात शुद्धीकरणाची व्यवस्था प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. यासाठी ते याज्ञवल्क्य स्मृती, मनुस्मृती, देवल स्मृती, पाराशर स्मृती, बृहस्पती स्मृती, यम स्मृतीचे दाखले देऊन अहिंदूंना हिंदू करून घ्यावे म्हणून हिरिरीने प्रचार करू लागले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यातही शुद्धीकरण करून अहिंदूंना हिंदू करून घेत असत; याचे दाखले ते आपल्या भाषणात देत असत. १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाजांनी शुद्धीकरणासाठी एक स्वतंत्र व्यवस्था उभी केली होती. हे कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यास 'पंडितराव' असे संबोधले जात असे.



याच काळात त्यांच्या एका शिष्याने त्यांना ख्वाजा हसन निजामी यांनी लिहिलेले 'दाइ-ए-इस्लाम' हे पुस्तक दिले. हे पुस्तक अत्यंत गोपनीयपणे भारतात फक्त मुसलमानांनाच वितरित करण्यात आले होते; ज्यात हरप्रकारे हिंदूंना इस्लाममध्ये धर्मांतरित करण्याचे आवाहन करण्यात आले होते. विशेष म्हणजे या पुस्तकात तेव्हा संख्येने सात कोटी असलेले दलित अस्पृश्य हा या धर्मपरिवर्तन करण्यासाठी सगळ्यात सोपा लोकसमूह आहे, हे हिरिरीने सांगण्यात आले होते. विविध हिंदू लोकसमूहांना मुसलमान करायचे. दुसरे म्हणजे आपली लोकसंख्या वाढवत न्यायची. मग हिंदूंच्या बरोबरीने राजकीय अधिकार मागायचे. याद्वारे मुस्लिम लोकसंख्या वाढवून 'दार-उल-हरब'ची निर्मिती करायची, अशी कारस्थानी व्यूहरचना या पुस्तकात सांगितली होती. त्याने अस्वस्थ झालेल्या स्वामी श्रद्धानंदांनी शुद्धी सभेची स्थापना करून शुद्धीकरण चळवळीला वेग दिला. त्या योगे १९२३ च्या अखेरपर्यंत उत्तर भारतात जवळजवळ ३० हजार मुसलमानांना हिंदू समाजात परत आणण्यात त्यांना यश आले. शुद्धीकरण चळवळीला मुस्लिम आणि हिंदू दोन्ही समाजांमधून विरोध केला गेला. आग्रा आणि मथुरा या शहरांच्या जवळ मलकानी राजपूताचा समाज राहात होता. या मलकानी राजपूतांचे बहुतेक रीतिरिवाज हे हिंदू होते. यांना आवाहन करण्यापलीकडे तेथील राजपूत सभेने काहीही केले नाही. श्रद्धानंदांनी मात्र यातील बहुतेकांना हिंदू करून घेण्यात यश मिळविले. याच काळात गोव्यातील पोर्तुगीजांनी जबरदस्त अत्याचार करून कॅथोलिक ख्रिश्चन केलेल्या गौड ब्राह्मणांना परत हिंदू धर्मात घ्यावे म्हणून वैष्णव आश्रमाचे प्रमुख विनायक महाराज मसूरकर यांना विनंती केली गेली. मसूरकर महाराजांनी पोर्तुगीज सरकारचा प्रचंड विरोध असतानाही शुद्धीकरणाद्वारे त्यांना परत हिंदू धर्मात घेतले. आत्ता-आत्तापर्यंत हा लोकसमूह तेथे नवे गौडा म्हणून ओळखला जात होता. या शुद्धीकरण चळवळीला इ. स. १९२८ मध्ये दडपण्याचा पोर्तुगीज सरकारने प्रयत्न सुरू केला तेव्हा डॉ. मुंजे, न. चिं. केळकर यांनी गोव्याला शिष्टमंडळ नेले. तिथे गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नर जनरलची काही अटींवर शुद्धीकरणाला मान्यता मिळविली. छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, मसूरकर महाराज, डॉ. मुंजे, स्वामी श्रद्धानंद अशा लोकोत्तर नेत्यांनी शुद्धीकरण चळवळीला नेहमीच बळ दिले. म्हणजे हिंदुत्ववादी नेतृत्वाने अहिंदूंना हिंदू करून घेण्यासाठी नेहमीच कार्य केले. शुद्धी चळवळीच्या यशामुळे चिडून अब्दुल रशीद नावाच्या मुस्लिम व्यक्तीने स्वामी श्रद्धानंदांवर भ्याड हल्ला केला. त्यातच स्वामी श्रद्धानंदांचा मृत्यू झाला. शुद्धी सभा आणि शुद्धीकरण चळवळीबद्दल जराही आस्था नसलेल्या गांधींनी स्वामी श्रद्धानंदांच्या खुनाचा साधा निषेधदेखील केला नाही. पण त्यांच्या खुन्याला झालेल्या फाशीच्या शिक्षेवर मात्र नापसंती व्यक्त केली होती. डॉ. मुंजेंना शुद्धीकरण कार्यामुळे जीवे मारण्याच्या सतत धमक्या दिल्या जात असत. त्याला जराही भीक न घालता डॉ. मुंजे अखेरपर्यंत शुद्धीकरण चळवळीचे काम करीतच राहिले.

मुस्लिम अनुनय काँग्रेसच्या इतका अंगवळणी पडला होता की, या विचारधारेला तथाकथित धर्मनिरपेक्षता म्हणजे काय, याचेही भान उरले नव्हते. आज १०० वर्षांनंतर काँग्रेस अहिंदूंच्या आक्रमक विस्तारवादाला कोणत्याही प्रकारे विरोध सहन करू शकत नाही. त्यामुळेच एनआरसी, समान नागरी कायदा, बांगलादेशी आणि रोहिंग्या मुसलमानांची परत पाठवणी अशा गोष्टींचा विरोध काँग्रेस करते आहे. दुर्दैवाने आज हिंदू समाज शुद्धीकरण चळवळीचा गांभीर्याने विचार करताना दिसत नाही. काही लोक आणि साधुसंत जरी शुद्धीकरण चळवळीला महत्त्व देताना दिसत असले, तरी हिंदू समाजाचा एक मोठा वर्ग या विषयाबाबत गंभीर नाही, असेच म्हणावे लागते. शुद्धी चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप येणे आवश्यक आहे. त्याच वेळी हिंदू या बाबतीत अतिरिक्त आक्रमक होणार नाहीत, याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. मानवी जीवनात श्रद्धांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्रद्धा व्यक्तिगत जीवनात प्रत्येक व्यक्तीला एक निश्चित दिशा देण्याचे काम करते. त्याचप्रमाणे समाजजीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करीत असते. शुद्धी चळवळ नवश्रद्धांची निर्मिती असते. म्हणून हिंदू समाजाने सामंजस्य राखत एका निश्चित गतीने शुद्धी चळवळ चालविणे गरजेचे आहे. विविध ठिकाणी शुद्धीकरण वा घरवापसी होत असताना हिंदू समाजाला हे दायित्व पेलावेच लागेल. हिंदू संस्कृती आणि हिंदू धर्म विचारांमध्येच हे दायित्व पेलण्याची आंतरिक क्षमता आहे, हेही खरेच.

९८८१२४२२२४

## वेध

**विजय कुळकर्णी**

# जागतिक व्यापारयुद्धात स्वदेशीचे महत्त्व!

अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन, कॅनडा इत्यादी देशातून अमेरिकेत आयात करण्यात येणाऱ्या उत्पादनांवरील कर वाढविण्याचा आदेश दिला. त्यामुळे जागतिक व्यापारयुद्ध भडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या जागतिक व्यापारयुद्धातून भारतीयांनी वेळीच धडा घेतलेला बरा. भारतीय नागरिकांनी स्वदेशी वस्तूंचा स्वीकार करणे आवश्यक आहे. देशात तयार होणाऱ्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर खरेदी करून आपल्याच देशातील कारागिरांच्या हाताला अधिकचे काम देता येईल. परिणामी, लघुउद्योगांना चालना मिळून कारागिरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे समाधान नागरिकांना मिळेल आणि भारतही प्रत्येक बाबतीत इतर देशांकडे न वळता आत्मनिर्भर होईल. सोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भारताला जागतिक स्तरावर तिसरी आर्थिक महाशक्ती करण्याचे स्वप्नही लवकरच पूर्ण होईल.

डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनमधून आयात होणाऱ्या उत्पादनांवर १० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लावण्याची घोषणा केली. या घोषणेला काही तासांतच चीनने अमेरिकेतून आयात करण्यात येणाऱ्या विविध वस्तूंवर १० ते १५ टक्के आयातशुल्क लावण्याची घोषण करून प्रत्युत्तर दिले. एवढेच नाही तर, गुगलची चौकशी करण्याबरोबरच इतर व्यापार संबंधित उपाययोजना केल्या जाणार असल्याचे चीनने जाहीर केले आहे. चीनच्या व्यापार व वाणिज्य मंत्रालयाने याबाबत प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकेने केलेली एकतर्फी करवाढ ही जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांचे उल्लंघन आहे. चीन व अमेरिकेच्या व्यापारी संबंधांना नुकसानकारक आहे. देशाचे व्यापारी हित पाहता अमेरिकेतून आयात करण्यात येणाऱ्या कोळसा, द्रवरूप नैसर्गिक वायू (एलएनजी) यावर १५ टक्के अधिक कर लावण्यात येणार आहे. याशिवाय कच्चे तेल, कृषी उपकरणे, मोठ्या कार, पिकअप ट्रक इत्यादींवर १० टक्के अधिक आयातशुल्क आकारण्यात येईल. अमेरिकेने लावलेल्या आयात शुल्काविरोधात जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) कडे याचिका दाखल करण्यात आल्याचेही चीनच्या व्यापार व वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे. दरम्यान, अमेरिकेने कॅनडा व मेक्सिको यांच्यावर २५ टक्के आयात शुल्क लावण्याच्या निर्णयाला पुढील महिनाभरासाठी स्थगिती दिली आहे. मात्र, चीनमधून आयात करण्यात येणाऱ्या मालावर मंगळवारपासूनच १० कर लावण्यास सुरुवात केली आहे. याचा परिणाम चिनी वस्तूंच्या किमतीवर होऊन त्या महागणार आहेत. चीनमध्ये तयार होणाऱ्या वस्तू जगभरात स्वस्त दरात विकल्या जातात. त्याचा परिणाम अमेरिकेत तयार होणाऱ्या वस्तूंच्या किमतीवर होतो. भारततही यापूर्वी मेड इन चायना उत्पादनांना मोठ्या प्रमाणात मागणी होती. कारण या वस्तू भारतीय उत्पादनापेक्षा स्वस्त होत्या. अगदी फटाक्यांपासून विद्युत दिव्यांच्या माळा, मोबाईल, सायकल इत्यादीच्या भारतीय बाजारपेठेवर चीनचे एकप्रकारे अधिराज्य होते. अमेरिकेत देखील चीनने तसाच प्रयत्न चालविला होता. त्यामुळे अमेरिकन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी ट्रम्प यांनी हे पाऊल उचलले असावे. तसेच, इंग्रजांनी जवळपास संपूर्ण जगावर वसाहतवादातून राज्य केले. आजही जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिका आणि चीन यांच्यात जागतिक बाजारपेठा काबीज करण्यावरून व्यापारयुद्ध पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

चीनने अमेरिकेकडून आयात करण्यात येणाऱ्या वस्तूंवर आयातशुल्क वाढविण्याच्या निर्णयाचे मेक्सिकन राष्ट्राध्यक्षांनी स्वागत केले आहे. त्यांनी याबाबत पत्रकार परिषद घेऊन ड्रग्ज तस्करी रोखण्यासाठी सीमेवर १० हजार सुरक्षा दलाचे जवान तैनात करण्यास सहमती दिली. त्यानंतर ट्रम्प यांनी व्यापार कर लावण्याचा निर्णय मागे घेतला. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी देखील अमेरिकन उत्पादनांवर २५ टक्के कर लावण्याचा निर्णय जाहीर केला. त्यात मद्य, फर्निचर आणि संत्रा ज्यूसचा समावेश आहे. त्यांनी कॅनेडियन नागरिकांना अमेरिकन वस्तूंचा वापर न करता स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन केले आहे. या विषयातील तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार ट्रम्प यांनी कॅनडा, मेक्सिकोसारख्या सहयोगी देशांवर आयात शुल्क वाढवून एकप्रकारे व्यापारयुद्ध पुकारले आहे. याचा फायदा घेऊन चीनने या देशांसोबत आपले संबंध मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. याचा परिणाम जागतिक व्यापारावर होणे निश्चित आहे. जागतिक करारानुसार भारतावरही या घटनेचे चांगले वाईट परिणाम होणे क्रमप्राप्त आहे. याचा विचार करून सरकार व नागरिकांनी वेळीच सावध होऊन स्वदेशीला प्राधान्य द्यावे, असे सुचवावेसे वाटते.

८८०६००६१४९

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# काँग्रेस नेत्यांना झाले तरी काय?



मागील आठवड्यात याच स्तंभात 'खडगे तुम्हीसुद्धा' या शीर्षकाखाली काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्याबाबत केलेल्या एका वादग्रस्त विधानाचा आढावा घेतला होता. यावेळी पुन्हा एकदा खडगे यांनी महाकुंभमेळ्याबाबत असेच फक्त वादग्रस्तच नाही अतिशय आक्षेपार्ह असे विधान करत आपण कधीच सुधारणार नसल्याचे दाखवून दिले आहे. महाकुंभमेळ्यात स्नान करून खडगे यांनी देशातील गरिबी दूर होणार का, असा आचरटपणाचा प्रश्न विचारला होता.

यावेळी महाकुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत हजारो लोकांचा मृत्यू झाल्याचा दुसरा अतिशय गंभीर आरोप खडगे यांनी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होताना केला. खडगे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तर आहे, पण राज्यसभेतील विरोधी पक्षनेते या घटनात्मक पदावरही आहे. विरोधी पक्षनेते म्हणून त्यांना सरकारवर आरोप करण्याचा अधिकार आहे, पण कोणताही आरोप करताना पुराव्यानिशी करायला पाहिजे. महाकुंभमेळ्यात काही दिवसांपूर्वी चेंगराचेंगरीची दुर्दैवी घटना घडली होती. त्यात ३० जण ठार तर ६० जण जखमी झाल्याचे उत्तरप्रदेश सरकारने अधिकृतपणे जाहीरही केले होते. मग या दुर्घटनेत हजारो लोक मृत्युमुखी पडल्याचा आरोप खडगे कशाच्या आधारावर करतात, ते त्यांनी सांगितले पाहिजे. खडगे यांच्या या विधानावर सत्ताधारी भाजपाच्या सदस्यांनी आक्षेप घेतला असता, हा माझा अंदाज आहे, माझा आकडा चुकीचा असेल तर सरकारने बळींचा योग्य आकडा जाहीर केला पाहिजे, असे तारही खडगे यांनी तोडले. कोणाला दोषी ठरवण्यासाठी मी आरोप करत नाही, माझा आरोप खोटा सिद्ध झाला तर मी माफी मागायलाही तयार असल्याची मखलाशी खडगे यांनी केली. आपला बिनबुडाचा आणि धादांत खोटा आरोप मागे घेण्याचे आवाहन अध्यक्ष जगदीप धनकड यांनी खडगे यांना केले, पण आपला आरोप मागे घेण्यास नकार देण्याची मुजोरी खडगे यांनी केली. त्यामुळे तुमच्या आरोपाच्या समर्थनार्थ सायंकाळपर्यंत पुरावे सादर करण्याचा निर्देश धनकड यांनी दिला होता. मात्र हा स्तंभ लिहीत असेपर्यंत तरी खडगे यांनी कोणताही पुरावा सादर केला नव्हता, असे समजते. हे कमी झाले की काय म्हणून याच भाषणात खडगे यांनी गेल्या दहा वर्षांत १ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा आरोपही केला. आजकल खडगे सगळे आरोप हजारो वा लाखातच करतात, असे दिसते.

१३ जानेवारीला सुरू झालेल्या महाकुंभमेळ्यात पहिल्या दिवसापासूनच हजारांत नाही तर काही लाखांत भाविक आहे. देशातीलच नव्हे परदेशातील माध्यमांचे कॅमेरे त्याठिकाणी २४ तास सज्ज आहेत. अशा स्थितीत तेथे होणारी कोणतीही घटना वा दुर्घटना लपवता येत नाही, पण आले खडगेंच्या मना तेथे कोणाचे चालेना, असे म्हणावेसे वाटते. हे कमी होते की काय म्हणून समाजवादी पक्षाच्या खासदार जया बच्चन यांनीही आगीत तेल ओतणारे विधान केले. महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीत जे मृत्युमुखी पडले, त्यांचे मृतदेह गंगा नदीत फेकण्यात आले, त्यामुळे या नदीचे पाणी प्रदूषित झाले, असा दुसरा हास्यास्पद आरोप जया बच्चन यांनी केला. मृतदेह गंगेत फेकले असते तरी ते वाहत जाऊन कुठे तरी दिसले असते. खडगे आणि बच्चन यांचा आरोप बोलबच्चनसारखा वाटतो. मुळात महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरीच्या घटनेत एक भाविक जरी मृत्युमुखी पडला तरी तो चिंतेचा विषय म्हटला पाहिजे. चेंगराचेंगरीच्या घटनेचे राजकारण करत उत्तरप्रदेशातील योगी आदित्यनाथ यांच्या सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याच्या आधी खडगे यांनी कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीच्या घटनांचा अभ्यास केला असता तर असा आरोप करण्याची त्यांची हिंमत झाली नसती. पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना ३ फेब्रुवारी १९५४ ला म्हणजे मौनी अमावास्येला प्रयागराज येथे झालेल्या झालेल्या चेंगराचेंगरीत ८०० जणांचा मृत्यू झाला होता. राजीव गांधी पंतप्रधान असताना १९८६ मध्ये अलाहाबाद येथे झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत २०० जणांचा बळी गेला होता. महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी होण्याची आणि त्यात काही भाविकांचा मृत्यू होण्याची पहिली घटना नाही.

सामान्यपणे कोणत्याही मोठ्या मेळ्यात विशेषत: कुंभ वा महाकुंभमेळ्यात लाखोंच्या संख्येत भाविक येत असतात. त्यामुळे अनेकदा सरकारी पातळीवर कितीही मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली व्यवस्था अपुरी पडते. सामान्य लोकही उत्साहाच्या भरात आवश्यक ती खबरदारी घेत नाही. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत नाही. त्यातून अशा दुर्दैवी घटना घडत असतात. त्यामुळे अशा घटनांचे राजकारण करण्याचे सर्वच पक्षांनी टाळले पाहिजे. राजकारण करण्यासाठी तसेच सरकारला घेरण्यासाठी आणि त्याच्यावर तुटून पडण्यासाठी विरोधी पक्षांजवळ विषयाची कमतरता कधीच नसते. सपाच्या जया बच्चन यांच्याकडून तर अशी अपेक्षा ठेवणेच मूर्खपणाचे आहे. कोणतेही कर्तृत्व नसताना समाजवादी पक्ष जया बच्चन यांना सातत्याने राज्यसभेत का घेतो, हे अनाकलनीय आहे. पण खडगे यांचे तसे नाही. खडगे यांची प्रतिमा संयमी, प्रगल्भ, अनुभवी आणि समजदार नेता अशी आहे. काँग्रेस पक्षात सगळाच मूर्खांचा बाजार असताना 'वासरात लंगडी गाय शहाणी'प्रमाणे खडगेंकडून अपेक्षा होत्या. पण गेल्या दिवसांत खडगेही लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींच्या पावलावर पाऊल टाकत आपली शेवटच्या टप्प्यातील राजकीय वाटचाल करत आहे, असे म्हणावेसे वाटते. राहुल गांधींच्या पावलावर मल्लिकार्जुन खडगे आणि खडगेंच्या पावलावर सोनिया गांधी पावलं टाकत आहे की काय असे वाटू लागले आहे. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनीही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याबाबत बिच्चारेपणाचे विधान करत आपली औकात दाखवून दिली आहे. काँग्रेस पक्षाला आणि त्याच्या ज्येष्ठ नेत्यांना झाले तरी काय, असा प्रश्न पडण्यासारखी ही परिस्थिती आहे. तापात असताना माणूस बरळत असतो वा हताशेपोटीही असंबद्ध विधाने करत असतो, असे जे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले त्याची यावरून खात्री पटते.

९८८१७१७८१७


### पेन्शनधारक व निम्न मध्यमवर्गीयांना अर्थसंकल्पात दिलासा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने २०२५-२६ वर्षाकरिता अर्थसंकल्प सादर केला. त्यात पेन्शनधारक व निम्न मध्यमवर्गीयांना आयकरात सूट देऊन खऱ्या अर्थाने त्यांच्या प्रति सरकारची जबाबदारी पूर्ण केली. त्याबद्दल नरेंद्र मोदींचे अभिनंदन. या निर्णयामुळे सेवानिवृत्तांना खूप दिलासा मिळाला आहे. वाढत्या वयाबरोबर औषधांवर खर्च वाढला आहे. त्यामुळेच त्यांना याची गरज होती. तसेच जे तरुण खाजगी नोकरी करतात त्यांना सुद्धा पगार व मासिक खर्च याची मिळवणी करता करता नाकी नऊ येते. आयकराचा भार होता. पण आयकर सूट वाढवल्यामुळे त्यांचा खिसा हलका झाला आहे. त्यामुळे ते आता जास्तीचा खर्च करू शकतील. बरं हे निम्न मध्यमवर्गीय छोट्या दुकानात खरेदी करतात. त्यामुळे या छोट्या दुकानदारांचा खप वाढेल. खरंच सामान्य लोकांचा अर्थसंकल्प असेच याचे वर्णन करावे लागेल. राजकारणी यात राजकारण शोधतील, पण सर्वसामान्य लोकांना याच्याशी काही घेणेदेणे नसते.

**राजेंद्र वाडी**/नागपूर

### परीक्षा परिवर्तन काळाची गरज

फेब्रुवारी महिना म्हटला की सर्व परीक्षांची घाई गर्दी पाहायला मिळते. विशेषतः फेब्रुवारी महिन्यात दहावी व बारावीच्या परीक्षा सर्व सुरू होतात आणि पालकांची चिंता वाढते की माझ्या पाल्याचा पेपर कसा जाईल? त्यातल्या त्यात पूर्वीपासूनच पालक अभ्यासाच्या बाबतीत चिंतित असल्याचे दिसतात. प्रत्येक पालक आपल्या पाल्याविषयी त्याच्या उज्ज्वल भविष्याकरिता काळजीत असतो. प्रत्येक पालकाला वाटते माझा पाल्य चांगल्या गुणांनी पास होऊन त्याला चांगल्या ठिकाणी प्रवेश मिळाला पाहिजे. परंतु हल्ली मोबाईलचा अति वापरामुळे मुलांच्या आरोग्यावरच नव्हे तर अभ्यासावर देखील त्याचा परिणाम होत असल्याचे दिसते. सध्या उत्तम दर्जाचे अभियंता, डॉक्टर घडवून आणण्याचा शासनाचा मानस



## वाचक पत्रे

असल्याने प्रत्येक ठिकाणी प्रवेश घेण्याकरिता प्रवेश चाचणी घेण्यात येत आहे. परीक्षा देखील कॉपीमुक्त होण्याकरिता एखाद्या केंद्रावर दुसऱ्या केंद्रांचे शिक्षक बोलावून परीक्षा घेण्याचा निर्णय खरच सुंदर आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास केलाच पाहिजे अशी भीती मनात निर्माण होईल. तसेच २०२५-२६ पासून शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल होत आहे. कमी वयामध्ये शिक्षण घेऊन उत्पन्न कसे मिळवता येईल याकडे शासनाचे लक्ष आहे.

**प्रा. प्रशांत पंत**/९८९०२८७७३२

### मानाचा मुजरा!

केवळ चाकरमान्यांची नव्हे तर मुंबईतील प्रत्येकाचीच लाडकी लोकल जिने आम्हास वेळापत्रकाचे महत्त्व शिकवले, वेळेची किंमत समजावली, ऊन, पाऊस, संकट यांची तमा न बाळगता सातत्याने पुढे जाण्याचे न कळत धडे दिले, चाकरमान्यांना सांभाळत त्यांची रोजीरोटी सुरू ठेवली त्या मुंबई लोकलने आपली शंभरी पार पाडली. न थकता, न दमता, घेतला वसा न सोडता आणि म्हणूनच चाकरमानी जगला, वाढला, जीवनात सफल सुफल झाला. त्यापैकी आम्हीही एक तिची चाळीस वर्ष सेवा घेणार होतो. आजही घेत आहोत आणि म्हणूनच मुंबई लोकलला एक कृतज्ञता या भावनेतून तिच्या सर्व कर्मचाऱ्यांसह मानाचा मुजरा.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

### सुखाचा संबंध धनाशी नसून, मनाशी

सुख व दुःख हे व्यक्तीच्या मनाशी जोडलेले असते. सुख हे धन, संपत्ती, मालमत्ता यांच्याशी जोडलेले नसते. माणसाला कितीही धन, दौलत, द्रव्य मिळाले तरी त्याला मन:शांती मिळेलच याचा भरवसा नाही. पैशाने किंवा संपत्ती, द्रव्याने व्यक्ती प्रसन्न होईल परंतु माणसांना जे आंतरिक सुख, समाधान पाहिजे, ते या धनाने किंवा द्रव्याने मिळत नाही. आंतरिक सुख हवे असेल तर मन प्रसन्न हवे. मन आनंदी व समाधानी हवे. मनाची हुकूमत शरीरावर व शारीरिक इंद्रियांवर चालते. याहीपेक्षा पुढे जाऊन असे म्हणता येईल की समाजातील प्रत्येक व्यक्तीचे नियंत्रण आपापल्या मनावर हवे. मन चंचल असते हे जरी खरे असले तरी, मनाचे स्थिरत्व हे व्यक्तीच्या विचारांवर व मनावरील नियंत्रणावर तसेच व्यक्तीच्या आचरण शुद्धीवर अवलंबून असते. मन स्थिर असेल, स्वस्थ असेल तर सुख त्या व्यक्तीला आपोआप प्राप्त होते. या मनाच्या स्थिरत्वासाठी प्रत्येकाने मनाचा ब्रेक -उत्तम ब्रेक हे तत्त्व अंगीकारावे. तसेच आपल्या दैवात किंवा आपल्या प्रारब्धात जे आहे ते मिळाले आहे, यात समाधान मानल्याने सुद्धा मन शांत राहू शकते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## संक्षिप्त वृत्त



### जनवात्सल्य दिनदर्शिकेचे प्रकाशन

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

जनवात्सल्य या बंगल्यावर माजी केंद्रीय गृहमंत्री श्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते जनवात्सल्य २०२५ या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. दिनदर्शिका प्रकाशनाचे हे दुसरे वर्ष असून माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर शहर व जिल्ह्यासाठी व देशासाठी केलेल्या विकास कामाची माहिती छायाचित्राद्वारे या दिनदर्शिकामध्ये करण्यात आलेली आहे, अशी माहिती संयोजक सातलिंग शटगार यांनी दिली. यावेळी सुप्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. मंगेश शहा, जिल्हा हॉकी संघटनेचे अध्यक्ष जहांगीर शेख, महानगरपालिकेचे नगरसेवक रियाज हुंडेकरी, जिल्हा बास्केटबॉलचे सचिव शफी, कॅप्टन शेख, अमित चौहन उपस्थित होते.

### उंदीर मारण्याचे औषध खाऊन तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी -**

शहरातील समाधान नगरात राज बारमध्ये तरूणाने उंदीर मारण्याचे औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. दत्ता राम कोळी (वय २५, रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. ५ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास सुमारास राज बार येथे अज्ञात कारणावरून दत्ता कोळी याने उंदीर मारण्याचे विशा प्राशन केले. त्यामुळे कोळी यास त्रास होऊ लागल्यावर मित्र सुभाष गंगदे यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयाल दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# न्यायालयाने दिली आठ आठवड्यांची मुदत

## एसबीसी आरक्षणसंदर्भात सुनावणी; तारीख-पे-तारीख नको, लवकरात लवकर आरक्षण द्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

पद्मशाली, देवांग, कोष्टी यांसह अन्य जातींचा समावेश असलेल्या एसबीसी म्हणजेच विशेष मागास प्रवर्गाच्या २ टक्के आरक्षणसंदर्भात बुधवार, ५ पेब्रुवारी २०२५ रोजी उच्च न्यायालयात तारीख होती. परंतु याचिकाकर्त्याने रिजॉईडर म्हणजे पुन्हा उत्तर देणार असल्याची विनंती केल्याने उच्च न्यायालयाने या सुनावणीसाठी आणखीन आठ आठवड्याची मुदत दिली आहे. दरम्यान, एसबीसी आरक्षणसंदर्भात तारीख-पे-तारीख नको लवकरात लवकर आरक्षण मिळवून द्यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

राज्य शासनाने सन १९९४ साली एसबीसी म्हणजेच विशेष मागास प्रवर्गातील जातींना २ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय जाहीर केला होता. परंतु संजीत शुकला नामक एका व्यक्तीने याविरोधात जनहित याचिका दाखल केली. तर दुसरीकडे लवकरात लवकर आरक्षण लागू करण्यात यावे, या मागणीसाठी सन २००० सालापासून पद्मशालीसह या घटकातील इतर समाजबांधवांच्या वतीने आमरण उपोषण, साखळी उपोषण, धरणे आंदोलने आदींच्या माध्यमातून राज्यभरात आवाज उठविण्यात येत आहे. विशेष मागास प्रवर्गातील घटकांना स्वतंत्र आरक्षण मिळाले असत तर हजारो मुले-मुली डॉक्टर, इंजिनिअर झाले असते. राज्यात मेडिकलच्या १०८४५ जागा आहेत. विशेष मागास प्रवर्गासाठी स्वतंत्रपणे २ टक्के आरक्षण मिळाल्यास त्यापैकी २१६ जागांवर एसबीसीच्या विद्यार्थ्यांना संधी मिळाली असती. त्यामुळे गरीब, कष्टकरी वर्गात मोडणाऱ्या विशेष मागास प्रवर्गातील मुलां-मुलींच्या भवितव्याचा विचार करुन लोकप्रतिनिधी, निवृत्त अधिकारी, वकील आदींनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी केली जात आहे

# चारचाकी वाहने चोरणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश

## दोघांना अटक; विजापूर नाका पोलिस ठाण्याची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी -**



शहरातून पोलिस कर्मचाऱ्याची स्कॉर्पिओ चारचाकी गाडी चोरून नेणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश करण्यास विजापूर नाका पोलिसांना यश आले असून या टोळीतील दोघांना अटक करण्यात आली आहे. अजूनही एकजण फरार असून दोन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत.

रमेशकुमार प्रभुराम बिश्नोई (वय २५, रा. घर नं. १६४, मासोई की ढाणि सिया, ता. सांचौर, जि. जालीर, राजस्थान) आणि रूपाराम मनाराम बिश्नोई (वय ३२, रा. पुनासा, ता. भिनमाल, जि. जालौर, राजस्थान) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलिस कर्मचारी आण्णाराव म्हेत्रे (रा. संत तुकाराम नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.१६ जानेवारी रोजी आण्णाराव म्हेत्रे यांनी त्यांची स्कॉर्पिओ गाडी क्र. एमएच १३ डीवाय ५७१९ ही गाडी चोरीस गेल्याबाबत दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास करताना विजापूर नाका पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणचा डम्प डाटा काढून त्याचे तांत्रिक विश्लेषन करून राजस्थान येथून रमेशकुमार बिश्नोई व रूपाराम बिश्नोई या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीची एमएच १३ डीवाय ५७१९ क्रमांकाची स्कॉर्पिओ चारचाकी गाडी तसेच गुन्ह्यात वापरलेली हुंदाई क्रेटा क्रं. जीए ०९ बीके ११२३ ही चारचाकी गाडी जप्त केली.

ही कामगिरी पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक आयुक्त यशवंत गवारी, पोलिस निरीक्षक दादा गायकवाड, संगीता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शितलकुमार गायकवाड, हवालदार सचिन हार, गणेश शिर्के, शंकर भिसे, अमृत सुरवसे, राहुल विटकर, संतोष माने, समाधान मारकड, सद्दाम आबादीराजे, स्वप्नील जाधव, रमेश कोर्सेगाव, हरिकृष्ण चोरमुले, अयाज बागलकोटे, अर्जुन गायकवाड यांनी केली.

### १३५ सीसीटीव्हीचे फुटेज, १२ ठिकाणचा डम्प डाटा तपासला...

या गुन्ह्याचा तपास करताना विजापूर नाका पोलिसांनी सोलापूर ते राजस्थान दरम्यानचे सुमारे १३५ सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज आणि १२ ठिकाणचा डम्प डाटा काढून त्याचे तांत्रिक विश्लेषन करून राजस्थान येथून आरोपींना ताब्यात घेतले. या गुन्हेगारांकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविली आहे.

मनोरमा परिवार अंतर्गत

**मनोरमा स्वयंसहाय्यता महिला विकास नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

अंकुर रोपवाटीकेसमोर कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९९ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

श्री. भोसले अजय वसंतराव, चेअरमन (मो.९६२३७१९३२२)

सौ. ढोकरे मोनिका सोनूलाल, व्यवस्थापिका (मो.९९२२०९३०९७)

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
सहा. अभियंता भ्रमणध्वनी क्रं. : ९४२२४५७९२४
Mail Id: smcasstlight@gmail.com

**जाहीर प्रसिद्धीकरण**

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत विद्युत विभागाकडून, खालील कामाकरिता ई-निविदा जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात येत आहे. कामाचे नाव : जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सी.एन.एस. (CNS) हॉस्पिटल पासून दक्षिणेला ५४ मीटर रिंग रोडवर पथदिव्याकरिता विद्युत पोल बसविणे.

**टेंडर आयडी क्रं. 2025_SMC_1146424_1**

तरी वरील नमूद कामाचे ई-निविदा हे शासनाच्या अधिकृत http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.६/०२/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**आयुक्त करिता**
**सोलापूर हानगरपलिका, सोलापूर**

**दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर शाखा : बार्शी**

**नोटीस**

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार मारुती विश्वनाथ फपाळ राहणार फपाळवाडी यांचे नावावर सेव्हिंग खाते, लॉकर खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांचा अर्जदार मंगेश मारुती फपाळ - मुलगा यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्यूपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसांचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्यूपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमूद केलेल्या सेव्हिंग खाते, लॉकर खात्यास अर्जदार मंगेश मारुती फपाळ यांचे नांव वारस हक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे !

पंढरपूर
तारीख : २७/०१/२०२५

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि.,पंढरपूर

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **LATA GURUSIDHAPPA VYAWAHARE** has been changed to new name **SNEHAL SANJAY HONKHAMBE**
**(Affidavit no. - 566)**
**Date - 05/02/2025**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील रहिवाशांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील न्यु पाच्छा पेठ येथील मिळकत यासी टी. पी. स्कीम नं.०१, सि.स.नं. १०३८८, फायनल प्लॉट नं. ३४, सब प्लॉट नं. ३८ यासी मंजूर ले-आऊटप्रमाणे फायनल प्लॉट नं. ३४/३ व सो.म.पा. मिळकत क्र. १६४८८८, म्युनिसिपल घर नं. ३४/३/३८ याचे एकुण क्षेत्रापैकी उत्तरेकडील बाजूची हद्द पूर्वपश्चिम ९५ फुट व दक्षिणोत्तर ३२ फुट असे एकूण क्षेत्र २८२.५२ चौ.मी. अथवा ३०४० चौ. फुट इतकी असून, सदर जागेत तळमजल्यावर १५१२ चौ. फुट अथवा १४०.५२ चौ.मी.मध्ये विटा-मातीत बांधकाम केलेली असून, वरती पन्हाळी पत्रे घातलेली आहे. उर्वरीत खुली जागा असून यात लाईट, नळ, संडास व बाथरुमची सोय आहे. यासी चतुःसिमा - पूर्वेस ले-आऊट मधील रस्ता, दक्षिणेस सदर प्लॉट नं. ३८ पैकी उर्वरीत जागा, पश्चिमेस सब प्लॉट नं. २९ व उत्तरेस सब प्लॉट नं. ३९.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत ही संपत शंकरय्या गंगुल व राजेशम शंकरय्या गंगुल यांचे खरेदी मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदरहु मालकांनी सदरहु मिळकत आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून, आमचे अशिलांकडून इसारा दाखल रक्कम स्विकारुन रितसर आमचे अशिलांचे नांवे इसारा पावती लिहुन दिली आहे. तसेच सदरहू मालकांनी सदरहू मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलांना दिली आहे. तरी परंतु सदर मिळकतीवर अन्य कोणाचा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री व इतर स्वरुपाचे करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ६ (सहा) दिवसांच्या आत आपले हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर आणून देऊन खात्री करुन द्यावी. जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. ०५/०२/२०२५

सही/-
**संतोष श्रीशैल पुजारी**
**एलएल.बी., ॲडव्होकेट**
**प्लॉट नं. ५ब, स्वामी विवेकानंद नगर,**
**विजापूर रोड, सैफुल, सोलापूर**
**मो.नं. ९१५८५४११११९**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public in large that, The property mentioned in schedule hereunder is purchased by Shivaji Vitthal Kshirsagar by registered sale deed.

That, prior sale deed bearing R.E. No. 2694/2002, dated 09-09-2002. That, the said sale deeds have been lost by Shivaji Vitthal Kshirsagar. Now the original sale deeds are no available with him and accordingly he has filed missing complaint at Mohol Police Station, Solapur Rural bearing its Missing Register No. 52/2025 on date 31-01-2025.

Our Client is going to take a loan from ICICI Home Finance, Solapur by securing the mortgage. All persons or institutions having any claim or right in respect of the said property or any part thereof by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, exchange, trust, possession or encumbrance or otherwise howsoever are hereby required to inform the same in writing supported with the original documents to the undersigned at the address given below mentioned, within 15 days from the date of publication of this notice, failing which, the claim or claims, if any of such person, persons or institution/s shall be considered to have been waived and /or abandoned. Further, it is also hereby informed through this public notice that no one should deal with the said properties on the basis of the said properties on the basis of the said documents.

**THE SCHEDULE OF THE PROPERTY**

District and sub District Solapur, Taluka Mohol, within limits of Grampahcayat Mohol Boundry at Mohol property bearing Gut No. 1255/1/18/2A/2/1/A/1/1/1/1/1A, As per online 7/12 extract Gut No. 1255/1A/1A Out of House No. 2337, Plot No. 8 its boundary Southern North 81 feet (24.69 mtr.), Eastern West 30 feet (9.14 mtr.) Total Admeasureing Area 2421 Sq.ft. OR 0.02.25 H.Acre. Sq.Mtr. and, it is bounded and surrounded by East Plot No. 6 & 7, West: Plot No. 9,10,11, South:- Gut No. 1255 Pai., North:- 10 feet wide Road.

This Notice is issued on 05-02-2025.

सही/-
**ॲड. सलाम मोहम्मदसाब बगलूर**
**बी.ए., एल.एल.बी., ॲडव्होकेट**
**रा.फ्लॅट नं. ११, तिसरा मजला,**
**झकीया अपार्टमेंट, अकबर कासिम**
**मस्जिदजवळ, साखर पेठ, सोलापूर**
**रा. मो.नं. ९८६००९४५९६**

**जाहीर प्रसिद्धीकरण**

**दि. कि. अर्ज नं. ८९/२०२४ नि.नं.०५**
पुढील नेमलेली तारीख ०७/०३/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु. डिव्ही. साहेब यांचे कोर्टात**

१) **रोहित गोवर्धन देवकर,** वय ३४ वर्षे, धंदा- शेती, रा. शेळगांव (आर), ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **रोहन गोवर्धन देवकर,** वय ३४ वर्षे, धंदा- शेती व नोकरी, रा. सदर
३) **शकुंतला गोवर्धन देवकर,** वय ५७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १, २ यांचे वडील व अर्जदार नं. ३ चे पती कै. गोवर्धन सुखदेव देवकर हे दिनांक २१/०३/२०१७ रोजी मयत झालेले आहेत. मयत कै. गोवर्धन सुखदेव देवकर यांचे पश्चात यातील अर्जदार हे असे जवळचे व कायदेशीर वारस आहेत. त्यांचे शिवाय मयतास अन्य कोणीही वारस नव्हते व नाहीत. सबब यातील अर्जदार हे मयत कै. गोवर्धन सुखदेव देवकर यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून जाहीर प्रगटन होवून मिळणेसाठी यातील अर्जदार यांनी सदरील मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार यांचे शिवाय मयत कै. गोवर्धन सुखदेव देवकर यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दिनांक ०७/०३/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा. हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील मयत कै. गोवर्धन सुखदेव देवकर यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

कळावे, हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. तारीख : ०५/०२/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** — (कोर्टाचा गोल शिक्का) — सही/- **सहा. अधीक्षक**, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**जाहीर प्रसिद्धीकरण**

**ॲड. एस. एस. जगताप**
माढा, ता. माढा, जि. सोलापूर
**दि. कि. अर्ज नं. ०९/२०२५ नि.नं.०५**
पुढील नेमलेली तारीख ०७/०३/२०२५

**बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात**

**वैभवी नागेश आवारे** ----- **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी, सोलापूर** ----- **सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मौजे पिंपळनेर, ता. माढा, जि. सोलापूर हद्दीतील लोकांना कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार वैभवी नागेश आवारे, वय १४ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. पिंपळनेर, ता. माढा, जि. सोलापूर व इतर २ यांनी बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश सो. यांचे कोर्टात सि.कि. अर्ज ०९/२०२५ हे अर्जदार नं. १ व २ चे वडील नागेश आवारे हे मयत असून अर्जदार यांच्या नावे असलेली मिळकत विक्री करण्यास परवानगी मिळण्यासाठी अर्जदार यांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, सदर अर्जातील अर्जदार यांचे नावावरती असलेली मिळकत विक्री करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यांना परवानगी देण्यासाठी कोणाचीही कोणत्याही स्वरुपाचे हितसंबंध असल्यास तसेच कोणाचा काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मिळकतीशी हितसंबंध असल्यास सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०१ महिन्याचे आत किंवा कोर्टाने पुढील नेमलेले तारीख ०७/०३/२०२५ रोजी लेखी अथवा तोंडी तक्रार मांडावी. अन्यथा वरील अर्जदार यांना मिळकत विक्री करण्यास परवानगी देण्याचे आदेश केल्यानंतर कोणाची कोणत्याही स्वरुपाची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस आज दि. ०५/०२/२०२५ रोजी माझी सही व न्यायालयाची शिक्क्यानिशी दिली.

सही/- **वरिष्ठ लिपीक** — (कोर्टाचा गोल शिक्का) — सही/- **सहाय्यक अधीक्षक**, जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**जाहीर प्रसिद्धीकरण**

**ॲड. मुकेश अनंता परबत,**
ऑ. श्रीरामनगर, माढा, ता. माढा
**दि. कि. अर्ज नं. १०/२०२५ नि.नं.०५**
पुढील नेमलेली तारीख १३/०३/२०२५

**बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात**

१) **चि. प्रथमेश संदीप गावडे**
२) **कु. स्वरुपा संदीप गावडे** तर्फे, अ.पा.क. वडील **संदीप महादेव गावडे**
३) **संदीप महादेव गावडे**
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**महाराष्ट्र शासन** — **सामनेवाला**

तमाम लोकांना विशेषतः मौजे रोपळे (कव्हे), ता. माढा, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जार यांनी बार्शी येथील मे. जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात दि. कि. अर्ज क्रमांक १०/२०२५ हा मौजे रोपळे (कव्हे), ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर २४३ पैकी अज्ञान अर्जदार नंबर १ व २ यांचे नावे असलेले ०० हे. २१ आर एवढे क्षेत्र त्याचे वतीने अज्ञान पालन करणार म्हणून वडील अर्जदार नंबर ३ संदीप महादेव गावडे यांचेतर्फे अविनाश हरीदास वाघमारे, रा. बोव्हाडेवाडी, मोशी, जि. पुणे यांना विक्री करण्याचे ठरविलेले असून त्याची विक्री परवानगी मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने कळविण्यात येते की, वरील अज्ञान अर्जदार नंबर १ व २ याचे नावे असलेल्या वरील नमूद मिळकतीबाबत विक्री परवानगी मिळणेबाबतचा आदेश पारीत होणेबाबत कोणाची काही तक्रार असलेस अथवा कोणाचा काही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख १३/०३/२०२५ रोजी स्वतः अथवा विधीज्ञामार्फत या न्यायालयात हजर राहून हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाची हरकत न आलेस अर्जदाराने मागणी केलेप्रमाणे अर्जदाराचा पुरावा घेवून पुढील योग्य ते आदेश पारीत केले जातील. तद्नंतर कोणाची काही एक तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस आज दि. ५/२/२०२५ रोजी माझी सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **लिपीक** — (कोर्टाचा गोल शिक्का) — सही/- **सहाय्यक अधीक्षक**, अति.जिल्हा न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**जाहीर प्रसिद्धीकरण**

**दि. कि. अर्ज नं. ८२/२०२४ नि.नं.३४**
पुढील नेमलेली तारीख २८/०२/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु. डिव्ही. साहेब यांचे कोर्टात (मे. एच.यु.यु. पाटील सो. कोर्ट)**

१) **श्रीमती उर्मिला मारुती मुंढे,** वय ६३ वर्षे, धंदा- गृहिणी, रा. सोनाली निवास, शिवनगर, वायकर प्लॉट, रिंग रोड, सुभाषनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **सचिन मारुती मुंढे,** वय ३२ वर्षे, धंदा- नोकरी, रा. सदर
३) **नितीन मारुती मुंढे,** वय ३७ वर्षे, धंदा- नोकरी, रा. कळंबवाडी (आ), ता. बार्शी, जि. सोलापूर
४) **सोनाली सचिन दराडे,** वय ३४ वर्षे, धंदा- नोकरी, रा. शिवशिल्प कॉलनी, शिवाजीनगर, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २ ते ४ यांची आई असून अर्जदार नं. २,३ हे सख्खे भाऊ असून अर्जदार नं. ४ ही अर्जदार नं. २,३ ची ववाहीत बहीण आहे. अर्जदार नं. १ चे पती म्हणजेच अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील मारुती रघुनाथ मुंढे हे होते. ते दिनांक २०/०९/२०२२ रोजी डॉ. बकरे हॉस्पिटल, बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयत मारुती रघुनाथ मुंढे हे त्यांचे हयातीत पोलीस खात्यामध्ये ए.पी.आय. मध्ये सेवेत होते. ते सेवानिवृत्त झालेवर त्यांना पेन्शन मिळत होती. त्यांचे नांवे सदर खात्याकडे थकीत निवृत्ती वेतनाचा लाभ अनुज्ञेय आहे. तसेच अर्जदार हेच मयत मारुती रघुनाथ मुंढे यांचे कायेशीर वारस असलेने अर्जदारांनी सदरील रक्कमेची मागणी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली असता तेथील अप्पर कोषागार अधिकारी, (निवृत्ती वेतन) यांनी वारस प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदारांनी सदरचा अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराच्या मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचे काही आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कोणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधिताने ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवांचे आत वा पुढील नेमले तारीख २८/०२/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : ०५/०२/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** — (कोर्टाचा गोल शिक्का) — सही/- **सहा. अधीक्षक**, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**BY CHIEF OFFICER**

**PANDHARPUR MUNICIPAL COUNCIL, PANDHARPUR**

**Notice under section 61(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

Whereas the Pandharpur Municipal Council in accordance with the provisions of section 60 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act 1966, (Maharashtra Act no. XXXVII of 1966) (hereinafter referred to as the said Act) declared it's intention to prepare the draft Town Planning Scheme Pandharpur No. 1 (hereinafter referred to as the said scheme) vide it's General Body resolution No. 382 dated 22/09/2023 and published a declaration to that effect in the Maharashtra Government Gazette Pune Division supplement part 1 dated 12/10/2023 to 18/10/2023 and in the daily newspaper Dainik Punyanagri dated 07/10/2024;

And whereas in accordance with the provisions of section 61(1) of the said Act, the Pandharpur Municipal Council has to prepare and publish the said scheme within a period of nine months from the date of declaration of intention to prepare the scheme, i.e. on or before 12/07/2024;

And whereas in accordance with the provisions of section 61(3) of the said Act, the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune, vide his order no. 042, dated, 10/01/2025 in exercise of the powers delegated to him under Government Notification in Urban Development Department No. TPS -1813/3211/CR-508/UD-13, dated 01/12/2016 has further extended 3 month's time period till date 09/02/2025, for preparing the said scheme and publishing a notice regarding its preparation;

And whereas the Municipal Council has now prepared the said draft scheme in accordance with the provisions of the said Act and rules framed there under;

Now, therefore, under the provisions of section 61(1) of the said Act, the said draft scheme has been published in the office of the Municipal Council vide Administrative Resolution No. 899 Dated 31/01/2025;

A copy of the said draft scheme and plans thereof are kept open for inspection by the public during office hours on all working days in the office of the Municipal Council. A copy of the plan and scheme book of the said scheme or part thereof can be obtained after payment of the prescribed fees; In accordance with the provisions of section 67 of the said Act, if within thirty days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette, any person affected by the said scheme communicates in writing (in duplicate) any objections relating to the said scheme to the Chief Officer, the Municipal Council shall consider the same and modify the said draft scheme as it thinks fit, before submitting the said draft scheme under section 68(1) of the said act, to the Government for sanction.

sd/-
**(Dr. Prashant Anant Jadhav)**
**Chief Officer**
**Pandharpur Municipal Council.**
**Pandharpur, District Solapur.**
**Date : 05/02/2025**

मुख्याधिकारी यांजकडून

**पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६, च्या कलम ६१ (१) अनुसार जाहीर सूचना**

ज्याअथी, पंढरपूर नगर परिषदने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ (यापुढे उक्त अधिनियम असे उल्लेखिलेले) चे कलम ६० (१) अन्वये असलेल्या अधिकारांचा वापर करुन नगर परिषद हद्दीतील क्षेत्रापैकी नकाशात दाखविलेल्या क्षेत्रासाठी, प्रारुप नगर रचना योजना पंढरपूर क्रमांक १ (यापुढे उक्त योजना असे उल्लेखिलेली) तयार करावयाचा इरादा दिनांक २२/०९/२०२३ च्या प्रशासकीयसभा ठराव क्र.३८२ अन्वये जाहीर केलेला असून, त्यासंबंधीची उद्घोषणा महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १२/१०/२०२३ रोजी पृष्ट क्र. ०१ वर तसेच दैनिक पुण्यनगरी मध्ये दिनांक ०७/१०/२०२३ रोजी प्रसिद्ध झालेली आहे;

आणि ज्याअथी, उक्त अधिनियमाच्या कलम ६१ (१) मध्ये विहित केल्यानुसार नगर परिषदने उक्त प्रारुप नगर रचना योजना तयार करुन, इरादा प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून नऊ महिन्याच्या कालमर्यादेत म्हणजे दि. १२/०७/२०२४ पर्यंत (ठरावापासून ९ महिन्यात) प्रसिद्ध करणे जरुरीचे आहे;

आणि ज्याअर्थी, शासकीय अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक टीपीएस १८१३/३२११/उठ-५०८/णऊ-१३, दिनांक ०१/१२/२०१६ अनुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांनी उक्त अधिनियमाचे कलम ६१ (३) अनुसार, उक्त योजना तयार करुन नोटीस प्रसिद्ध करण्याची मुदत त्यापुढे ३ महिने म्हणजे दिनांक ०९/०२/२०२५ पर्यंत वाढवलेली आहे. आणि ज्याअथी, पंढपूर नगर परिषदने उक्त योजना तयार करण्यासाठी उक्त अधिनियमांच्या तरतुदीनुसार जे करावयास पाहिजे होते ते सर्व करून, उक्त योजना आता नगर परिषदेने तयार केलेली आहे.

त्या अर्थी आता उक्त अधिनियमाचे कलम ६१ (१) व त्याखालील नियमानुसार सुचना करण्यात येत आहे की, सदरहू प्रारूप नगर रचना योजना पंढरपूर क्र. १. पंढपूर नगर परिषदे प्रशासकीयसभेचा ठराव क्र. ८९९ दिनांक ३१/०१/२०२५ अन्वये नगर परिषदे च्या कार्यलयामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहे.

उक्त योजनेचे नकाशा व अहवाल नगर परिषदेच्या कार्यलयात कामकाजाच्या दिवशी कार्यलयीन वेळेत नागरीकाचे अवलोकनार्थ खुले ठेवण्यात आले आहे. तसेच नागरीकांना उक्त योजनेच्या नकाशाची किंवा अहवालाची प्रत किंवा त्यातील भागाची प्रत निश्चित मूल्य नगर परिषदेकडे भरल्यानंतर विक्रीसाठी उपलब्ध राहील;

तरी आता, वरील सूचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत, उक्त प्रसिद्ध केलेली योजनेमुळे बाधा पोहचलेल्या कोणत्याही इसमाने उक्त योजनेसंबंधी कोणताही लेखी आक्षेप (दोन प्रतीत) मुख्याधिकारी, पंढरपूर नगर परिषद यांचे नांवे कार्यलयात सादर करावे, म्हणजे उक्त योजना नगर परिषदेतर्फे उक्त अधिनियमाचे कलम ६८ (१) च्या तरतुदीनुसार शासनास मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी, उक्त अधिनियमाच्या कलम ६७ अनुसार योग्य त्याप्रमाणे त्यांचा विचार, करण्यात येईल व आवश्यक ते उक्त योजनेत फेरफार करण्यात येईल. यांची कृपया नागणरकांनी नोंद घेऊन, नगर परिषदेस सहकार्य करावे.

सही/-
**(डॉ. प्रशांत अनंत जाधव)**
**मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर, जिल्हा सोलापूर**
**दिनांक. ०५/०२/२०२५**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### सायकलिंगमध्ये महाराष्ट्राचा दुहेरी धमाका



**रूद्रपूर** : महाराष्ट्राने ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सायकलिंगमधील पदकांची मालिका कायम राखताना बुधवारी महिला गटात एक रौप्यपदक आणि एक कांस्यपदक जिंकले. महिलांच्या चार किलोमीटर अंतराच्या सांघिक कौशल्य स्पर्धेत महाराष्ट्राला कांस्यपदक मिळाले असून या संघात वैष्णवी गाभणे संस्कृती खेसे, सिया ललवाणी व पूजा दानोळी यांचा समावेश होता. महाराष्ट्राने ही शर्यत पाच मिनिटे ३२.६४३ सेकंदात पार केली. हरयाणा (पाच मिनिटे २६.९२० सेकंद) व ओडिशाने (पाच मिनिटे ३०.४२३ सेकंद) अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदक जिंकले. महाराष्ट्राच्या श्वेता गुंजाळ हिने पाच फेऱ्यांचा समावेश असलेल्या केरीन सायकलिंग या क्रीडा प्रकारात रौप्यपदक पटकाविले.

### मुंबई-हरयाणा उपांत्यपूर्व सामना लाहलीवरून कोलकात्याला हलवला

**मुंबई** : गतविजेत्या मुंबईचा हरयाणाविरुद्धचा रणजी करंडकाचा उपांत्यपूर्व सामना अपरिहार्य परिस्थितीमुळे बीसीसीआयने लाहली वरून कोलकाताला हलवला आहे. सर्व उपांत्यपूर्व सामने ८ ते १२ फेब्रुवारी दरम्यान पाच दिवसांचे असतील. हो, आम्हाला बीसीसीआयकडून कळवण्यात आले आहे की हरयाणाविरुद्धचा रणजी उपांत्यपूर्व सामना ईडन गार्डन्सवर खेळवला जाईल, असे मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी बुधवारी वृत्तसंस्थेला सांगितले. जरी हिवाळी हंगामाचा शेवट असला तरी, कधीकधी हवामानामुळे उत्तर भारतात परिस्थिती बिघडू शकते असे समजते. या सामन्यात भारताचा टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव, सध्याचा राष्ट्रीय संघाचा अष्टपैलू खेळाडू शिवम दुबे, शार्दुल ठाकूर व कर्णधार अजिंक्य रहाणे हे सहभागी होणार आहेत. हरयाणा संघाचे नेतृत्व वेगवान गोलंदाज अंशुल कंबोज करणार आहे.

### टेनिसमध्ये महाराष्ट्र उपांत्य फेरीत

**डेहराडून** : महाराष्ट्राने दिल्लीचा २-१ असा पराभव केला आणि ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या सांघिक टेनिसमध्ये उपांत्य फेरी गाठली. त्यावेळी: महाराष्ट्राच्या अर्णव पापरकर याने एकेरीच्या पहिल्या लढतीत शिवांग भटनागर याचा ६-१, ३-६, ६-२ असा पराभव केला. मात्र, पुढच्या लढतीत प्रसाद इंगळे याला सुदिन सार्थक याच्याकडून ५-७, ७-५ १-६ असा पराभव पत्करावा लागला. त्यामुळे या लढतीत १-१ अशी बरोबरी झाली. दुहेरीच्या लढतीत प्रसाद इंगळे याने संदेश कुरळे याच्या साथीत रोहन मेहरा व सार्थक सुदिन यांच्यावर ७-६(७/५), ७-६(८/६) अशी मात केली. आणि : महाराष्ट्राच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

### सिमोना हालेप निवृत्त

**रोम** : आपल्या मायदेशी रोमानिया येथे झालेल्या स्पर्धेत पहिल्या फेरीत पराभव पत्करल्यानंतर दोन वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेती सिमोना हालेपने वयाच्या ३३ व्या वर्षी टेनिसमधून निवृत्ती जाहीर केली. डोपिंग निलंबनातून बाहेर आल्यानंतर पुनरागमन करत सिमोनाने आपली कारकिर्द संपवली. निवृत्तीच्या निर्णयामुळे माझा आत्मा शांत झाला आहे. आपल्या पूर्वपदावर पोहोचण्यासाठी माझे शरीर आता पूर्वीइतके सहन करू शकत नाही, असे हालेप म्हणाली. रोमानियातील क्लुज येथे ट्रान्सिल्व्हेनिया ओपनमध्ये लुसिया ब्रोंझेटीकडून ६-१, ६-१ असा पराभव पत्करल्यानंतर सिमोनाने निवृत्तीची घोषणा केली. पूर्वीची पातळी गाठणे खूप कठीण आहे आणि म्हणूनच मी आज क्लुजमध्ये तुमच्यासमोर खेळण्यासाठी आणि टेनिस कोर्टवर निरोप घेण्यासाठी येथे असू इच्छित होते, असे ती म्हणाली. हालेपसाठी हा वर्षातील पहिला सामना होता. २०१७ मध्ये सिमोना डब्ल्यूटीए रँकिंगमध्ये पहिल्या क्रमांकावर पोहोचली होती परंतु आता ८७० व्या क्रमांकावर आहे.

# भारत-इंग्लंड वन-डे सामना आज

## व्हीसीएवर रोहित, विराटची परीक्षा

◆ **नागपूर, ५ फेब्रुवारी**

इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेसह चॅम्पियन्स चषकाच्या तयारीच्या अंतिम टप्प्यात प्रवेश करत असताना भारतीय संघ व्यवस्थापन अनुभवी खेळाडूंच्या फॉर्म व तंदुरुस्तीवर लक्ष केंद्रित केले जात आहे. या मालिकेचा उद्देश संघातील काही विशिष्ट जागांसाठी योग्य संतुलन शोधणे आहे.

कर्णधार रोहित शर्मा व विराट कोहलीसारख्या दिग्गज खेळाडूंवर अलिकडच्या निराशाजनक कामगिरीनंतर सर्वत्र टीका होत आहे. गत महिन्यात रणजी करंडकातील निराशाजनक कामगिरी केल्यानंतर हे दोन्ही स्टार खेळाडू आता इंग्लंडविरुद्धच्या वन-डे सामन्यात दमदार कामगिरी करण्यासाठी उत्सुक असतील.

**पहिला वन-डे**
**स्थळ** : विदर्भ क्रिकेट संघटना स्टेडियम, जामठा, नागपूर
**वेळ** : दुपारी १.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

या दोन्ही स्टार खेळाडू अनेक वर्षांपासून वन-डे क्रिकेटमध्ये वर्चस्व गाजवत आहे आणि आताही ते दमदारपणे वर्चस्वपूर्ण कामगिरी करण्याचा प्रयत्न करतील.

२०२३ च्या विश्वचषकात कोहलीने ७६५ व ५९७ धावा केल्या, त्या विश्वचषकाच भारत अपराजित राहिला, मात्र अंतिम सामन्यात भारताला पराभवाचा सामना करावा लागला. हे दोघे श्रीलंकेविरुद्ध गमावलेल्या तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेतही सहभागी झाले होते. या मालिकेत रोहितने २ अर्धशतके व कोहली धावाच काढू शकला नाही. ◀(तभा वृत्तसेवा)

**प्रतिस्पर्धी संघ :**

**भारत** : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, के. एल. राहुल (यष्टिरक्षक), ऋषभ पंत (यष्टिरक्षक), हार्दिक पांड्या, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद. शमी, अर्शदीप सिंग व वरुण चक्रवर्ती.

**इंग्लंड** : जोस बटलर (कर्णधार), हॅरी ब्रुक, बेन डकेट, जो रूट, फिलिप सॉल्ट, जेमी जेकब बेथेल, ब्रायडन कार्स, लियाम लिव्हिंगस्टोन, जेमी ओव्हरटन, जोफ्रा आर्चर, गस ॲटकिन्सन, साकिब महमूद, आदिल रशीद व मार्क वुड.

## इंग्लंडविरुद्धची मालिका म्हणजे चॅम्पियन्स चषकाची तयारी

आगामी १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तान व दुबई येथे होणाऱ्या चॅम्पियन्स चषकासाठी इंग्लंडविरुद्धची वन-डे मालिका ही भारताची एकमेव तयारी स्पर्धा आहे. टी-२० मधून आधीच निवृत्त झालेल्या या दोन दिग्गजांसाठी आठ संघांची ही स्पर्धा एकमेकांना आव्हान देणारी ठरू शकते.

तथापि, त्यांचा फॉर्म हा संघासाठी एकमेव चिंतेचा विषय आहे.

कर्णधार रोहित आणि त्याचा उपकर्णधार शुभमन गिल सलामीला येण्याची शक्यता आहे, त्यानंतर कोहली, श्रेयस अय्यर व पांड्या आहेत.

यष्टिरक्षकाचा क्रमांक हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. यष्टिरक्षक-फलंदाज पाचव्या क्रमांकावर येण्याची शक्यता आहे. के. एल. राहुल व ऋषभ पंत यांच्यापैकी कोणाला अंतिम अकरा संघात स्थान मिळावे? हाही प्रश्न आहे.

२०२३ च्या विश्वचषकात पंतच्या अनुपस्थितीत यष्टिरक्षक राहिलेल्या राहुलने प्रशंसनीय कामगिरी केली व त्याने ४५२ धावा केल्या. त्याने आपण भारताच्या सर्वात सातत्यपूर्ण मधल्या फळीतील फलंदाजांपैकी एक असल्याचे सिद्ध केले. दुसरीकडे, डावखुरा फलंदाज पंत भारताच्या उजव्या हाताच्या फलंदाजीत विविधता आणतो. शिवाय सहजतेने फलंदाजी करण्याची क्षमता हा त्याचे अतिरिक्त वैशिष्ट्य आहे.

श्रेयस अय्यरने श्रीलंकाविरुद्धच्या मालिकेत वाईट कामगिरी केली असली तरी त्याचे स्थानिक रणजी हंगामात केलेल्या कामगिरीकडे दुर्लक्षित करणे कठीण आहे.

या मालिकेत अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी व फिरकीपटू कुलदीप यादव यांच्या तयारीचीही चाचणी घेतली जाईल. हे दोघेही भारताच्या चॅम्पियन्स चषकाच्या यशात हुकमी खेळाडू ठरू शकतात.

पाठीच्या दुखापतीमुळे बुमराह कधीही या मालिकेसाठी शर्यतीत नव्हता. चॅम्पिन्स चषक संघात स्थान मिळवण्यासाठी फॉर्मात असलेला फिरकीपटू वरुण चक्रवर्ती याला पदार्पण करण्याची संधी मिळू शकते.

इंग्लंड संघ सुद्धा आपल्या अडचणी दूर करून एक मजबूत आव्हान देण्याचा प्रयत्न करेल. जो रूट हा त्यांच्या फलंदाजी क्रमवारीत एकमेव महत्त्वाचा खेळाडू आहे. यष्टिरक्षक जेमी स्मिथला पायाच्या दुखापतीमुळे पहिल्या दोन वन-डे सामन्यांना मुकावे लागण्याची शक्यता आहे.



व्हीसीए जामठ्यावर बुधवारी गोलंदाजीचा सराव करताना कुलदीप यादव आणि सरावादरम्यान थोडा विसावा घेताना शुभमन गिल

# तेलंगणा सरकारकडून त्रिशाला १ कोटी रुपये

## मुख्य प्रशिक्षक नूशीन यांना १० लाख रुपये बक्षीस जाहीर

◆ **हैदराबाद, ५ फेब्रुवारी**

मलेशियातील क्वालालम्पूर येथे नुकत्याच झालेल्या १९ वर्षांखालील महिला टी-२० विश्वचषकात प्रभावी कामगिरी केल्याबद्दल तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी त्रिशा गोंगाडीला १ कोटी रुपयांचे रोख प्रोत्साहन जाहीर केले आहे.

अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर ९ गड्यांनी विजय नोंदवून भारतीय महिलांनी १९ वर्षांखालील महिला टी-२० विश्वचषक यशस्वीरित्या जिंकला. शिवाय, कोणताही सामना न गमावता विजेतेपद जिंकणारा तो पहिला संघ ठरला. भारताच्या विजयात त्रिशाने सिंहाचावाटा उचलला.

त्रिशाने बुधवारी हैदराबाद येथील ज्युबिली हिल्स येथील त्यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी रेड्डी यांनी अष्टपैलू त्रिशालाचे अभिनंदन केले आणि प्रोत्साहन जाहीर करताना तिला शाल आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी विजयी भारतीय संघाची सदस्य असलेल्या धृती केसरी, प्रशिक्षक शालिनी आणि मुख्य प्रशिक्षक नूशीन अल खादीर यांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे रोख प्रोत्साहन जाहीर केले.

भारताचा १९ वर्षांखालील महिला टी-२० विश्वचषक संघ मंगळवारी भारतात आला. विमानतळावर त्यांचे आगमन झाल्यानंतर, हैदराबाद क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष जगन मोहन राव अरिष्णपल्ली यांनी त्यांचे शाल-पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. ◀(वृत्तसंस्था)

# भारताच्या एकदिवसीय क्रिकेट शैलीत बदल

## जोस बटलरकडून रोहित शर्माचे कौतुक

◆ **नागपूर, ५ फेब्रुवारी**

व्हीसीएच्या जामठा स्टेडियमवर उद्या, गुरुवार, ६ फेब्रुवारी रोजी भारत-इंग्लंड यांच्यात सामना रंगणार आहे. नागपुरात तब्बल ६ वर्षांनंतर सामना होत असल्यामुळे क्रिकेटप्रेमींमध्ये वेगळाच उत्साह आहे. एका तासात ४० हजार तिकिटांची विक्री झाली. बुधवारी क्रिकेटप्रेमींनी जणू सामन्यासाठी तयारी केल्याचे दिसले. अनेक ठिकाणी लागलेल्या क्रिकेट साहित्याच्या दुकानांवर गर्दी दिसली. दोन्ही संघ दाखल झाले असून, सरावालाही लागले आहेत. दोन्ही संघ तुल्यबळ असल्याने एक चांगला सामना नागपूरकर क्रिकेटप्रेमींना पाहायला मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

बुधवारी इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने पत्रकारांसोबत



पत्रपरिषदेत बोलताना जोस बटलर

मनमोकळ्या गप्पा केल्या. यावेळी जोस बटलरने भारताच्या एकदिवसीय क्रिकेट शैलीत बदल आणल्याबद्दल रोहित शर्माचे कौतुक केले. तो म्हणाला, याचे श्रेय रोहित शर्माला द्यावे लागेल.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील मालिकेचा शुभारंभ नागपुरातील सामन्याने होत आहे. एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताला अधिक आक्रमक व्हावे लागले. ही शैली आत्मसात केल्याबद्दल त्याने भारताचा कर्णधार रोहित शर्माचे कौतुक केले. आमच्या खेळाडूंनीदेखील ही शैली आत्मसात करावी, असे मला वाटत असल्याचे बटलर म्हणाला. ◀(तभा वृत्तसेवा)

### इंग्लंडच्या क्षमतेवर विश्वास

आमचा संघ समतोल आहे. परंतु भारतीय संघही तुल्यबळ असल्याने ५० षटकांच्या या सामन्यात उत्तम व्यूहरचना आखावी लागेल. माझा माझ्या संघातील खेळाडूंच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास आहे, असेही तो म्हणाला. भारतीय संघावर दबाव आणण्यासाठी आमच्या संघाला मार्ग शोधावा लागेल. विजयासाठी मागील कामगिरी विसरून नव्या दमाने संघर्ष करावा लागेल, असेही बटलर म्हणाला. कारण इंग्लंडने ५० षटकांच्या फॉर्मेटमध्ये ११ पैकी फक्त ४ सामने जिंकले आहेत.

# महाराष्ट्राच्या महिला तिरंदाजी संघाला रौप्य



महाराष्ट्राचा महिला तिरंदाजी संघ

## अवघ्या एका गुणाने हुकले सुवर्ण

◆ **डेहराडून, ५ फेब्रुवारी**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत तिरंदाजी क्रीडा प्रकारात कम्पाऊंड राउंड महिलांमध्ये अखेरच्या क्षणांपर्यंत श्वास रोखायला लावणाऱ्या चुरशीच्या अंतिम लढतीत अदिती स्वामी, मधुरा धामणगावकर, प्रितिका प्रदीप व पूर्वशा शेंडे यांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र संघास रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. प्रतिस्पर्धी पंजाब संघाने अवघ्या एका गुणाच्या फरकाने बाजी मारत सुवर्णपदकावर नाव कोरले.

येथील मुख्य क्रिकेट स्टेडियममध्ये महाराष्ट्र विरुद्ध पंजाब हा अंतिम सामना अतिशय रंगतदार झाला. हवेच्या वेगात सुवर्णपदकासाठी दोन्ही संघातील तुल्यबळ तिरंदाज भिडले होते. तिरंदाजांनी मारलेला बाणाचा प्रत्येक वेध आणि त्यास मिळणारा प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद यामुळे सुवर्णपदकाची लढत डोळ्याची पारणे फेडणारी ठरली. अदिती स्वामी (सातारा), मधुरा धामणगावकर व प्रितिका प्रदीप (पिंपरी चिंचवड) व पूर्वशा शेंडे (अमरावती) या महिला संघाने सुवर्णपदकासाठी सर्वस्व पणाला लावले. मात्र, दोन वेळा मिळालेले ८ गुण महाराष्ट्राला महागात पडले अन् त्यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

त्याआधी, महाराष्ट्राच्या या महिला संघाने उपांत्यपूर्व सामन्यात उत्तराखंड संघावर २३३-२१४, तर उपांत्य सामन्यात तेलंगणा संघावर २२९-२२८ गुणांनी मात करत अंतिम फेरी गाठली होती. अंतिम सामना पंजाब संघाने २२९-२२८ गुण फरकाने म्हणजेच एका गुणाने बाजी मारत सुवर्णपदक पटकावले. कम्पाऊंड महिला संघाचे संघ मार्गदर्शक म्हणून प्रवीण सावंत यांनी यावेळी काम पाहिले.

सुवर्णपदकासाठी खेळत असलेल्या महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र संघटनेचे उपाध्यक्ष तथा पथक प्रमुख संजय शेटे, संघ व्यवस्थापक प्रवीण गडदे, संघ मार्गदर्शक प्रवीण सावंत, अमर जाधव, समीर मस्के, कुणाल तावरे आदींसह खेळाडूंची उपस्थिती होती.

'खरं तर आम्ही जोरदार लढत दिली. अवघ्या एका गुणाने हरलो म्हणजे आज नशीब आमच्या बाजूने नव्हते असेच म्हणावे लागेल. पंजाबच्या महिलांनीही चांगला खेळ त्यामुळे त्यासुद्धा सुवर्णपदकाच्या हकदार होत्या', असे रौप्यपदक विजेती अदिती गोस्वामी म्हणाली. ◀(वृत्तसंस्था)

# नेदरलॅण्ड, जर्मन बॅडमिंटन स्पर्धांसाठी भारताचा १७ सदस्यीय कनिष्ठ संघ जाहीर

◆ **नवी दिल्ली, ५ फेब्रुवारी**

या वर्षी फेब्रुवारी व मार्चमध्ये होणाऱ्या नेदरलॅण्ड कनिष्ठ आंतरराष्ट्रीय व जर्मन कनिष्ठ स्पर्धेत १७ वर्षांखालील गटाचा राष्ट्रीय विजेता ज्ञाना दत्तू टी. ही भारताच्या १७ सदस्यीय संघाचे नेतृत्व करणार आहे.

या संघात जागतिक कनिष्ठ क्रमवारीत सहावा क्रमांक पटकावणारा रौनक चौहान, आदर्शिनी श्री व दुहेरी तज्ज्ञ भव्य छाब्रा व परम चौधरी यांचा समावेश आहे. नेदरलॅण्ड कनिष्ठ आंतरराष्ट्रीय स्पर्धा २६ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान नेदरलॅण्डमधील हार्लेम येथे खेळला जाईल, तर जर्मन ज्युनियर ५ ते मार्च दरम्यान मुल्हेम अँ डेर रुहर येथे होईल.

भारतीय संघात चार मुले आणि मुलींचे एकेरी खेळाडू, दोन मुले दुहेरी आणि दोन मुलींचे दुहेरी संयोजन आणि दोन मिश्र दुहेरी जोड्या आहेत.

बीएआय निवड समितीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार संघाची निवड करण्यात आली, ज्यामध्ये हैदराबाद येथे झालेल्या अखिल भारतीय ज्युनियर रँकिंग स्पर्धेतील (१९ विजेत्यांना थेट प्रवेश देण्यात आला, तर उर्वरित जागा नवी दिल्ली येथे झालेल्या निवड चाचण्यांद्वारे भरण्यात आल्या. यात हैदराबाद स्पर्धेतील अव्वल क्रमांकाचे खेळाडू व उपांत्य फेरीतील खेळाडूंचा समावेश आहे.

नेदरलॅण्ड व जर्मनीतील स्पर्धा या तरुण खेळाडूंच्या विकासासाठी महत्त्वाच्या स्पर्धा आहेत. भारतीय खेळाडू गत काही वर्षांपासून या स्पर्धेत ठसा उमटवत आहेत, असे बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाचे सरचिटणीस संजय मिश्रा यांनी म्हटले आहे.

सूर्य करिश्माने २०२४ च्या जर्मन ज्युनियरमध्ये मुलींच्या एकेरीत कांस्यपदक जिंकले होते, तर आयुष शेट्टीने २०२३ च्या जागतिक ज्युनियर कांस्यपदक जिंकण्यापूर्वी एक वर्ष आधी मुलांच्या एकेरीत कांस्यपदक जिंकले होते.

२००८ मध्ये नेदरलॅण्ड कनिष्ठ आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे सुवर्णपदक जिंकणारा आरएमव्ही गुरुसाई दत्त हा एकमेव भारतीय मुलांच्या एकेरी खेळाडू आहे. त्याच वर्षी त्याने राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेत सुवर्ण व विश्व कनिष्ठ स्पर्धेत कांस्यपदकही जिंकले होते. ◀(वृत्तसंस्था)

# अभिषेक शर्माची दुसऱ्या स्थानावर झेप

## आयसीसी टी-२० फलंदाजी क्रमवारी

◆ **दुबई, ५ फेब्रुवारी**

फॉर्ममध्ये असलेला भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा बुधवारी आयसीसी पुरुष टी-२० खेळाडूंच्या क्रमवारीत ३८ स्थानांनी झेप घेऊन दुसऱ्या स्थानावर पोहोचला, तर त्याचा सहकारी तिलक वर्मा तिसऱ्या स्थानावर घसरला.

अभिषेकने आपल्या नवीन आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत सर्वोत्तम खेळी केली. त्याने मुंबईत इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या टी-२० सामन्यात जलद १३५ धावांची खेळी केली आणि भारताला ४-१ अशी मालिका जिंकून दिली, परिणामी, २४ वर्षीय अभिषेकने नवीनतम क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली.

ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड टी-२० फलंदाजांच्या यादीत आघाडीवर आहे, परंतु वानखेडेवरील आपल्या विक्रमी कामगिरीनंतर अभिषेक त्याच्यापेक्षा केवळ २६ रेटिंग गुणांनी मागे आहे.

कर्णधार सूर्यकुमार यादव पाचव्या स्थानावर आहे. हार्दिक पांड्या पाच स्थानांनी वर जाऊन ५१ व्या स्थानावर व शिवम दुबे ३८ स्थानांनी वर ५८ व्या स्थानावर पोहोचला आहे.

गोलंदाजांच्या क्रमवारीत फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्ती तीन स्थानांनी वर येऊन आदिल रशीदसह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत पाच बळी टिपणारा फिरकी गोलंदाज रवी बिश्नोई चार स्थानांनी वर येऊन सहाव्या स्थानावर आला आहे. डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग देखील नवव्या स्थानावर आहे.

वेस्ट इंडीजचा अकील होसेनने प्रथम क्रमांकाचा गोलंदाज म्हणून आपले स्थान मिळवले आहे.

३५ व्या कसोटी शतकानंतर हंगामी कर्णधार स्टीव्ह स्मिथ पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे. यशस्वी जयस्वाल कसोटी फलंदाजांच्या यादीत चौथ्या स्थानावर आहे.

पाठीच्या दुखापतीतून बरा होत असलेला जसप्रीत बुमराहने आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. रवींद्र जडेजा हा नवव्या स्थानावर असलेल्या टॉप १० मध्ये दुसरा भारतीय आहे. ◀(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राचा स्वप्निल कुसळे अंतिम फेरीत

◆ **डेहराडून, ५ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत बुधवारी महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल नेमबाजी स्पर्धेत २४५.७ गुणांसह हरयाणाच्या सुरुचीने सुवर्णपदक जिंकले. महाराष्ट्राच्या स्वप्निल कुसळेने पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळविले.

त्रिशूल शूटिंग रेंजमध्ये आज तीव्र

## महिलांच्या स्पर्धेत हरयाणाच्या सुरुचीला सुवर्ण

स्पर्धा पाहायला मिळाली. हरयाणाच्या पलकने २४३.६ गुणांसह रौप्यपदक जिंकले, तर पंजाबच्या सिमरनप्रीत कौर ब्रारने २१८.८ गुणांसह कांस्यपदक जिंकले.

पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन स्पर्धेत आठ नेमबाजांच्या अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी विविध राज्यांतील ३३ स्पर्धकांनी स्पर्धा केली.

अत्यंत स्पर्धात्मक पात्रता फेरीनंतर, मध्य प्रदेशचा ऐश्वर्य प्रताप सिंग तोमर (५९८), सेनादलाचा (एसएससीबी) चेन सिंग (५९४), नीरज कुमार (५९१) व निशान (५८९), महाराष्ट्राचा स्वप्निल सुरेश कुसाळे (५८८), उत्तर प्रदेशचा अखिल शेओरन (५८७), मध्य प्रदेशचा गोल्डी गुर्जर (५८७) आणि एसएससीबीच्या गंगा सिंगने (५८७) अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली.

पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन स्पर्धेची अंतिम फेरी गुरुवारी होणार आहे. ◀(वृत्तसंस्था)



स्वप्निल कुसळे

# आदिवासी खेळाडूंना लॉयड्स मेटल्समुळे न्याय मिळेल : रवी शास्त्री

## लॉयड्सच्या टी-२० सामन्यांचे उद्घाटन

### बी. प्रभाकरन यांची उपस्थिती

◆ **गडचिरोली, ५ फेब्रुवारी**

गडचिरोलीसारख्या आदिवासी जिल्ह्यात क्रिकेटचे सामने आयोजित करून या जिल्ह्यातील आदिवासी खेळाडूंना लॉयड्स मेटल्समुळे न्याय मिळेल. शिवाय या जिल्ह्यातील उत्तम खेळाडूंना चांगल्या संस्थेत प्रशिक्षण घेण्यासाठी संधी मिळेल, असे मत प्रसिद्ध माजी क्रिकेटर रवी शास्त्री यांनी व्यक्त केले आहे.

लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गडचिरोली प्रिमीयर (जीडीपीएल) लिग क्रिकेट स्पर्धेचे क्रिकेटर रवी शास्त्री यांच्या हस्ते ५ फेब्रुवारीला उद्घाटन



माजी क्रिकेटपटू रवी शास्त्री यांच्यासह लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन व मान्यवर

करण्यात आले, त्यावेळी ते मार्गदर्शन करत होते. याप्रसंगी लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन, गुजरातचे माजी पोलिस महासंचालक तथा लॉयड्स मेटल्सचे कार्यकारी संचालक एस. एस. खंडवावाला, संचालक विक्रम मेहता, बलराम सोमनानी आदींची उपस्थिती होती.

शहरातील एमआयडीसी मैदानावर ५ ते २४ फेब्रुवारीदरम्यान या स्पर्धा होणार असून, स्पर्धेचा पहिला साखळी सामना ५ फेब्रुवारीला दुपारी ५ वाजता सुरू करण्यात आला. रवी शास्त्री यांनी नाणेफेक करून सामन्याची सुरुवात केली. दररोज दोन सामने खेळले जाणार असून, दुपारी ४ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत पहिला सामना व ७.३० ते रात्री १०.३० वाजेपर्यंत दुसरा सामना खेळला जाणार आहे.

लॉयड्सच्या वतीने गडचिरोलीच्या इतिहासात पहिल्यांदाच क्रिकेटच्या अभूतपूर्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. आयपीएलच्या धर्तीवर लॉयड्स मेटल्सने संपूर्ण मैदान सजविले होते. चिअरगर्ल्सपासून तर स्पर्धेतील सर्व संघाचा मार्च पास्ट यावेळी या स्पर्धेचे आकर्षण ठरले. ही स्पर्धा गडचिरोलीकरांना बघता यावी, यासाठी लॉयड्सने प्रेक्षकांना स्पर्धेच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी वाहनांची व्यवस्था केली आहे. अशा प्रकारचे उच्चतम पातळीवरील सामने गडचिरोलीकर पहिल्यांदाच अनुभवत असून, जिल्ह्यातील वंचित खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासाठी लॉयड्स मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरण यांनी उचललेले पाऊल मोलाचे ठरेल.

या सामन्यात सर्व सुरक्षेची काळजी घेण्यात आली असून प्रेक्षकांना सुद्धा बसण्यासाठी उत्तम प्रकारची व्यवस्था कंपनीने केली आहे. १२ तालुक्यांतील १२ संघांसोबतच लॉयड्स मेटल्स कंपनीचा एक संघ, पोलिस विभाग व वनविभागाचा एक संघ उतरल्याने ही आनंदाची पर्वणी आहे. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अंगणवाडी बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पंढरीत आरंभ पालक मेळावा

### बीट एकच्या आरंभ मेळाव्याचे पालकांकडून कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ फेब्रुवारी-**

एकात्मिक बाल विकास प्रकल्प अंतर्गत घेण्यात आलेल्या आरंभ पालक मेळाव्याचे माध्यमातून अंगणवाडीतील बालकांचे सर्वांगीण विकासासाठी खेळ कृती, स्पर्श कृती, सोप्या पद्धतीने बौद्धिक विकास व्हावा यासाठी शासनाने नुकतेच आरंभ पालक मेळाव्याच्या माध्यमातून पालकांनी शून्य ते तीन वर्षे मुलांकडून घरातच सोप्या पद्धतीने खेळां मधून आपल्या बालकांचा विकास करुन घ्यावा यासाठी या मेळाव्यात विविध प्रकारच्या कृतीचे स्टॉल उभारण्यात आले होते.



प्रारंभी आरंभ पालक मेळाव्याचे उद्घाटन डॉक्टर संगीता पाटील यांनी केले. यानंतर एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी किरण जाधव, मुख्य सेविका सारिका सनगर, प्रमुख पाहुणे डॉक्टर संगीता पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

डॉ. संगीता पाटील म्हणाल्या की, बालकांच्या आयुष्याची सुरुवात कशा प्रकारे व्हावी यासाठी आरंभ पालक मेळावा अतिशय स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. प्रत्येक पालकाला वाटते आपली मुलं सुंदर असावेत सुदृढ असावेत तसेच बुद्धिमानही असावेत यासाठी शून्य ते तीन वर्षे वयापर्यंतच्या मुलांची जडणघडण वागणे बोलणे ही कृती मुलांवर किती परिणाम करते. अशा छोट्या छोट्या गोष्टीतून सर्व अंगणवाडी सेविकांनी स्टॉलच्या माध्यमातून दाखवले आहे. बालकांसोबत पालकही याचा आनंद घेत आहेत. आहाराच्या बाबतीतही सुंदर प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

बालविकास प्रकल्प अधिकारी किरण जाधव म्हणाले की, बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांचे खेळाकडे लक्ष केंद्रित करून आरोग्याच्या दृष्टीने त्यांना विकसित करण्यासाठी नवनवीन संकल्पना राबवून पालकांनी मुलांचे संगोपन कशा पद्धतीने करावे याची माहिती दिली. बालकांच्या मेंदूची वाढ ही पहिल्या दोन वर्षात साधारण ७५ टक्के होते. यावेळेस बालकाच्या आरोग्याबरोबरच सर्वांगीण विकासाकडे व बौद्धिक क्षमतेवर कृती करून घेणे आवश्यक आहे. असेही सांगितले.

### तर मुलांचा विकास होणार

आरंभ पालक मेळाव्याच्या माध्यमातून आरंभ संकल्पना राबविण्यात येत आहे. बालकांच्या सर्वांगीण विकास कशा पद्धतीने करावा हे प्रत्येक स्टॉलच्या माध्यमातून समजते. मोबाईलचा वाढता वापर कमी करण्यासाठी खूप साऱ्या संकल्पना राबवल्यास मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत मिळेल अशी प्रतिक्रिया मुख्य सेविका सारिका सनगर यांनी दिली.

## संक्षिप्त वृत्त



## शोभा हंडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**कुर्डूवाडी, दि. ५ फेब्रुवारी-**

पंचायत समिती कुर्डूवाडीच्या शिक्षण विस्तार अधिकारी शोभा हंडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सेवापूर्ती सन्मान सोहळ्यात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आ. विनायकराव पाटील, रावसाहेब देशमुख, पंचायत समितीचे माजी सदस्य धनराज शिंदे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, डॉ. मानसिंगराव घाटगे, माजी विस्तार अधिकारी ॲड. भगवानराव पाटील, मधुकरराव लोंढे-पाटील, ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण कांबळे, माजी सैनिक संघटनेचे माढा तालुका सचिव मेजर अरूण जगताप, माजी सरपंच संजय लोंढे, प्रियंका आतकर, डॉ. लकी दोशी, अंबुताई इतापे, चंदाराणी आतकर, सिमिंता कुंभार, मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख उपस्थित होते. तुळशीहार, १००० वह्या, पुस्तके भेट देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक संतोष जाधव यांनी तर सूत्रसंचालन सुधीर क्षीरसागर यांनी केले. यावेळी मराठा सेवा संघाच्या वतीने पुस्तक विक्रीचा स्टॉल लावण्यात आला होता. शोभा हंडे यांचे चिरंजीव डॉ. पंकज हंडे व निलेश देशमुख यांच्या संकल्पनेतून कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेतून शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्यांना वह्या आणण्याचे आवाहन केले होते. यामुळे २०२१ वह्या जमा झाल्या. या वह्या विद्यार्थ्यांना वाटण्यात येणार आहेत.



## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांचा सत्कार

**सांगोला, दि. ५ फेब्रुवारी-**

सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात ३ लाख ३७ हजार सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट ठेवून उतरलेल्या भाजपने जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांच्या नेतृत्वाखाली जवळपास २ लाख ११ हजार ४७३ इतक्या सदस्य नोंदणीपर्यंत मजल मारत राज्यात तिसरा क्रमांक पटकावला. ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात महायुतीचा एकही आमदार नसताना सदस्य नोंदणीत उल्लेखनीय कामगिरी केल्याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चेतनसिंह केदार सावंत यांचा सत्कार केला. यावेळी राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भाजप कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, माहिती-तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, विधान परिषदेचे गटनेते प्रवीण दरेकर, महामंत्री आ.विक्रांत पाटील, राजेश पांडे, माधवी नाईक, विजय चौधरी, संजय केनेकर उपस्थित होते.



## दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची प्रार्थना फाउंडेशनला क्षेत्रभेट

**नातेपुते, दि. ५ फेब्रुवारी-**

दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय संचलित यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठांतर्गत येणाऱ्या व्दितीय वर्ष बी. एड. कॉलेजच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट मोरवंची (ता. मोहोळ) येथील प्रार्थना बालग्राम ला झाली. मोरवंची येथील प्रार्थना फाउंडेशन संचलित प्रार्थना बालग्राममध्ये ६५ बेघर बालक व वयोवृद्ध महिला-पुरुष राहत असून त्यांना जेवण, राहणे, कपडे, दवाखान्याची सोय मोफत केली आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त, कुटुंबातील वंचित, बेघर, निराधार, दिन, दलित,वंचित, निराधार, अनाथ यांना या संस्थेत आधार दिला जातो. यावेळी प्रा. डॉ. पद्मश्री भोजे, डॉ. किसन शिंदे, डॉ. पन्हाळकर, पवार आदी मार्गदर्शक उपस्थित होते.


# दसूर पाटी येथे पिकअपच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

### जखमी बिबट्याच्या हल्ल्यात दोन युवक जखमी; तीन बिबट्यांचा वावर असल्याचे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ५ फेब्रुवारी-**

मंगळवारी संध्याकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास माळशिरस तालुक्यात दसूर पाटी येथे पिकअपच्या धडकेने बिबट्या मृत्युमुखी पडला. या धक्कादायक घटनेने सर्वत्र भितीचे सावट पसरले आहे.

दसूरपाटी येथे सायंकाळी साडेसातच्या दरम्यान पंढरपूरहून दसूरकडेकडे जाणाऱ्या पिकपला अचानक बिबट्या आडवा आला. महामार्ग असल्याने साहजिकच पिकअपला वेग होता. यामध्ये पिकअपची बिबट्यास जोरात धडक बसून बिबट्या महामागीचे कडेला जाऊन पडला. मोठा कसला आवाज आला हे पाहण्यासाठी चंद्रसेन रणवरे व समाधान खपाले घटनास्थळी गेले. यावेळी जखमी बिबट्याने या दोघांवर हल्ला करून चंडसेन रणवरे यांच्या पायाची पिंडरी धरली. प्रसंगावधान राखत त्यांनी त्याचा बिबट्याचा जबडा पकडला तर प्रसंगावधान राखत त्यांना वाचवण्याचा प्रयत्न चालू केला. त्यात त्यांनाही बिबट्याने जखमी केले. याप्रसंगी प्रत्यक्षदर्शी महश कापसे यांनी



तीन बिबटे असल्याची माहिती दिली. दरम्यान जबरदस्त धडक बसल्याने बिबट्याचा मृत्यू झाला. जखमीवर बोंडले येथील डॉ. जयंत चव्हाण यांच्या हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. जखमीची नावे चंद्रसेन रामचंद्र रणवरे (वय २९) व समाधान खपाले (वय २५, दोघेही रा. दसूर पाटी, ता. माळशिरस) येथील रहिवाशी आहेत.

घटनेची माहिती मिळतात वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, पोलीस उपनिरीक्षक संजय रेगुडे व पोलीस फौज फाटा दाखल झाला. माळशिरस वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र आटोळे, वनरक्षक प्रभावती कोंबडे, वनपाल अशोक लोखंडे, वनरक्षक तांबे, वनरक्षक गीते, वनरक्षक गुंड व इतर कर्मचारी दाखल झाले. सदर बिबट्याला शवविच्छेदनासाठी पुणे येथे घेऊन गेले.

# तबल २१ वर्षानंतर चपळगावकरांना मिळाले रेशन धान्य

### रेशन दुकान विकास सोसायटीकडे वर्ग; चेअरमन आप्पासाहेब पाटील यांचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

चपळगाव (ता. अक्कलकोट) येथील शासनमान्य स्वस्त धान्य दुकान काही तांत्रिक कारणांमुळे बावकरवाडीत हलविण्यात आले होते. यामुळे तब्बल २१ वर्षे चपळगावातील गोरगरीब कुटुंबांना पाच किलोमीटर पायपीट करत बावकरवाडी येथून धान्य घेऊन यावे लागत असे. मात्र सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब पाटील यांनी आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत शेवटी स्वस्त धान्य दुकान चपळगाव विविध कार्यकारी सोसायटीकडे वर्ग करण्यासाठी आवश्यक प्रयत्न केले. यास यशही मिळाले.

चपळगाव येथील स्वस्त धान्य दुकान विकास सोसायटीकडे वर्ग करण्यात आला असून त्यानिमित्त आलेल्या धान्याचे पूजन व वाटप सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब पाटील, व्हा. चेअरमन खंडप्पा वाले, माजी चेअरमन नंदकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.सुरुवातीस धन-धान्यलक्ष्मी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून आलेल्या नूतन मालाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष सोमनाथ बानेगाव, पोलीस पाटील विवेकानंद हिरेमठ, राजकुमार भंगे, दिलीप बुगडे, किसान सभेचे अध्यक्ष दयानंद फताटे, संचालक पंडित भुसणगे, कुमार दुलंगे, शरणप्पा ख्याडे, सेक्रेटरी अंबण्णा दुलंगे, व्यवस्थापक महादेव रामपुरे, सुभाष बुगडे, सुभाष हन्नुरे, चंद्रकांत पाटील, धनाप्पा डोळ्ळे, काशिनाथ रामपूरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चपळगाव हे जवळपास दहा हजार लोकसंख्येचे गाव आहे. स्वस्त धान्य दुकान सोसायटीच्या माध्यमातून गाव पातळीवर आल्याने या कुटुंबांना आता मोठा आधार मिळणार आहे व त्यांची पायपीट थांबणार आहे.ही बाब चेअरमन आप्पासाहेब पाटील यांनी सातत्याने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे लावुन धरली. कल्याणशेट्टी यांनी देखील सातत्याने संबंधित विभागाकडे पाठपुरावा केला आहे.



रेशन दुकान विकास सोसायटीकडे वर्ग करण्यासाठी आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे सहकार्य लाभले. आता किरकोळ डागडुजी दुरुस्ती व रंगकाम करून सर्व डायरेक्टर मिळून सोसायटीच्या माध्यमातून गावची सेवा करू. **- आप्पासाहेब पाटील, चेअरमन, विकास सोसायटी, चपळगाव**

# बार्शीच्या अध्यापिका विद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन साजरे



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ फेब्रुवारी-**

बार्शी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अध्यापिका विद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्या अनुसया चौगुले होत्या. यावेळी जयश्री लोंढे, प्रा. जीवन लोखंडे, प्रा. प्रमोद मांडे उपस्थित होते.

स्नेहसंमेलनाची सुरुवात ओमकार स्वरचपा या गीताच्या नृत्याने झाली. यामध्ये प्रीती गडदे, दीपाली भिसे, साक्षी देशमुख, अश्विनी पाटील, सोनाली गायकवाड व श्रद्धा सुदामे यांनी सहभाग नोंदवला. 'नाश थांबवा' हे समूहगीत स्नेहा गात व प्रतीक्षा भोगे यांनी सादर केले. हिंदी चित्रपट गीतावर आधारित विविध मिक्स नृत्य विद्यार्थिनींनी सादर केले. यामध्ये प्राची साळुंखे, मृणाल जाधव, श्रद्धा सुदामे, भाग्यश्री नागरगोजे, तेजश्री तरटे, सोनाली कुडवे, प्रतीक्षा देशमुख, सानिका डोके, तेजस्विनी जगताप यांनी सहभाग नोंदवला. हिंदी गीत गायनामध्ये करिष्मा शिंदे यांनी एक प्यार का नगमा है, तंजीला सय्यद यांनी तुम दिल की ही गीते सादर केली.

लिंगाष्टकम स्तोत्रम अश्विनी पाटील व सुजाता अचलेरे यांनी सादर केले. चला जेजुरीला जाऊ या गीतावर मयुरी देशमुख हिने, मराठी रिमिक्स प्रगती गायकवाड व वैष्णवी ओमन, साक्षी गरड यांनी सादर केले. विद्यार्थिनींनी विविध लावणी नृत्य सादर केली. यामध्ये तंजीला सय्यद, साक्षी देशमुख, जिद्दी सोनवणे, सांची मिसाळ, मोनिका धुमाळ, साक्षी जाधव, सादिया शेख यांनी सहभाग नोंदवला.

प्रा. रतिकांत हामणे लिखित व जीवन लोखंडे दिग्दर्शित समाज प्रबोधनपर लघुनाटिका 'सेलिब्रेशन' सादर करण्यात आली. सुंदर, निरामय व निसर्गानुरुप जीवन जगण्याच्या सेलिब्रेशनचे दर्शन या नाटिकेतून झाले. ही लघुनाटिका उपस्थित विद्यार्थिनी व पालकांच्या हृदयास स्पर्श करुन गेली .यामध्ये मृणाल जाधव, श्रद्धा सुदामे, भाग्यश्री नागरगोजे, तेजश्री तरटे, सुनीता मुंडे, ऋतुजा कागदे, रिया चौधरी व दिव्या क्षीरसागर यांनी सहभाग नोंदवला. वैष्णवी रोंगे, मानसी गिराम, गायत्री केंदळे व रेणुका पेटाडे यांनी प्रांगणात काढलेल्या रांगोळीने प्रसन्नता आली. आभार प्रा. सोमनाथ देंडे यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. बजरंग वाघमोडे, प्रा. सुभाष माळी, प्रा. अशोक घुले तसेच प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

# अणदूर मुख्य रस्त्याचे प्रकरण चिघळले

### आठ दिवसांत कारवाई न झाल्यास ग्रामपंचायतीला कुलूप ठोकणार; शिवसेनेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ५ फेब्रुवारी-**

बहुचर्चित अणदूर स्टॅण्ड ते आण्णा चौक या १० मीटर रुंद सिमेंट रस्त्याचे काम, दोन्ही बाजूस गटार, एमजीपीची नवीन पाईपलाईन रस्त्याच्या कडेला अगोदर पुरणे, अतिक्रमण हटवून रस्ता रुंद करणे, तसेच अंदाजपत्रकाप्रमाणे काम व्हावे तेव्हाच सदरील काम चालू करावे, ८ दिवसांत अगोदर कामे पूर्ण करूनच मुख्य रस्ता करावा, अन्यथा ग्रामपंचायतीला कुलूप ठोकण्यात येईल, अशा आशयाचे निवेदन शिवसेना माजी तालुका प्रमुख बाळकृष्ण घोडके-पाटील यांनी ग्रामविकास अधिकारी व सरपंचांना दिले आहे.

तीर्थक्षेत्र पर्यटन योजनेंतर्गत जवळपास २ कोटी रुपये अंदाजपत्रक असलेल्या या अणदूर गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे काम सध्या सुरू असून, एका बाजूने रस्ता खोदून त्यात खडी टाकण्यात आली आहे. आपल्या निवेदनात बाळकृष्ण घोडके-पाटील म्हणतात की, अत्यंत महत्त्वाचा असा हा रोड असून खंडोबा मंदिरास जाणारे भक्त, प्रस्तावित अक्कलकोट तीर्थक्षेत्री जाणारे भक्त, त्यांच्या गाड्या या रस्त्यावरून जाणार आहेत. अणदूर परिसरात उसाचे क्षेत्र जास्त असल्याने कारखान्यास जाणाऱ्या ट्रक, तसेच अणदूर हे शैक्षणिक हब असल्याने शाळकरी विद्यार्थी याच रोडने जाणार आहेत. त्यामुळे हा रोड अत्यंत महत्त्वाचा असून, रोडच्या दोन्ही बाजूस गटार तसेच एमजीपीची नवीन पाईपलाईन अगोदर रोडच्या बाजूने



पुरण्यात यावी, त्याला दुसऱ्या बाजूने आडवे पाईप टाकावेत, रस्त्याच्या मध्ये डिव्हाडर, स्ट्रीट लाईट करावी, सध्याचे लाईटचे पोल काढणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूंची अतिक्रमणे काढणे, आदी बाबी पूर्ण करूनच हा नवीन सिमेंट रोड करण्यात यावा, ही सर्व कार्यवाही ग्रामपंचायतीने येत्या ८ दिवसांत पूर्ण करावी अन्यथा ग्रामपंचायतीला कुलूप ठोकणार आहे. त्यांच्या या निवेदनामुळे खंदुन ठेवलेला हा रस्ता आता कधी होणार याचा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे, ग्रामपंचायत प्रशासन यावर आपली कोणती भूमिका घेणार हे येणाऱ्या काळात पाहायला मिळेल.

## निधन वृत्त



### नागव्वा कुंभार

**अक्कलकोट, दि. ५ फेब्रुवारी-**

येथील एमआयडीसीमधील नागव्वा सिद्राम कुंभार (वय ८८)यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी दत्तात्रय कुंभार यांचे त्या मातोश्री होत.



### शकुंतला थिटे

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

शकुंतला त्रिंबक थिटे (वय ८२) यांचे दि. ३ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सूना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दि. ४ फेब्रुवारी रोजी मोदी स्मशानभूमीत त्यांचा अंत्यविधी करण्यात आला. नेहरू युवा केंद्राचे राज्य संचालक प्रमोद हिंगे यांच्या त्या सासू होत.



### हाजी रसुल नदाफ

**अकलूज, दि. ५ फेब्रुवारी-**

शंकरनगर स्वरूपनगर येथील हाजी रसुल मोहियोद्दीन नदाफ (वच ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. अकलूज येथील सार्वजनिक बांधकाम विभाग शासकीय विश्रामगृहाचे स्वागतकार जिब्राइल नदाफ यांचे ते वडील होते.

# ग्रामीण डाक जीवन विम्यातून मिळाले साडेअकरा लाख

### माळीनगर येथील निकम कुटुंबियांना मिळाला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ फेब्रुवारी-**

अकलूज येथील प्रसिद्ध अशा डॉक्टर श्री. इनामदार यांच्या अश्विनी हॉस्पिटल मध्ये उदयसिंह साईप्रकाश निकम हे कार्यरत होते. त्यांनी कार्यरत असतानाच उतरवलेल्या भारतीय डाक विभागाच्या ग्रामीण डाक जीवन विम्यातून त्यांच्या निधनानंतर रु. ११ लाख ३९ हजार ४५६ चा धनादेश त्यांच्या वारसदार पत्नी अर्चना निकम याना काल दिनांक ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी अश्विनी हॉस्पिटल, अकलूज येथे सुपूर्द करण्यात आला.



आजच्या धावपळीच्या आणि कोरोना सारख्या महामारीच्या काळामुळे कधी काय होईल हे सांगता येत नाही याची जाण ठेऊन आपण नसल्यानंतरही आपल्या कुटुंबाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांनी भारतीय डाक विभागाची ग्रामीण डाक जीवन विमा पॉलिसी जून २०२० मध्ये घेऊन महिना रु. ४ हजार ४०० भरून गुंतवणुकीस सुरुवात केली. विमा घेतल्यानंतर तीन वर्षाच्या आतच त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करून रीतसर प्रक्रिया पूर्ण करून पंढरपूर डाक विभागामार्फत वारसदार पत्नी अर्चना निकम याना विमाच्या रकमेचा रु.११ लाख ३९ हजार ४५६ चा धनादेश ४ फेब्रुवारी २०२५ रोजी अश्विनी हॉस्पिटल, अकलूज येथे डॉ. इनामदार, पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक सी. बी. भोर, इंडिया पोस्ट बँकेचे शाखा व्यवस्थापक विनायक पासंगराव, सचिन इमडे, विकास अधिकारी सोमनाथ कोरके, विपणन अधिकारी विष्णू कांदे, पोस्ट मास्टर सदाशिवनगर निलेश खरात यांच्यासह कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थित सुपूर्द करण्यात आला.

### अशी आहे योजना

ग्रामीण डाक जीवन विमा ग्रामीण भागातील कायमचे वास्तव्य असणारी आणि वयोगट १९ ते ५५ पर्यंतची कोणतीही व्यक्ती या योजनेचा लाभ घेऊ शकते. या योजनेचा लाभ १० लाखापर्यंत घेऊ शकतो. तसेच भारतीय डाक विभागाची डाक जीवन विमा योजना केंद्र, राज्य कर्मचाऱ्यांसोबतच आता डिप्लोमा , पदवीधर यांच्याकरिता हिताची आहे. कोणत्याही शाखेचे पदवीधरांसाठी उपलब्ध झाली आहे. या योजनेत कमी हप्ता व जास्त बोनसचा लाभ मिळतो. तसेच आयकर ८० सी अंतर्गत सूट मिळते. ही योजना पूर्णपणे सुरक्षित आहे. या योजनेचा लाभ ५० लाखापर्यंत घेऊ शकतो. या योजनेचा सर्वांनी फायदा घ्यावा, असे आवाहन पंढरपूर डाक विभागाचे अधीक्षक सी. बी. भोर यांच्याकडून करण्यात येत आहे.

## संक्षिप्त वृत्त




### शुक्रवार पेठ येथील माणिक आयकॉन इमारतीचे भूमिपूजन

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

शुक्रवार पेठ माणिक चौक येथील आजोबा गणपती समोर दिमाखात उभा राहणाऱ्या माणिक आयकॉन या व्यावसायिक इमारतीचे भूमिपूजन बुधवार ५ फेब्रुवारी रोजी थाटात पार पडले. याप्रसंगी खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह क्रेडाईचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि शहरातील उद्योजक, बांधकाम व्यावसायिक, प्रतिष्ठित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. माणिक आयकॉन या चार मजली इमारतीमध्ये मोठी शोरूम्स, डॉक्टर्स क्लिनिक आणि ऑफिसेस असणार आहेत. शहरातील नामांकित बांधकाम व्यावसायिक प्रियदर्शन शहा आणि डॉ. मयूरप्रिया विराणी यांनी शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित राहिलेल्यांचे आभार मानले.

### बारावी परीक्षेसाठी अत्याधुनिक यंत्रणा सज्ज; ड्रोनची असणार नजर

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्ह्यात दहावी बारावीच्या परीक्षा दरम्यान कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेरा, व्हिडिओ शूटिंग बरोबरच प्रत्येक पर्यवेक्षकाच्या खिशातील मोबाईलवर झूम मीटिंगच्या कॅमेराद्वारे नजर ठेवण्यात येणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली. दहावी व बारावी बोर्डाच्या परीक्षेच्या दरम्यान कॉपीमुक्त अभियान राबवण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी बुधवारी दक्षता समितीची बैठक घेतली. कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व त्या उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या आहेत. त्यानुसार परीक्षा केंद्रांचे नियोजन करण्यात येत असल्याचे माध्यमिक शिक्षणाधिकारी जगताप यांनी सांगितले. १९७२ पासून बोर्डाच्या परीक्षा सुरू झाल्या. या कालखंडानंतर पहिल्यांदाच कॉपीमुक्त अभियानासाठी अत्याधुनिक यंत्रणाचा वापर करण्यात येत आहे असे शिक्षणाधिकारी जगताप यांनी सांगितले. दरम्यान, जिल्ह्यातील १४७ संवेदनशील केंद्रावर ड्रोनची नजर असणार आहे. परीक्षा केंद्र बाहेरून कॉफीचा पुरवठा होऊ नये यासाठी ही दक्षता घेतली जाणार आहे. त्याचबरोबर परीक्षा केंद्राच्या एक किलोमीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर, ऑनलाइन सेवा केंद्र परिक्षा काळात बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्रावरील स्थितीचे व्हिडिओ चित्रीकरण होणार आहे. पण त्याही पुढे जाऊन प्रत्येक हॉलवरील पर्यवेक्षकांच्या मोबाईलवर झूम मीटिंगची लिंक दिली जाणार आहे. यासाठी वॉररूम स्थापन करण्यात येणार असून यातून झूम मीटिंगचा कॅमेरा सुरू करून पूर्ण हॉलवर नियंत्रण ठेवले जाणार आहे. कॉपी तपासणीसाठी जिल्हा परिषद व शिक्षण शिक्षण खात्याबरोबरच महसूलमधील तहसीलदार, तलाठी, ग्रामसेवक यांचे बैठे पथक परीक्षा केंद्रावर असणार आहे. जिल्ह्यात कॉपीमुक्त परीक्षा अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणा तयार असल्याचे शिक्षणाधिकारी जगताप यांनी सांगितले.

### सुरेश फलमारींचे श्रीमार्कंडेय रुग्णालयाचे संचालकपद बेकायदेशीर

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश पलमारी यांनी पूर्वभागातील श्रीमार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय व संशोधन केंद्राच्या संचालक मंडळाच्या ओबीसी जागेवर बेकायदेशीररित्या निवडून आले, असा आक्षेप घेत माजी नगरसेवक नागेश वल्याळ यांनी न्यायालयात धाव घेतली होती. यावर न्यायालयाने सुरेश पलमारी यांचे श्रीमार्कंडेय रुग्णालयातील संचालकपद हे बेकायदा आहे, असा निकाल दिला आहे. १६ ऑक्टोबर २०२२ रोजी श्रीमार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयची पंचवार्षिक निवडणूक झाली होती. या निवडणुकीत ओबीसीच्या एका जागेसाठी पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश पलमारी आणि माजी नगरसेवक नागेश वल्याळ यांच्यात लढत होवून पलमारी हे विजयी झाले होते. परंतु सुरेश फलमारी हे एसबीसी या प्रवर्गात मोडतात. असे असताना ओबीसीचा दाखला मिळवित ही निवडणूक लढविली होती. सुरेश फलमारी यांनी यापुर्वी सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँकेच्या निवडणुकीतही ओबीसीच्या जागेवर निवडून येवून पाच वर्षे संचालकपद उपभोगले होते. या सर्व बाबींकडे लक्ष वेधत माजी नगरसेवक नागेश वल्याळ यांनी पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांच्या निवडीच्या विरोधात न्यायालयात धाव घेतली होती. याप्रकरणी न्यायालयाने पुरेशी संधी देवूनही ते आपली बाजू मांडू शकले नाहीत. त्यामुळे सुरेश फलमारी यांचे संचालकपद हे बेकायदा असून या दाव्याचा खर्चही सुरेश फलमारी यांच्याकडून घेण्यात यावा, असा निकाल न्यायालयाने दिला आहे. याप्रकरणी ॲड. मनोज पामूल, ॲड. राकेश कॉपेल्ली, ॲड. बालराज कैरमकोंडा, ॲड. स्वप्नील पुंजाल, ॲड. ज्योती अल्ली, ॲड. श्रीनिवास बंडी, ॲड. तुषार पामूल यांनी नागेश वल्याळ आणि ॲड. उमेश मराठे यांनी सुरेश पलमारी यांच्यावतीने काम पाहिले.

### घरगुती वादातून तरूणाचा ब्लेडने वार करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

घरगुती वादातून तरूणाने ब्लेडने वार करून घेत आत्महत्येचा प्रयत्न केला.आकाश अशोक व्हनमाने (वय २७, रा. गजानन नगर, जुळे सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. आकाश व्हनमाने याने ४ फेब्रुवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास २ नं. झोपडपट्टीमधील आम्रपाली चौक येथे आजीच्या घरी असताना घरगुती वादातून स्वतःहून डाव्या हातावर ब्लेडने वार करून घेतले. त्यामध्ये आकाश हा जखमी झाल्याने त्यास आई रूपाली यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# १५१ सेविका, ४१६ मदतनीस भरतीसाठी ग्रीन सिग्नल

### महिला व बालविकास विभागाकडून पदभरतीचे निघाले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

अंगणवाडी भरतीची प्रतीक्षा आता संपणार आहे. महिला व बालविकास विभागाकडून अंगणवाडी पर्यवेक्षक, मुख्य सेविका आणि मदतनीस यांसारख्या रिक्त पद भरतीचे आदेश देण्यात आले आहेत. त्यासाठी शंभर दिवसांचे उद्दिष्टे ठेवण्यात आले असून या काळात संपूर्ण भरती प्रक्रिया पार पार पडणे आवश्यक असल्याचे असलेल्या महिलांची प्रतीक्षा लवकरच शासनाने स्पष्ट केले आहे. सोलापुरातील नागरी व ग्रामीण भागात अंगणवाडी सेविकांच्या १५१ व मदतनीसाची ४१६ पदे रिक्त आहेत.

दरम्यान, महिला व बालविकास विभागाने रिक्त जागा भरण्याचा निर्णय घेतला आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी किमान बारावी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ऑगस्ट २०२२ पूर्वी भरती झालेल्या मदतनीस दहावी उत्तीर्ण असतील त्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार थेट अंगणवाडी सेविका पदी नियुक्त केले जाणार आहे. त्यानंतर रिक्त पदासाठी जाहिरातीद्वारे भरती करण्यात येणार आहे. ग्रामीण भागात त्या त्या ग्रामपंचायतीमधील स्थानिक उमेदवार तर महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात तेथील स्थानिक उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील, पूर्वी फक्त संबंधित वार्डमधील उमेदवारांनाच अंगणवाडी सेविका, यापूर्वी फक्त संबंधित प्रभागातीलच उमेदवारांना अंगणवाडी सेविका व मदतनीस म्हणून निवडले जात होते. आता मात्र यात बदल करण्यात आला आहे. महापालिकेच्या संपूर्ण क्षेत्रात यासंबंधी निवड केली जाणार असल्याने भरतीसाठी मोठी स्पर्धा पाहायला मिळेल. या अंगणवाडी भरतीसाठी उमेदवारांना कोणतीही लेखी परीक्षा द्यावी लागणार नाही, उमेदवारांचे गुणांकन निवडीसाठी महत्त्वाचे ठरणार असल्याचे सांगण्यात आले.

**नागरी व ग्रामीण भागात भरण्यात येणारी सेविका व मदतनीस पदे**

| तालुका | सेविका | मदतनीस |
|---|---|---|
| अक्कलकोट | २५ | ४९ |
| बार्शी | २३ | २४ |
| वैराग | १४ | १५ |
| करमाळा | ७ | २९ |
| माढा | १४ | १० |
| टेंभुर्णी | २ | ६ |
| माळशिरस | २ | १०५ |
| अकलूज | ४ | १४ |
| मंगळवेढा | ३ | ६ |
| मोहोळ | ३ | १५ |
| उ.सोलापूर | १४ | ७ |
| पंढरपूर १ | १२ | ३४ |
| पंढरपूर २ | १० | ३४ |
| सांगोला | ५ | ७ |
| द.सोलापूर | ९ | ३९ |
| कोळा | ४ | ८ |

#### मदतनीसांच्या रिक्त पदांचा सेविकांवर ताण

शहर व नागरी प्रकल्पांमधील अंगणवाडी मदतनीस च्या सर्वाधिक ४१६ जागा रिक्त आहे. भरती प्रक्रीया अनेकदा पुढे गेल्यामुळे सेविकांवर. कामाचा ताण बाढला आहे. बालकांना शाळेत बोलावणे, अंगणवाडीची स्वच्छता, पोषण आहार शिजवणे, लसीकरण, गृह भेटी यासह अनेक काम सेविकांना करावी लागत आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यात ३९ मदतनीसाची पदं मागील पाच ते सहा वर्षांपासून रिक्त आहेत. हक्क रजा, सुट्टी देखील मिळत नाहीय. काही ठिकाणी पर्यवेक्षकाकडून सातत्याने कारवाईचा धाक दाखविणे, अंगणवाडीच्या वाढलेल्या वेळांमुळे सेविका त्रस्त आहेत.

#### नव्याने भरती प्रक्रिया राबवण्याची प्रक्रिया

शासनाद्वारे भरती प्रक्रिया नियुक्त आदेश निघाले आहेत. निवड समितीने अंतिम केलेली गुणवत्ता पडताळणी वगळून भरतीची प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर नसेल. नव्याने भारतीय प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्या संबंधीची सर्व माहिती नागरी व ग्रामीण प्रकल्पांच्या एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयात सविस्तर उपलब्ध ठेवण्यात येणार आहे.

**- प्रसाद मिरकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद, सोलापूर**



## दाराशा नागरी आरोग्य केंद्रासह प्रसुतिगृहाचे नूतनीकरण अंतिम टप्प्यात

### आयुक्त तेली-उगले, बालाजी अमाईन्सचे रेड्डी यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सातारा, दि.५ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत दाराशा नागरी आरोग्य केंद्र व प्रसुतीगृहाचे नूतनीकरण बालाजी अमाईन्सच्या १ कोटी रुपयांच्या सीएसआर फंडातून करण्यात येत आहे. हे काम अंतिम टप्प्यात असून त्याची पाहणी बुधवारी आयुक्त शीतल तेली -उगले व बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांनी केली. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकुलवार, विभागीय अधिकारी महेश क्षीरसागर, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी,मल्लीनाथ बिराजदार,वैद्यकीय अधिकारी आतिश बोराडे,शशिकांत चिंचोळी,प्रसाद सांजेकर आदी उपस्थित होते. या प्रसुतीगृहामध्ये महिलांकरिता व गरोदर मतांकरिता महिलांच्या आरोग्य विषयक सेवांची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.त्या अनुषंगाने आज पाहणी केली असून उर्वरित कामे लवकर पूर्ण करण्याचे सूचना महापालिका आयुक्त शीतल तेली -उगले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

#### निधीतून मिळणार या सोयीसुविधा

बालाजी अमाईन्सच्या १ कोटी निधीतून प्रसुतीगृहाकरिता अद्ययावत व सुसज्य शस्त्रक्रिया गृहाकरिता लागणारी सर्व अद्ययावत उपकरणे, स्वतंत्र व सुसज्य प्रसूतीगृह, प्रसुत नवजात शिशु करिता स्थिरीकरण कक्ष, जोखीमग्रस्त व अति गुंतागुतीच्या गरोदर मातांकरिता अतिदक्षता विभाग तसेच प्रसुतपूर्व तपासणीकरिता येणाऱ्या गर्भवती मतांना सुसज्य प्रतिक्षालय तसेच प्रसुत पूर्व तपासण्या उपलब्ध राहणार आहेत. यामध्ये सोनोग्राफी, प्रयोगशाळा तपासण्या आदी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. याशिवाय प्रसुतीगृहाकरिता २४ तास वीज पुरवठा उपलब्ध रहावा याकरिता स्वतंत्र डिझेल जनरेटर तसेच रुग्णांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय, आंघोळीसाठी गरम पाण्याची व्यवस्था व रुग्णांना उद्वाहन (लिफ्ट) सुविधाही उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

# लोकमंगलचे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर

### रविवारी वितरण; कुलकर्णी, गायकवाड, जोशी, ठाले-पाटील मानकरी







**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

लोकमंगल समूहाततर्फे दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा रविवारी दि. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजून २० मिनिटांनी प्रमुख अतिथी ज्येष्ठ साहित्यिक आसाराम लोमटे यांच्या उपस्थितीत हिराचंद नेमचंद वाचनालयातील किर्लोस्कर सभागृहात होणार असल्याची माहिती आ. सुभाष देशमुख यांनी दिली.

लोकमंगलच्या वतीने देण्यात येणाऱ्या साहित्य पुरस्काराचे यंदाचे हे दहावे वर्ष आहे. संग्राम गायकवाड यांच्या मनसमझावन या कादंबरीला तसेच चंद्रकांत कुलकर्णी यांच्या चंद्रकांत कुलकर्णी सादर करत आहे या आत्मपर लेखनाला तर गोल्पे विभोर गल्पेर बागान बाणी बसू यांच्या बंगाली कथा संग्रहाचे मराठी अनुवाद करणाऱ्या सुमती जोशी यांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येणार आह. मराठी भाषा वाङ्मय संस्थात्मक योगदानाबद्दल आणि साहित्य क्षेत्रात लक्षणीय कार्य केल्याबद्दल कौतिकराव ठाले-पाटील यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

#### कृषी भूषण पुरस्काराची घोषणा

या पत्रकार परिषदेत आ. सुभाष देशमुख यांनी शेतकऱ्यांसाठी कृषी भूषण पुरस्कार देण्यात येणार असल्याची घोषणा केली. लोकमंगलतर्फे हा नवा पुरस्कार जाहीर करण्यात येणार आहे. दि.१ जुलै रोजी या पुरस्काराचे वितरण होणार असल्याचे आ. देशमुख यांनी जाहीर केले.

रोख २५ हजार रुपये, स्मृती चिन्ह आणि सोलापुरी चादर असे या पुरस्काराचे स्वरूप आह. यावेळी सोलापुरातील सुनिता डागा यांच्या हजार मैलावर तुझे शहर या कविता संग्रहास पुरस्कार जाहीर करण्यात आला आह. रोख ११ हजार रुपये, स्मृती चिन्ह आणि सोलापुरी चादर असे या पुरस्काराचं स्वरूप आहे. या पुरस्कार समारंभाप्रसंगी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आ. सुभाष देशमुख यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस शोभा बोल्ली, शिरीष देखणे, नितीन वैद्य, विजय साळुंखे, श्रीधर खेडगीकर, पद्माकर कुलकर्णी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# भाऊसाहेब महाराजांचा आदर्श वारसा अखंडपणे चालवण्याचा केला निर्धार

**तभा वृत्तसेवा,**
**सातारा, दि. ५ फेब्रुवारी-**

स्व. श्रीमंत छ. अभयसिंहराजे भोसले तथा भाऊसाहेब महाराज यांनी सातारा तालुक्यात समाजकारण आणि सहकाराच्या माध्यमातून अलौकिक अशी क्रांती घडवली आहे. अजिक्य उद्योग समुहातील अनेक सहकारी संस्थांसह तालुक्यातील असंख्य गावात विविध सहकारी संस्थाचे जाळे निर्माण करून त्यांनी सर्वांना सहकारातून समृद्धीकडे नेण्याचा आदर्शवत प्रयत्न केला. त्यांनी घालून दिलेल्या आदर्श विचारसरणीच्या वाटेवरून वाटचाल करत कायम शेतकरी हित जोपाण्याचा त्यांचा वारसा अखंडपणे चालवू, असा निर्धार स्व. आ. श्रीमंत छ. अभयसिंहराजे भोसले यांच्या २१ व्या पुण्यतिथीनिमित्त करण्यात आला.

अजिक्य उद्योग समुहाचे संस्थापक स्व. अभयसिंहराजे भोसले यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी सकाळी अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना लि. शेंद्रे कार्यस्थळावरील स्व. अभयसिंहराजे भोसले यांच्या स्मृतिस्थळावरील पूर्णाकृती पुतळा व स्मृतिस्तंभास अभिवादन करण्यासाठी अवघा जनसागर लोटला. स्व. भाऊसाहेब महाराजांना विविध मान्यवरांनी अभिवादन व पुष्पांजली अर्पण केली. यावेळी कारखान्याचे मार्गदर्शक संचालक, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यशवंत साळुंखे, व्हा. चेअरमन नामदेव सावंत, कार्यकारी संचालक जिवाजी मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सह्याद्री भजनी मंडळ लिंब यांचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास प्रतापगड सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सौरभ शिंदे, शिवाजी मर्ढेकर, चंद्रकांत जाधव, राजू भोसले, सतिश चव्हाण, किरण साबळे- पाटील, वनिता गोरे, सरिता इंदलकर, राहूल शिंदे, छाया कुंभार, सुनिल काटे, धनाजी शेडगे, अनिल देसाई, सुरेश सावंत, ज्ञानदेव रांजणे, कांचन साळुंखे, बाळकृष्ण फडतरे, अजिंक्यतारा सूत गिरणीचे अध्यक्ष उत्तमराव नावडकर, उपाध्यक्ष जालिंदर महाडीक, संचालक वसंतराव टिळेकर, अजित साळुंखे, पंडीतराव सावंत, गणपतराव शिंदे, गणपतराव मोहिते, विक्रम पवार, मधुकर पवार, संचालक विजय पोतेकर, राजेंद्र यादव, कृष्णा धनवे, सयाजी कदम उपस्थित होते.



**स्व. श्रीमंत छत्रपती अमयसिंहराजे भोसले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करताना आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले व मान्यवर.**

# सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या ४४ जणांवर दंडात्मक कारवाई

### शहरातील पान टपरीवाल्यांची उडाली खळबळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

सार्वजनिक ठिकाणी थुंकून घाण करणाऱ्यांवर महापालिका प्रशासनाने आता धडक कारवाई सुरू आहे. आज तिसऱ्या दिवशी महापालिकेच्या विविध पथकाने शहरात सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या ४४ व्यक्ती आणि पान टपरी धारकांवर दंडात्मक कारवाई केली आहे. या कारवाईत ६ हजार ४०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. या मोहिमेमुळे पान टपरीधारक परिसर स्वच्छता करून घेत आहेत. या कारवाईमुळे पान टपरीधारकांमध्ये खळबळ उडाली आहे.

आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशान्वये आणि अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नेतृत्वाखाली गुटका व मावा, सार्वजनिक भागात थुंकणारे व लघुशंका करणार्या नागरिकांवर पायबंद घालणे तसेच प्लस्टिक बंदी इत्यादी मोहीम हाती घेण्यात आली आहे. दरम्यान आज तिसऱ्या दिवशी महापालिकेच्या आरोग्य निरीक्षकांच्या विविध पथकांनी सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांवर कारवाईची मोहीम हाती घेतली. महापालिकेच्या विविध आठ झोन अंतर्गत मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे यांच्यासह ४९ आरोग्य निरीक्षकांनी ही कारवाई केली. सोलापूर शहरातील फॉरेस्ट, बुधवार पेठ, घरकुल, दहिटणे, शेळगी, गांधीनगर, जुना घरकुल, मुळेगाव रोड, भवानी पेठ, एम आयडीसी, नीलम नगर, जुना कुंभारीनाका, आसरा चौक, जुळे सोलापूर, विजापूर रोड, आयटीआय जवळ, सेटलमेंट परिसर, डॉ. आंबेडकर चौक , दत्तनगर, मौलाली चौक, सात रस्ता आदी परिसरात विविध सार्वजनिक ठिकाणी थुंकल्याबाबत ४४ व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करून ६ हजार ४०० रुपये दंड वसूल करण्यात आला. व्यक्तींबरोबरच पान टपऱ्यावाल्यांवरही कारवाई करण्यात आली. दरम्यान, ही कारवाई होत असल्याने शहरातील पान टपरीवाल्यांकडून परिसर स्वच्छता करण्यात येत असल्याचे दिसून आले. या बेधडक कारवाईमुळे पान टपरीवाल्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

#### अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांची ऑन द स्पॉट उपस्थिती

घनकचरा व्यवस्थापन विभागाअंतर्गत सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या विरोधात, पानपट्टी परिसर तसेच प्लास्टिक विरोधी कारवाई सुरू आहे. आज अतिरिक्त आयुक्त रवी पवार हे कारवाई वेळी ऑन द स्पॉट उपस्थित होते. भारतरत्न डॉ. आंबेडकर चौक, मेकॅनिक चौक, एसटी स्टँड परिसरातील कारवाईवेळी अतिरिक्त आयुक्त पवार यांनी उपस्थित राहून आवश्यक त्या सूचना दिल्या.

#### अन्यथा दंडात्मक कारवाई : अतिरिक्त आयुक्त

बंदी असलेले प्लास्टिक वापरू नये. विक्री करू नये. पान टपऱ्यांमधून गुटखा व मावा हा प्लास्टिकच्या पाऊचमधून विकला जातो. अशा पान टपरी धारकांवरही कारवाई करण्यात येणार आहे. पान टपरी परिसर आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. व्यापारी, नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बेटी बचाओ व बेटी पढावो जनजागृतीसाठी बाईक रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
बेटी बचाओ व बेटी पढाओ उपक्रमानिमित्त शहर पोलिस आयुक्तालयाकडून बाईक रॅली काढण्यात आली. यामध्ये रॅली मधील सर्व महिलांनी हेल्मेट परिधान केले होते. या रॅलीचे उद्‌घाटन पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. यावेळी पोलिस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, उपायुक्त अजित बोऱ्हाडे, सहा पोलिस आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक धनाजी शिंगाडे आदी उपस्थित होते.

बेटी बचाओ, बेटी पढाओ उपक्रमास दहा वर्षे पूर्ण झालेत. याबद्दल पोलिस आयुक्तालय, भरोसा सेल,महिला सुरक्षा विशेष कक्षा तर्फे महिला अधिकारी व कर्मचारी यांची बाइक रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये प्रबोधनपर घोषणा देत वाहतुक सुरक्षेसंदर्भातही जागृती केली. ही रॅली पोलिस आयुक्तालयातून सुरुवात झाली,गांधी नगर,सात रस्ता, जुना एम्प्लॉयमेंट चौक,डफरीन चौक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सरस्वती चौक, नवी वेस पोलिस चौकी येथून परत अण्णाभाऊ साठे चौक, महात्मा गांधी पुतळा, स्टेशन रोड मार्गे सात रस्ता व परत पोलिस आयुक्तालयात समारोप करण्यात आला. या रॅलीमध्ये ५७ महिला कर्मचारी, ३ महिला पोलिस अधिकारी यांचा समावेश होता.

### संक्षिप्त वृत्त...

#### डॉ. पाटील यांच्या कादंबरी, कवितासंग्रहाचे प्रकाशन

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
मोहोळ येथील डॉ. स्मिता पाटील यांच्या 'मातीला पंख फुटताना' या कादंबरीचा व 'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' या कवितासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन सोहळा शनिवार दि. ८ फेब्रुवारी रोजी दुपारी ४.३० वाजता सोलापुरातील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात होणार असल्याची माहिती कवी मारुती कटकधोंड यांनी पत्रकार परिषदेत दिली. हा प्रकाशन सोहळा साहित्य अकादमी पुरस्कार विजेते तथा ज्येष्ठ बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड आणि कोल्हापूरचे बालसाहित्यकार लेखक डॉ.श्रीकांत पाटील यांच्या हस्ते पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनोरमा साहित्य परिवाराचे प्रमुख श्रीकांत मोरे हे राहणार असून याप्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस डॉ.प्रमोद पाटील उपस्थित होते.

#### चिरागअली ट्रस्ट येथून ७० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
शहरातील चिरागअली ट्रस्ट येथून चोरट्याने ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत ताहिद अकलाख रंगरेज (वय २४, रा. शनिवार पेठ, भवानी पेठ मंदीराजवळ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ जानेवारी रोजी सकाळी ताहिद रंगरेज यांनी त्याची एमएच १३ ईआर १६३७ क्रमांकाची दुचाकी ही चिराग अली ट्रस्ट येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## दर्शन रांग पत्राशेडमध्ये वारकऱ्यांसाठी अन्नछत्र







#### भक्त निवासामध्ये मुक्कामाची सोय

महिला भाविकांच्या सोयीसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष, चेंजिंग रूम तसेच श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी लाडूप्रसाद व त्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच वेदांता, व्हिडिओकॉन व श्री विठ्ठल-रूक्मिणी या तीन भक्तनिवासामधील ३६१ रूममध्ये सुमारे एक हजार ६०० भाविकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

### गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

### सुलभ, जलद दर्शनाला प्राधान्य, दर्शन रांगेत भाविकांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ फेब्रुवारी-**
माघ एकादशी मुख्य सोहळा ८ फेब्रुवारी रोजी असून, यात्रा कालावधी २ ते १२ फेब्रुवारी असा आहे. या यात्रेला सुमारे ४ ते ५ लाख भविक पंढरपूरात येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

माघी यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर ताडपत्री शेड, जादा पत्राशेडची निर्मिती, आपत्कालीन मार्ग, विश्रांती कक्ष, दर्शन रांगेत बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर, चहा - खिचडी आदी सुविधा उपलब्ध राहणार आहेत. यात्रेनिमित्त भाविकांची होणारी गर्दी विचारात घेता, त्यांना सुलभ व जलद दर्शनासाठी प्राधान्य देण्यात येणार असून, त्यासाठी पुजांची संख्या कमी करून स.६.०० ते रा.१२.०० पर्यंत दर्शन उपलब्ध राहणार आहे. दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालविण्यासाठी अनुभवी सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या परंपरांचे कटाक्षपणे पालन करण्यात येणार असून, त्याबाबतचे आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये ह.भ.प. वासकर महाराज यांच्या दिंडीची नवमीला श्री.विठ्ठल सभामंडप येथे आरती व अभंग, ह.भ.प.आजरेकर महाराज पंढरपूर यांचा द्वादशीला नैवेद्य, त्रयोदशीला ह.भ.प.औसेकर महाराज यांच्या चक्रीभजनाची परंपरा असून, एकादशीला पहाटे श्रींची नित्यपूजा मंदिर समितीचे सदस्य महोदयांच्या शुभहस्ते सपत्नीक संपन्न होत आहे. याशिवाय, सोलापूर महानगरपालिका यांचेकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यांसह, सिझफायर यंत्रणा, अत्याधुनिक शंभर सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, चप्पल स्टँड, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बँग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी आदी व्यवस्था करण्यात आली आहे.

भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पत्राशेड येथे तालुका आरोग्य विभागाचा वैद्यकीय कक्ष, उपजिल्हा रूग्णालया मार्फत दर्शनमंडप येथे आयसीयू तसेच माळवदावर वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई यांच्याकडून मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध राहणार आहे. मंदिर परिसरात वैद्यकीय पथकासह दोन अद्यावत रूग्णवाहिका ठेवण्यात आल्या आहेत. तसेच मयत भाविकांचे त्याच्या मुळगावी शव पोहोच करण्यासाठी मोफत शववाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्वच्छतेसाठी विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले असून, मंदिर, दर्शनमंडप, तुकाराम भवन येथील स्वच्छता मंदिर कर्मचा-यांमार्फत व नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा इ. ठिकाणची स्वच्छता आऊटसोर्सिंग पध्दतीने करण्यात येत आहेत. या कामी स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात येत आहे.

#### ८०० कर्मचारी, स्वयंसेवकांचा ताफा

माघी यात्रा निर्विघ्नपणे-सुरळीत पार पाडण्यासाठी व वारकरी भाविकांना केंद्रबिंदू मानून त्यांना पुरेसा प्रमाणात सोईसुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य आ. रामचंद्र कदम, शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख-जळगांवकर, अ‍ॅड. माधवी निगडे, हभप प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, हभप शिवाजीराव मोरे परिश्रम घेत असून सुमारे एक हजार ८०० कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी दिली.

#### अन्नदान अन् देणगीची व्यवस्था

श्रीसंत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये दु.१२.०० ते २.०० व रा.७.०० ते ९.०० या वेळेत अन्नदान सुरू राहणार असून, दर्शनरांगेत नवमीपासून चहा-शाबुदाणा, तांदळाची खिचडी तसेच पत्राशेड येथे दशमी, एकादशी व द्वादशीला अन्नछत्र सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंदिर समितीचे संकेतस्थळ (www.vitthalrukminimandir.org), मोबाईल अँप (श्री विठ्ठल रूक्मिणी देवस्थान, पंढरपूर) वरून श्रीचे लाईव्ह दर्शन उपलब्ध असून पत्राशेड दर्शन रांग व मंदिर परिसरात एलईडी स्क्रिन बसविण्यात येत आहे. याशिवाय, देणगी घेण्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती, ऑनलाईन देणगीसाठी QR CODE, RTGS, सोने-चांदी वस्तू दान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष असणार आहे.

## वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज

### उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. भोसले यांची माहिती

### १ हजार ४८६ पोलीस अधिकारी, कर्मचारी

### ६ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र

### २६० सीसीटीव्ही कॅमेरे, 13 वॉच टॉवर



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ फेब्रुवारी-**
माघ शुद्ध जया एकादशी सोहळा ८ फेब्रुवारी रोजी असून, माघ यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी दिली.

माघ वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतूक नियत्रंणासाठी १ हजार ४८६ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी नदीपात्र, पासष्ट एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी १३ वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापना करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच शहरात व मंदिर, मंदिर परिसर, दर्शन रांग आधी ठिकाणी २६० सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातूनदेखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी ६ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

#### असा आहे पोलीस बंदोबस्त

यामध्ये २ पोलीस उपअधिक्षक, ७१ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, ८०० पोलीस कर्मचारी व ६०० होमगार्ड तसेच दोन बीडीएस पथके नियुक्त करण्यात आले आहेत.

#### जडवाहतूक शहराबाहेरुन जाणार

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये, भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जडवाहतूक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे. तसेच वाहतूक नियमनासाठी १३ ठिकाणी डायव्हरशन पॉईंट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खासगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १५ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले यांनी केले आहे.

### पैशाच्या कारणावरून वृध्दासह दोघांना मारहाण

**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
पैशाच्या कारणावरून वृध्दासह दोघांना मारहाण करण्यात आली.

कृपा सुधीर एडके (वय ७०, रा. हेजनपूर, उत्तर सदर बझार, लष्कर सोलापूर) आणि संतोष सुधीर एडके (वय ४०, रा. हेजनपूर, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ४ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास पैशाच्या वादातून राहत्या घरी अम ोल काशिद, विकि काशीद यांनी कृपा एडके व संतोष एडके या दोघांना बादलीने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये दोघेही जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## पंढरीत पाच आपत्ती व्यवस्थापन कक्ष

### प्रांताधिकारी सचिन इथापे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.५ फेब्रुवारी-**
माघ यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने आवश्यकती तयारी केली असून, यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी चार आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली असून, हे कक्ष २४ तास कार्यरत राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली. माघ वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय होऊ नये यासाठी ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, नगरपालिका, पत्राशेड, , विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, तसेच मुख्य आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे कार्यान्वित करण्यात आले आहे. भाविकांना काही अडचणी आल्यास आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपर्क साधावा असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

## दुचाकीच्या धडकेत एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**
दुचाकीने पाठीमागून धडक दिल्याने पुढील दुचाकीस्वार जखमी झाला. दिशेन हनमंत म काशे (वय २७, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) आणि बाळू नारायण भाकरे (वय ७०, रा. मार्डी, ता. उत्तर सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी दहाच्या सुमारास दिशेन मकाशे हा कोंडी ते सोलापूर दुचाकीवरून येत होता. त्यावेळी बाळू भाकरे हा दुचाकीवरून मडकी वस्ती ते मार्डी असे जात होता. त्यावेळी मडकी वस्तीच्या थोडे पुढे दिशेन मकाशे याने त्याची दुचाकी निष्काळजीपणे चालवून बाळू भाकरे यांच्या दुचाकीला पाठीमागून धडक दिली. त्यामुळे दोघांनाही उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०२१

**जैशी ते शुकाचेनि आंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरे ।**
**तरी तेणें उडावें परि न पुरे । मनशंका ॥**

जो विषयात अडकत नाही, इंद्रियाधीन होत नाही. कर्म करुनही कर्मात आसक्ती ठेवत नाही. कर्मात मीपणाचा दुर्गंध निर्माण होऊ देत नाही. तो देहधारी असूनही व्यवहार दृष्टीने जागा असतो. असा व्यक्ति परमार्थत: वृत्तीशुन्य अवस्थेत पोहोचल्यामुळे आत्मभावात दंग असतो, तोच उत्कृष्ट योगरुढ असतो, असे भगवंतानी अर्जुनाला सांगीतले. भगवंताच्या या सांगण्याप्मागचा हेतु असा आहे की, अर्जुनाने मोहग्रस्त होऊन, या देहाला मी समजून, त्याचबरोबर हे युध्दकर्म माझ्या हातून घडणार असे समजून अहंकारात अडकू नये. तर हे युध्द निष्काम कर्म समजून पार पाडावे असे त्यांना वाटते. योगी सोडले तर बाकी सर्व शरीराच्या सौंदर्याला भुलुन देहाच्या ठिकाणी आत्मबुध्दी ठेवतात, तसेच स्वत:भोवती मी पणाचे कोश करुन घेतात आणि त्या कोशात किडयाप्रमाणे अडकुन आपणच आपला शत्रू बनतात. मी पणामुळे माणूस मीच्या जाळयात स्वत:ला स्वत:होऊनच अडकुन घेत असतो. बाहेर निघावे म्हटले तरी त्याला त्याचा मीपणा बाहेर निघु देत नाही. स्वत:च्या कल्पनेनेच माणूस मीच्या घरटयात कसा अडकतो हे सांगतांना भगवंत म्हणाले,



**जैशी ते शुकाचेनि आंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरे ।**
**तरी तेणें उडावें परि न पुरे । मनशंका ॥**

अर्थात, पारधी पोपटाला पकडण्यासाठी एका नळीत दोरी ओवून त्याची दोन्ही टोके बाजुला बांधतो. पोपट त्या नळीवर बसला की, त्याच्या स्वत:च्या ओझ्याने ती पोकळ नळी गरकन एका बाजुला फिरते. अशा वेळी पोपटाने पटकन उडुन जायला हवे. परंतु पोपट उडत नाही. त्याला वाटते की आपण नळी सोडली तर खाली पडतो आणि आपण मरु शकतो. अशी विचित्र शंका मनात आणून तो त्या नळीला घट्ट धरुन बसतो. तो स्वत:ला नळीला बांधून ठेवतो आणि त्याच्या नळीला घट्ट धरण्याने, म्हणजेच उडून न जाण्याने तो पारध्याच्या हाती येतो. माणूसही कारण नसतांना खोटया मीपणात स्वत:ला या संसारात अडकुन घेतो आणि आपले सर्वस्व दु:ख, स्वार्थ, मोहाच्या अधिन करतो. म्हणून अर्जुना तू मी देह आहे असा भ्रम वाढवू नकोस. कारण यामुळे तुच तुझा शत्रू होशील. मी आत्मा आहे. असे तु वागायला हवेस. या देहाला मी मानलास तर तुला तुझे शत्रू सोडणार नाहीत. मीपणाचा अहंकार माणसाला पावला-पावलाला जाळत असतो. सुख,समाधान हे मी च्या जवळ येतच नसतात. मी ज्याच्याजवळ आहे, त्याच्याजवळ परमात्मा, आत्मसुख येण्याचे कारणच नाही. संत कबीर म्हणतात, जब मै था तब हरी नही, अब हरी है मै नही. अर्थात, जोपर्यन्त आपण या देहाला मी-मी म्हणतो, तो पर्यन्त परमात्मा, आत्मसुख आपल्या जवळ येत नाही. आणि जेव्हा मी निघून जातो तेव्हा परमात्मा, आत्मसुख प्राप्त होत असते. मी हा आपणच निर्माण केलेला असतो. त्यामुळे त्याला आपल्यातुन घालवणे आपणाला शक्य असते. एखादी गोष्ट मी केली म्हणण्यापेक्षा आम्ही केली म्हटली तरी बराच फरक पडतो. तेव्हा आपल्यातील मी काढुन टाकला तर किती फरक पडेल याचाही विचार आपण करायला हवा. ज्ञानदेवांनी मी गीता मराठीतून स्वबळावर सांगत असल्याचे कुठेच म्हटले नाही. या वरुन आपणही हे मी केले, ते मी केले असे म्हणू नये. आपण मीला काढुन तरी पाहू या की आपणाला नेमके कोणते व किती सुख मिळते ते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ६ फेब्रुवारी २०२५ | दासबोध जयंती, मध्वनवमी, |
| विक्रम संवत् २०८०-८१ | धनिष्ठार्क : स. ७.४९ |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. नवमी (२२.५३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - कृत्तिका (१९.२९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ब्रह्मा (१८.४१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (११.४२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील.

**वृषभ :** जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्तेबाबत अडचण येण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल. रोजगारात प्रगती राहील. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल.

**कर्क :** केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

**सिंह :** महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या :** आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

**तुळ :** जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे.

**वृश्चिक :** आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

**धनु :** आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

**मकर :** मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**कुंभ :** चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मीन :** उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# केवळ त्याच केंद्रावरील केंद्र संचालकांची खांदेपालट !

## दहावी, बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी बोर्डाचा सुधारित निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**

राज्यातील दहावी व बारावी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात यासाठी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक महामंडळाच्या वतीने केंद्र संचालकांच्या नियुक्ती बदलण्याचे आदेश काढण्यात आले होते. त्यानुसार राज्यातील व सोलापूर जिल्ह्यातील संवेदनशील परीक्षा केंद्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी, तसेच कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी केवळ त्याच परीक्षा केंद्रावरील केंद्र संचालकांची खांदेपालट होणार आहे. वास्तविक पाहता, सदरचा नवा निर्णय सर्वच परीक्षा केंद्रांसाठी लागू करण्यात आला होता. परंतु शिक्षक संघटनांच्या वाढत्या विरोधामुळे मंडळाला आपला निर्णय मागे घ्यावे लागला आहे. या नव्या निर्णयानुसार केवळ संवेदनशील परीक्षा केंद्रावरीलच केंद्र संचालकांची बदली इतर परीक्षा केंद्रावर होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.


दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात संवेदनशील अशा केंद्रांसाठी हा नवा निर्णय लागू करण्यात आला आहे. जिल्ह्यातील संवेदनशील केंद्रांची माहिती मंडळाकडे सुपूर्द करण्यात आली असून, तेथील केंद्र संचालकांची इतर केंद्रांवर बदली करण्यात येणार आहे. जिल्ह्यात संवेदनशील केंद्रांची माहिती प्राप्त झाल्यानंतर मंडळाद्वारे सदरची नियुक्ती केली जाणार आहे. जिल्ह्यात दहावीचे ४७ तर बारावीचे ३४ परीक्षा केंद्र आहेत. बोर्ड परीक्षेच्या पार्श्वभूमीवर मुख्याध्यापकांची आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांच्या अधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली असून, त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही केली जात असल्याचे माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

### २१ फेब्रुवारीपासून दहावी लेखी परीक्षेला प्रारंभ

दहावी बोर्ड परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर बोर्ड परीक्षेची पूर्व परीक्षा शाळेत संपन्न होत आहे. सोमवार( दि. ३) फेब्रुवारीपासून सदरच्या परीक्षा संपन्न होत आहेत. तोंडी, प्रात्यक्षिक, आणि त्यानंतर लेखी परीक्षेला प्रारंभ झाला असून, विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेचे संदर्भात इत्यंभूत माहिती शिक्षकांद्वारे दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षा वेळी कोणताही ताण तणाव येऊ नये यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे, असे माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोरसंघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक: (४३) भेट

प.पू. डॉ. हेडगेवारजी म्हणजे राष्ट्रसेविका समितीच्या संस्थापिका वंदनीय मावशी केळकर यांना प्रभावित करणारे एक प्रखर व्यक्तिमत्व होते. डॉक्टरांमध्ये मावशींना लोकमान्यांच्या तेजस्वीतेचे दर्शन झाले. संघात जाणाऱ्या आपल्या मुलांमध्ये आलेल्या परिवर्तनाची पारख मावशींनी केली; आणि सामूहिक संस्काराची आवश्यकता महिलांना पण आहे असे त्यांनी डॉक्टरांना भेटून सांगितले. डॉक्टरांची स्पष्ट विचार पद्धती, सरलता, साधेपणा, ध्येयनिष्ठा या गुणांनी मावशी प्रभावित झाल्या होत्या. एका दृढव्रती बंधूच्या सानिध्यात वंदनीय मावशींचा श्रद्धाभाव द्विगुणीत झाला. समर्थ रामदास स्वामी शिवछत्रपती संबंधी म्हणायचे शिवरायाचे कैसे बोलणे, शिवरायाचे कैसे चालणे, शिवरायाचे सलगी देणे, कैसे असे अगदी तसेच वंदनीय मावशींना हे सर्व गुण डॉक्टरांमध्ये दिसले. वंदनीय मावशी येताना दिसताच डॉक्टर स्वतः जिना उतरून खाली येत असत. मावशींच्या कन्येच्या लग्नाला सुद्धा डॉक्टरांची उपस्थिती होती. डॉक्टरांच्या कार्यकर्ता विकासाच्या अनोख्या दृष्टीचा परिचय मावशींना खूप ज्ञान देऊन गेला. सर्व सरसंघचालकांना मावशींनी डॉक्टरांची प्रतिमूर्ती मानले होते. परमपूज्य गुरुजी आणि माननीय बाळासाहेबांच्या प्रतीही त्यांचे जवळीकेचे बंधूभावाचे नाते होते. या दोघांनी व अप्पाजी जोशींनी तसेच गावोगावच्या संघ कार्यकर्त्यांनी मावशींना सन्मानपूर्वक आपुलकीची वागणूक दिली. वंदनीय मावशींना महिलांची शाखा लावण्यासाठी मदत केली. आजही करत आहेत. २५ ऑक्टोबर १९३६रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर समिती कार्याचा शुभारंभ झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने दसरा महोत्सवासाठी वर्धेला एक मोठा मंडप उभारला होता. आज मात्र त्याच मंडपात विशाल स्त्री समुदाय उपस्थित होता. सर्वांच्या समोर वं. मावशींनी संक्षिप्तपणे मनोगत व्यक्त केले. संघाच्या दसरा महोत्सवाचे हे आगळेवेगळे रूप पाहून उपस्थित सारेच समितीच्या वाढीसाठी शुभ आशीर्वाद देते झाले. धन्यवाद

**- क्रमशः**

# कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेतर्फे पुरस्कार जाहीर

### अनघा तांबोळी यांना कायकरत्न तर डॉ. पुष्प द्रविड यांना कल्याणरत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**





कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेतर्फे प्रतिवर्षी दिले जाणारे डॉ.राजेंद्र पडतुरे पुरस्कृत 'मराठी भाषा कायकरत्न' पुरस्कार यंदा नवी मुंबईच्या प्रख्यात लेखिका, कवियत्री अनघा तांबोळी यांना तर मराठी भाषा कल्याणरत्न पुरस्कार बेंगळूरूच्या सुप्रसिद्ध चित्रकार, शिल्पकार, स्थापत्यविषारद डॉ. पुष्प द्रविड यांना देण्यात येणार आहे, अशी माहिती करामसाप अध्यक्ष गुरय्या रे. स्वामी यांनी दिली.

यावेळी कार्यवाह प्रभाकर सलगरे, प्रा. विजयकुमार चौधरी, मिलिंद उमाळकर, प्रमोद शहा, रवींद्र पाटील आळंगा उपस्थित होते. २ मार्च रोजी मराठी भाषा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्या दिवशी प्रा. देवीदास फुलारी लिखित 'रात्र भरात आहे' या काव्यसंग्रहाचे डॉ. संध्या राजन यांचे कन्नड अनुवादित 'इरळू अरळीदे' कन्नड पुस्तक, 'काजव्यांची दिंडी' मराठी पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

उद्घाटन मुख्यमंत्र्यांचे सल्लागार आ. बी. आर. पाटील करणार आहेत. यावेळी मारूतीराव मुळे, डॉ. दिनकर मोरे, डॉ. एन. जी. घनाते, कन्नड साहित्यिक आर. के. हुडगी, डॉ. राजेंद्र पडतुरे, डॉ. व्ही. जी. अंदानी, प्रा. देविदास फुलारी, इसाप प्रकाशनचे दत्ता डांगे, बिची प्रकाशनचे उल्हास रायासम, जिल्हा कसाप अध्यक्ष विजयकुमार पाटील तेगुलतिप्पी उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम आयडीयल फाईन आर्ट कॉलेजच्या गॅलरीत होणार आहे. याच वेळी बहुभाषा कविसंमेलन घेण्यात येणार असून मराठी, कन्नड, उर्दू, हिंदी, तुळू आणि तमिळ कवी सहभागी होणार आहेत.

# शैक्षणिक कलाशिक्षक संघाचे शनिवारपासून पंढरपुरात अधिवेशन

### पालकमंत्री गोरे यांचे हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कला शिक्षक संघाचे दुसरे राज्यस्तरीय अधिवेशन पंढरपूर येथील वै. दिगंबर महाराज वारकरी सांप्रदाय शिक्षण समितीचे भक्त निवास, नवीन बायपास सोलापूर रोड येथे दि. ८ व ९ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संघाचे राज्याध्यक्ष शेरशाह डोंगरी यानी पत्रकार परिषदेत दिली.

या अधिवेशनाचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते होणार आहे. या कार्यक्रमात खा. प्रणितीताई शिंदे, आ. समाधान आवताडे, अभिजीत पाटील, राजाभाऊ खरे, बाबासाहेब देशमुख, किशोरभाऊ दराडे, सत्यजित तांबे, जयंत आसगांवकर, दत्तात्रय सावंत, सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, देवेंद्र कोठे, कलासंचालक संतोष क्षिरसागर, निरीक्षक, चित्र व शिल्प संदिप डोंगरे, परिक्षा नियंत्रक नागेश वाघमोडे, उपकला संचालक विनोद दांडगे, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, शिक्षणाधिकारी कादर शेख आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नवीन शैक्षणिक धोरण या विषयावर ज्ञानेश्वर कानडे यांचे व्याख्यान होणार आहे. तसेच राज्यातील जेष्ठ कलाशिक्षकांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.राज्यातील ३० कलाशिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श कला शिक्षक पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील आदर्श कला शिक्षकांना पुरस्कृत करण्यात येणार आहे.

तसेच व्यक्तिचित्र तैलरंग प्रात्यक्षिक विवेक दहिवाले, पुणे, रमेश पाचपांडे यांचे चारकोल, व्यक्तिचित्र अॅक्रॅलिक दिग्विजय कुंभार, निसर्गचित्र अॅक्रॅलिक स्वप्निल जगताप आणि निसर्गचित्र नितीन खिलारे यांची प्रात्यक्षिके होतील. त्याच मान्यवर कलाशिक्षकांचे फलक लेखन प्रात्यक्षिक होणार आहे. तसेच विविध मान्यवरांचे कलेविषयी मार्गदर्शन होणार आहे. या अधिवेशनाला जास्तीत जास्त कलाशिक्षकांनी तसेच निवृत्त कलाशिक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष माजी आ दत्तात्रय सावंत यांनी केले आहे. यावेळी सुधीर विसापुरे, शशिकांत सदाफुले, नरेंद्र नालवार, शैलेश स्वामी उपस्थित होते.

# समाधान आश्रम ध्यान मंदिरच्या वर्धापन दिनानिमित्त सामुदायिक विवाह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ फेब्रुवारी-**

परमपूज्य श्री.म.नि.प्र.मौन तपस्वी श्वेतशांत श्रीश्रीश्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात मागील वर्षी तयार झालेल्या तळेहिप्परगा येथील समाधान आश्रमातील ध्यानमंदिराला एक वर्ष पूर्ण झाले, त्यानिमित्त वीरशैव लिंगायत समाजातील वधू-वरांचा सामुदायिक विवाहाचे आयोजन रविवार दि. १५ फेब्रुवारी रोजी करण्यात येणार आहे.

दि. १५ रोजी रोजीपासून विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती गुरूदेव सेवा संस्थेचे डॉ. दामा आणि सिध्देश्वर किणगी यांनी दिली. मौनतपस्वी श्री जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी यांच्या सानिध्यात दि. १५ आणि १६ फेब्रुवारी या दोन दिवसात विविध उपक्रम होणार आहेत त्यामध्ये दि.१५ रोजी सकाळी इष्टलिंग धारण कार्यक्रम, आरोग्य शिबीर, महास्वामीजींचे तुलाभार, पुस्तक प्रकाशन, सत्कार समारंभ आणि प्रवचन असा दिवसभर कार्यक्रम आहे त्याचबरोबर दि. १६ फेब्रुवारी रोजी वीरशैव लिंगायत सामुदायिक विवाहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या विवाहासाठी इच्छुक वधू-वरांनी दि. ६ फेब्रुवारी पर्यंत आपली नावे योग्य कागदपत्रांसह नोंद करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमासाठी तोग्गीहळ्ळी पंच मठाचे पूज्य श्री ष.ब्र.संगमेश्वर शिवाचार्य महास्वामी, श्री हिरेमठ जडे येथील पूज्य श्री ष ब्र.धनबसव अमरेश्वर शिवाचार्य महास्वामी यांचे आर्शिवचन लाभणार आहे. कार्यक्रमासाठी डॉ. दामा दांम्पत्य, राजू शेट्टी, सिध्दू किणगी, मल्लू बिराजदार, महेश पाटील, संगतबसव स्वामी,दिपक टक्कळकी, तेल्लूर बंधू, अक्कलकोटचे बसु माशाळे, दत्तु कुमार साखरे,कांतु धनशेट्टी आदी परिश्रम घेत आहेत.

# ब्रह्म प्रतिष्ठानच्या वधू-वर परिचय पुस्तिकेचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

येथील ब्रह्म प्रतिष्ठान या संस्थेतर्फे काढण्यात आलेल्या वधू-वर परिचय पुस्तिकेचे प्रकाशन शिवशाहीमधील वरिष्ठ निवृत्त अधिकारी विलास कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक सुहास देशपांडे हे होते. यावेळी पुरोहित सप्रे गुरुजी, संस्थेच्या अध्यक्षा सुजाता देशपांडे व्यासपीठावर उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना विलास कुलकर्णी यांनी मुला-मुलींच्या विवाहातील अडचणीचा ऊहापोह करीत ब्रह्म प्रतिष्ठानच्या कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुहास देशपांडे यांनी विवाह जमण्यासाठी तडजोड ही महत्त्वाची असल्याचे सांगत मुलाकडच्या आणि मुलीकडच्यांनीही एक एक पाऊल मागे येऊन विवाह जमविणे महत्त्वाचे आहे. पुस्तक हे एक संपर्काचे साधन आहे त्याचा सर्वांनी लाभ घेऊन समाजातील विवाह इच्छुक युवक युवतींचे विवाह घडून यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

संस्थेचे कार्यकारणी सदस्य दत्ता आराध्ये यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी पांडुरंग देशपांडे, सुनील देशपांडे, भालचंद्र कुलकर्णी, भरत काटीकर, वामन कुलकर्णी, संजय पैठणकर श्रीकांत कुलकर्णी, पी.बी. कुलकर्णी आदींसह वधू-वरांचे पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन दत्ता आराध्ये यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर देगावकर यांनी मानले.

### पुरोहितांचा आणि देणगीदारांचा सन्मान

ब्रह्म प्रतिष्ठानने या कार्यक्रमात ब्रह्म प्रतिष्ठानच्या विविध कार्यक्रमात पौरोहित्य करणारे सप्रे गुरुजी यांचा सन्मान केला. तसेच यावेळी संस्थेला देणगी देणारे पी.व्ही. कुलकर्णी आणि विलास कुलकर्णी तसेच द्वारकाधीश मंदिर चे व्यवस्थापक दत्तात्रय पाठक यांचाही सत्कार केला.

# जीबीएस आजाराचा जिल्ह्यात आणखी एक रुग्ण



### 'त्या' पाच वर्षांच्या मुलावर उपचार सुरु

### आशाताई, आरोग्य कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून शोध मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्ह्यात 'जीबीएस' या नव्या आजाराचा आणखीन एक रुग्ण आढळून आला आहे. पंढरपूर तालुक्यातील त्या पाच वर्षीय मुलावर उपचार सुरु आहेत. आजपर्यंत जीबीएस आजाराचे जिल्ह्यात पाच संशयित रुग्ण आढळून आले आहेत. त्यापैकी दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथील एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, माढा, दक्षिण सोलापूर, पंढरपूर तालुक्यात आणि धाराशिव जिल्ह्यातील अणदूर येथे प्रत्येक एक संशयित रुग्ण आहे. माढा तालुक्यातील बेंबळे, बार्शी तालुक्यातील वाणेवाडी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुरघोट आणि तुळजापूर (जि. धाराशिव) तालुक्यातील अणदूर येथील एक असे एकूण चार संशयित रुग्णांवर सोलापुरात तर माळशिरस तालुक्यातील अकलूज येथील एका रुग्णालयात एका रुग्णावर उपचार सुरु आहेत. 'जीबीएस'चे संशयित रुग्ण शोधण्याकामी आशाताई, आरोग्य कर्मचारी यांच्या माध्यमातून मोहीम हाती घेण्यात आले आहे.

### महात्मा फुले योजनेंतर्गत उपचार

या आजारावरील उपचार महागडे असल्याने शासनाच्या आदेशानुसार महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून या रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. उपचार सुरू असणाऱ्या रुग्णाची प्रकृती सुधारत आहे. सर्वेक्षणाद्वारे संशयित रुग्णांचा शोध घेण्यात येत आहे.

**-डॉ. संतोष नवले, जिल्हा आरोग्याधिकारी जिल्हा परिषद सोलापूर.**

### जनआरोग्य योजनेत १३ रुग्णालये

सोलापूर शहर, जिल्ह्यातील १३ रुग्णालयांचा महात्मा फुले जन आरोग्य योजनेत समावेश आहे. जिल्ह्यातील जीबीएस आजाराच्या चार संशयित रुग्णांवर याच योजनेतून उपचार सुरु आहेत. उपचारावरील पाच लाख रुपयांपर्यंतचा खर्च शासनामार्फत करण्यात येत आहे.

**- डॉ. दीपक वाघमारे, जिल्हा समन्वयक महात्मा फुले जनआरोग्य योजना**

# लिंगायत समाजातील वधू-वरांचा रविवारी परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ फेब्रुवारी-**

महात्मा बसवेश्वर वधू-वर सूचक केंद्र कुपवाड सांगली व जागतिक लिंगायत महासभा सोलापूर आणि राष्ट्रीय लिंगायत महामंच भारत यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता राज्यस्तरीय लिंगायत वधु-वर पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब शेगावे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मातोश्री लि. सिद्धवाबाई हत्तुरे सांस्कृतीक भवन, हत्तुरे वस्ती येथे हा मेळावा होणार आहे. लिंगायत धर्मातील सर्व पोट जातीतील वधू-वर पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे उद्घाटन परमपूज्य बसवलिंग महास्वामीजी शिवयोगी मठ, सोलापूर, परमपूज्य स्वामीनाथ महास्वामीजी किरीटीश्वर मठ यांची मंगल उपस्थिती राहणार आहे. माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली मेळाव्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी प्रा. शिवानंद गोगाव, जागतिक लिंगायत महासभेचे महिला जिल्हाध्यक्ष राजश्री थळंगे, पत्रकार रेवनसिद्ध जवळेकर, अखिल भारतीय माळी संघ अध्यक्ष सकलेश बाभुळगावकर, पत्रकार, चन्नवीर भद्रेश्वरमठ, नामदेव फुलारी, लिंगायत महासंघाचे सचिन शिवशक्ती आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेत शंकरराव लिंगे, नामदेव फुलारी आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# माजी आ. राजेंद्र राऊतांची बार्शीत विक्रमी ५१ हजार सदस्य नोंदणी

## माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे : राऊत यांच्या पक्ष कार्याची भाजपा दखल घेईल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ फेब्रुवारी-**

राजकारणात हार-जीत ही होतच असते. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यासाखा कार्यकर्ता एका पराभवाने खचून जाणारा नाही. विधानसभेला पराभूत झाल्यानंतर सुद्धा राऊत यांनी बार्शी मतदारसंघातून भाजप सदस्य नोंदणी मोहिमेत ५१ हजार सभासद केले आहेत, ही छोटी गोष्ट नाही. राऊतांना राजकारणात चांगलं भविष्य आहे आणि भारतीय जनता पक्ष त्यांच्या या कामाची जरुर दखल घेईल, असे विधान माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी बार्शीत केले.



भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते रावसाहेब दानवे हे बार्शीत माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्याकडे आले होते. त्यांनी राऊत निवास व भगवंत मंदिर तसेच जगदाळे मामा हॉस्पिटलला भेट दिली. माध्यमाशी बोलताना दानवे यांनी राऊत यांच्याबाबत हे विधान केले आहे. राऊत यांनी विधानसभेला शिवसेनेत प्रवेश करुन बार्शीतून निवडणूक लढवली होती. मात्र, त्यात त्यांना अपयश आले होते, त्यामुळे ते पुन्हा भाजपमध्ये प्रवेश करणार असे सांगितले जात आहे. राजेंद्र राऊत यांना विधान परिषदेवर घेण्याची चर्चा रंगली आहे. त्या पार्श्वभूमीवर राऊत हे भाजपमध्ये जाणार का, अशी चर्चा रंगली आहे. कारण त्यांनी भाजप सदस्य नोंदणी मोहीम मोठ्या ताकदीने राबवली आहे. पक्षात नसूनही त्यांनी तब्बल ५१ हजार सभासद केले आहेत, त्यामुळे राऊतांचा भाजप प्रवेश निश्चित मानला जात आहे.

रावसाहेब दानवे म्हणाले, आम्ही अनेक निवडणुका हरलो आणि अनेक निवडणुका जिंकलो. फक्त नेत्यामधील कार्यकर्ता कधी मेला नाही पाहिजे. राजेंद्र राऊत यांच्यासाखा कार्यकर्ता एका पराभवाने खचून जाणारा नाही. विधानसभेला पराभूत झाल्यानंतरसुद्धा राजेंद्र राऊत यांनी बार्शी मतदारसंघातून भाजप सदस्य नोंदणी मोहिमेत ५१ हजार सभासद केले आहेत. ही छोटी गोष्ट नाही. ही सभासद नोंदणी हीच राजेंद्र राऊत यांची सक्रियता दर्शवते. भारतीय जनता पक्ष चांगल्या कार्यकर्त्यांकडे लक्ष ठेवून असतो, जिथे कुठे संधी मिळेल, त्या ठिकाणी त्या कार्यकर्त्याला संधी दिली जाते.

माजी आ. राजेंद्र राऊत यांना मी स्वतः चांगला ओळखतो. मुद्दाम मी वाट वाकडी करुन त्यांना भेटण्यासाठी बार्शीत आलो आहे. त्यांचा राजकीय संच बघितला. त्यांच्या राजकीय भविष्यावर कुठल्याही प्रकारचे प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याची गरज नाही. राऊतांना राजकारणात भविष्य चांगले आहे आणि भारतीय जनता पक्ष त्यांची जरुर दखल घेईल, असे मला वाटते, असेही दानवे यांनी स्पष्ट केले. दानवे म्हणाले, आणखी दोन ते चार महिने जाऊ द्या. ज्यांना बार्शीच्या जनतेने निवडून दिले आहे, त्यांनी एक वर्षात किती निधी आणला आणि राजेंद्र राऊत यांनी किती निधी आणला होता, याची तुलना करणारी आपली जनता आहे. वर्षभरानंतर लोकांच्या लक्षात येईल की आपली केवढी मोठी चूक झाली आहे.

### राऊतांचा मी समर्थक

बार्शीच्या विकासासाठी आपल्या दोन्ही सरकारकडून काही आणायचं असेल तर राजेंद्र राऊत यांच्यासारखा कार्यकर्ता आपल्याला हवा आहे. भाजपला त्यांना पुढे करावेच लागणार आहे. मी स्वतः त्यांचा समर्थक आहे, तुम्ही चिंता करु नका, असे दानवे म्हणाले.

# अणदूरमध्ये ९०० विद्यार्थ्यांचा कलाविष्कार

## पालकांसह श्रोत्यांनी दिली दाद; श्री श्री गुरुकुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ५ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुल या शाळेचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. यात ९०० विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केला.

सर्वधर्मसमभाव, राष्ट्रीय एकात्मता, महाराष्ट्राची लोकधारा या थीमवर आधारित हे स्नेहसंमेलन होते. उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजुरे यांनी केले. अध्यक्षस्थानी संस्थेचे मार्गदर्शक डॉ. राजकुमार कानडे होते. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, धनराज मुळे, माणिक आलुरे, बाळकृष्ण घोडके-पाटील, बालाजी घुगे, सिध्दाराम धमुरे, सिद्राम शेटे, प्रशांत मिटकर, अविनाश मोकशे, डॉ. हरिदास मुंढे, करबसप्पा धमुरे, सुधीर पुदाले, डॉ. रुपाली कानडे, वैशाली मुळे, वैष्णवी आलुरे, डॉ. हर्षदा चव्हाण, स्नेहा मुळे, अनिता घुगरे, गोदावरी गुड्डु, जयश्री व्हटकर, रुपाली सुत्रावे, बाबई चव्हाण, श्वेता मुळे, ज्योती गायकवाड उपस्थित होते.



### हृदयस्पर्शी झाशीची राणी नाटिका

विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, लोकगीते, कोळीगीते, मराठी पारंपरिक गीते, भारुड, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील नाटिका, भांगडा, गोंधळी गीते, खंडोबा जागरण गोंधळ, नकला, बालमजुरी नाटिका, शेतकरी गीत, मोबाईलचा अतिवापर नाटिका सादर करून उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. नर्सरी ते दहावीच्या ९०० विद्यार्थ्यांनी या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदवला. तर झाशीची राणी ही लघु नाटिका मनाला भावून गेली.

सूत्रसंचालन गुरुकुलच्या विद्यार्थिनी सई मिटकर, अरणा कानडे, ग्रिष्मा कदम, प्रतीक्षा मोजगे, भक्ती हत्ते, वैष्णवी हराळकर, ऋतुजा सूत्रावे, लक्ष्मी डोंबाळे, साक्षी हांडगे, भक्ती भाले, आराध्या गोष्टी, प्रतीक्षा पाटील, वैष्णवी पवार, श्रावणी हंगरगे, प्रनौती जत्ते, शुभांगी ढाले, सिद्धी सुत्रावे, संचिता बिराजदार, श्रीनिवास नवगिरे, आशुतोष चव्हाण यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक लक्ष्मण नरे व शिवराज भुजबळ यांनी तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख अबोली वघामारे व अनुजा कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वर बंडगर, विशाल महाबोले, अर्जुन माशाळकर, शिवाजी माने, नागेश मुळे, अर्जुन सोनटक्के, महेश मंगे, जाकीर शेख, संतोष व्हटकर, किरण कांबळे, देवेंद्र पांचाळ यांनी परिश्रम घेतले. यावेळी पत्रकार राजेंद्र स्वामी, श्रीकांत अणदूरकर, संजीव आलुरे, शिवशंकर तिरगुळे, दयानंद काळुंके, सचिन तोग्गी, प्रसन्न कंदले मल्लिनाथ नरे, संजय मोकाशे, प्रवीण घोडके, दयानंद मुडके, डॉ. शशी कानडे, सुवर्णा कानडे, शुभांगी चव्हाण उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये उद्यापासून पर्यटन परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ५ फेब्रुवारी**

महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद, पुणे आणि सोलापूर शिक्षक भूगोल संघ, मराठवाडा भूगोल संघ लातूर यांच्या सहकार्याने शुक्रवारी ७ रोजी सकाळी दहा वाजता सी. बी. खेडगी इंटरनॅशनल स्कूलमध्ये दोन दिवशीय पर्यटन परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या परिषदेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोट यांनी दिली.

या पर्यटन परिषदेमध्ये देशभरातून ११९ संशोधन पेपर प्राप्त झाले असून त्यामध्ये प्राध्यापक, पीएच. डी. संशोधक, एमएचे विद्यार्थी आपले संशोधन सादर करणार आहेत. यातून प्रत्येक विभागातून तीन बेस्ट पेपरची निवड करण्यात येणार आहे. या राष्ट्रीय परिषदेत देशभरातून, शिक्षक, संशोधक, विद्यार्थी, मार्गदर्शक उपस्थित राहणार आहेत. डॉ. वनीश्री, डॉ. सुरेश फुले लातूर, डॉ. ज्योतीराम मोरे वाघोली, डॉ. गाताडे सातारा, डॉ. हंगरगीं बागलकोट, डॉ. बी. श्रीनागेश हैद्राबाद मार्गदर्शन लाभणार आहे. महाराष्ट्र भूगोल परिषद चेअरमन डॉ. प्रवीण सप्तर्षी, महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब गोपने, मराठवाडा भूगोल संघ लातूरचे अध्यक्ष डॉ. सुरेश फुले, सचिव डॉ. नरेंद्र माळी, सोलापूर भूगोल शिक्षक संघाचे सचिव डॉ. हरिश्चन्द्र तिपे, बागलकोटचे भूगोल विभाग प्रमुख डॉ. सिद्धाराम हंगर्गी उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी राहणार आहेत.



# बिहारी कुटुंबाच्या मदतीला धावले सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठान

### २६ हजार ४६५ रुपयांची केली आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा । दीपक भाकरे**
**सांगोला, दि. ५ फेब्रुवारी-**

मूळचे बिहार येथील आदित्य पासवान व त्यांचे कुटुंब गेल्या १५ वर्षाखाली उदरनिर्वाहासाठी सांगोला शहरात आले आहे. आदित्य पासवान हे पेंटरचे काम करत होते. त्यांना रविवारी छातीत दुखण्याचा त्रास झाला व हृदयविकाराच्या धक्क्याने सोलापूर येथे उपचारादरम्यान निधन झाले. पासवान यांच्या पार्थिवावर रविवारी सांगोला येथील वैकुंठ स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

घरातील कर्ता पुरुष अचानक मृत्यू पावल्यामुळे पासवान कुटुंबीय मोठ्या संकटात सापडले. पासवान यांच्या पश्चात पत्नी व ९ वीत शिकणारी दोन मुले आहेत. पासवान यांचे इतर विधी गावी (बिहार) करायचे असल्यामुळे व परिस्थिती अत्यंत नाजूक असल्यामुळे गावी जाण्यासाठीही त्यांची आर्थिक बाजू कमकुवत असल्याचे भेटीअंती आपुलकी प्रतिष्ठान सदस्यांच्या निदर्शनास आले. पासवान कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने आपुलकी प्रतिष्ठानच्या ग्रुपवर आवाहन केल्यानंतर सदस्यांनी या कुटुंबाबद्दल आपुलकी दाखवत ४ तासात २६ हजार ४६५ रुपये जमा करून ते मंगळवारी पासवान कुटुंबीयांना दिले. यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, अरविंद डोंबे, श्रीकांत हसबनीस, रमेश गोडसे, अच्युत फुले, दिपक शिनगारे, दादा खडतरे, प्रमोद दौंडे, संजय गोडसे उपस्थित होते.

पासवान कुटुंबियांना आणखीही आर्थिक मदतीची गरज असून ज्यांना कुणाला शक्य आहे त्यांनी रेणुका आदित्य पासवान (फोन पे नं.९५०३८६२५७१) वर मदत करून या गरीब कुटुंबाला या ओढावलेल्या संकटातून बाहेर काढण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन राजेंद्र यादव यांनी केले आहे.

# अक्कलकोट संस्थानचा इतिहास प्रेरणादायी

## डॉ. मंजिरी कुलकर्णी : कर्मवीर मामासाहेब जगदाळे जयंतीनिमित्त व्याख्यान कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ फेब्रुवारी-**

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात अतुलनीय कामगिरी करून मराठ्यांच्या कार्यास लौकिक प्राप्त करून देणाऱ्या अक्कलकोट संस्थानचा इतिहास प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन कन्या महाविद्यालय मिरज येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. मंजिरी कुलकर्णी यांनी केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास विभागाने कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त अक्कलकोट संस्थानचा इतिहास या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. यावेळी समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते. डॉ. कुलकर्णी म्हणाल्या की, छत्रपती शाहू महाराजांची औरंगजेबाच्या कैदेतून मुक्तता झाली. त्यानंतर स्वराज्यात आगमन होताच त्यांनी पारद येथील पहिली लढाई जिंकली या लढाईत सयाजी लोखंडे पाटील शहीद झाले. पहिल्याच लढाई फत्ते झाल्यामुळे सयाजी यांची पुत्र राणोजी त्याचे नामकरण फत्तेसिंह करून त्यास भोसले आडनाव जोडून अक्कलकोटची जहागिरी देण्यात आली. त्यावेळी १०८ गावाची जहागिरी देण्यात आली. त्यावेळी अक्कलकोट परगणा होता. त्याचे उत्पन्न ५५ लाख इतके होते. त्यांनी शाहू महाराजाकडून अनेक मोहीमांमध्ये सहभाग नोंदवला. पुढे अक्कलकोट संस्थानामध्ये फत्तेसिंहराजे भोसले यांची राणी ताराबाई यांनी संस्थान नावारूपास आणले. ते पहिल्या महायुद्धात सहभागी झाले. तर विजयसिंह राजे भोसले यांनी दुसऱ्या महायुद्धात देशाकडून अतुलनीय कामगिरी बजावली. त्यावेळी त्यांनी वापरलेली शस्त्रे आजही अक्कलकोटच्या संग्रहालयात उपलब्ध आहेत. त्यांच्या कारकीर्दीत स्वातंत्र्य चळवळ प्रजा परिषदेने सुरू केली. पुढे विलीनीकरणाच्या कायद्यानुसार अक्कलकोट संस्थान विलीन झाले. मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट संस्थांनचा इतिहास प्रकाशात आल्याने सांगितले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा. डॉ. शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले तर आभार प्रा. मधुबाला लोणारी यांनी मानले.



### अक्कलकोट संस्थानचा इतिहास ग्रंथाचे स्वागत होईल

डॉ. मंजिरी कुलकर्णी यांनी प्रकाशित केलेले अक्कलकोट संस्थानचा इतिहास ग्रंथाचे अक्कलकोटकर मंडळी स्वागत करतील. भविष्यात तो विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

### कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी केले समाज परिवर्तन

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी वंचित, उपेक्षित व बहुजन समाजातील मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणली. त्यामुळे समाज परिवर्तनास गती मिळाली असे मत मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. मान्यवरांनी कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांना अभिवादन केले.

# जाचक अटीत अडकले घरकुल; लाभार्थ्यांमधून संताप

## मंजूर यादीतील घरकुल रद्द न करण्याची मागणी; शासन निर्णयाकडे सगळ्यांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ५ फेब्रुवारी-**

शासनाने ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना पक्के घर मिळावे म्हणून प्रधानमंत्री घरकुल आवास योजना सुरू केली आहे. या अंतर्गत सध्या २०१६ मध्ये सर्व्हे करुन अंतिम यादी तयार करण्यात आली होती. त्याच यादीतील लाभार्थ्यांना प्राधान्य क्रमाने घरकुलांना मंजुरी दिली जात होती. तो सर्व्हे २०१६ चा त्याच यादीतील घरकुले अद्यापही संपलेली नाही किंवा नव्याने त्याचा सर्व्हे ही झालेला नसताना शासनाने ग्रामपंचायत स्तरावर त्या लाभार्थ्यांकडे सध्याची घराची परिस्थिती पाहिली जात आहे.

२०१६ ते आतापर्यंत जवळपास ९ वर्षे झाली आहेत. त्यातील काही लाभार्थ्यांनी पत्र्याची घरे बांधले आहेत. काही लाभार्थ्यांच्या घराची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. यामुळेच त्यांनी आपल्याला लाभ कधी मिळणार? तोपर्यंत रहायचे कशात अशी अडचण झाली होती. सर्व्हे २१०६ चा यादीही तीच. मग पुन्हा जाचक अटी कशासाठी असा प्रश्न लाभार्थ्यांमधून प्रशासनाला विचारला जात असून आम्ही कधीच या योजनेचा लाभच घेतला. मग जाचक अटी कशासाठी एकतर अनेक लाभार्थी जागा नसल्यामुळे घरकुल बांधण्यापासून वंचित आहेत. याबाबत शासनस्तरावर लवकर निर्णय घेतला जात नाही. यामुळे हे सर्वसामान्य लाभार्थी वंचित आहेत. एकीकडे शासन म्हणते ज्यांना जागा नाही, त्यांना जागा उपलब्ध करुन देऊ किंवा पैसे देऊ. पण तेही मिळतच नाही. महाराष्ट्र शासनाने नुकतीच ग्रामीण भागातील नागरिकांसाठी १६ लाख ८१ हजार ५३१ मंजुरी दिली आहे. मात्र ग्रामीण भागात जाचक अटी घालून घरकुले रद्द केली जात आहेत. यामुळे सध्या ग्रामीण भागातील लाभार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. पूर्वीच मंजूर यादीतील घरकुलांना तब्बल ९ वर्षांनी जाचक अटी कशासाठी? यामधील एक घरकुल रद्द करु नये अशी मागणी लाभार्थ्यांमधून होत आहे.

### कैफियत मांडणार

आपण सोलापूरचे पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांना तसेच माळशिरस तालुक्याचे माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्याकडे कैफियत मांडणार असल्याचे कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### मंगळवेढ्यात राष्ट्रीय प्रवासी दिन साजरा

**मंगळवेढा, दि. ५ फेब्रुवारी -**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे प्रत्येक वर्षी रथसप्तमी हा दिवस 'राष्ट्रीय प्रवासी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. मंगळवेढा आगारात राष्ट्रीय प्रवासी दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक संजय भोसले होते. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायत मंगळवेढा शाखेचे अध्यक्ष दत्तात्रय कोरे, सचिव डॉ. शरण बिरादार, सदस्य सिद्धेश्वर माळी, भारत गवळी, रशीद पठाण, विजय मोठगी, स्थानक प्रमुख योगेश गवळी, आगार व्यवस्थापक संजय भोसले, वाहतूक निरीक्षक योगेश गवळी, वरिष्ठ लिपिक परमेश्वर भालेकर, अमोल काळे, उमेश ननवरे, वाहतूक नियंत्रक मंगेश रोहिटे, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण प्रशिक्षणार्थी अभिजीत बंडगर, समर्थ गवळी, ब्रह्मानंद ठाकूर, सचिन रायबाण, राजेंद्र म्हेत्रे, अशोक चव्हाण, भीमराव कदरकर उपस्थित होते. वाहतूक नियंत्रक अशोक चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला.



### दामाजी कारखान्यावर रतनचंद शहा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**मंगळवेढा, दि. ५ फेब्रुवारी-**

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक व्हाईस चेअरमन स्व. रतनचंद शहा शेठजी यांच्या १०५ व्या जयंतीच्या निमीत्ताने दामाजी कारखाना कार्यस्थळावरील पूर्णाकृती पुतळ्यास रतनचंद शहा बँकेचे चेअरमन राहुल शहा यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे संचालक किसन गवळी, चंद्रशेखर कौंडूभैरी, मुझफ९फर काझी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रथमेश पाटील, सागर गुरव, राहुल चौगुले, प्र. कार्यकारी संचालक रमेश जायभाय, चिफ इंजिनिअर सचिन गुंड, शेती अधिकारी कृष्णात ठवरे, चिफ अकौंटंट रमेश गणेशकर, कार्यालयीन अधिक्षक दगडू फटे, आप्पासोा शिनगारे, स्टोअरकिपर उत्तम भूसे, मनोज चेळेकर, संदिप इंगोले, प्रकाश पाटील, लक्ष्मण बेदरे उपस्थित होते.

### हत्तीकणबस गावातील मच्छिंद्र गायकवाड बेपत्ता



**अक्कलकोट, दि. ५ फेब्रुवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील हत्तीकणबस गावातील माजी पोलीस पाटील वयोवृद्ध व्यक्ती मच्छिंद्र मलकप्पा गायकवाड (वय ७६)हे दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता त्यांचा मोठा मुलगा भीमा गायकवाड राहणार मुंबई यांच्याकडे जात आहे असे सांगून मुंबईला गेले आहेत. मच्छिंद्र गायकवाड हे मुंबईला त्यांच्या मुलाकडे गेले नाहीत तसेच ते अद्याप घरी आले नाहीत. या प्रकरणी वयोवृद्ध मच्छिंद्र गायकवाड हे हरवल्याची माहिती अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. सदरील व्यक्ती कोणास आढळल्यास ९८६०७८४७५१, ९१७२१२४३४५, ७०४०४०१९५८, ८६९८८५९६४२ या मोबाईल नंबर वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




### बार्शीतील सुयश विद्यालयात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची जयंती साजरी

**बार्शी, दि. ५ फेब्रुवारी-**

बार्शी येथील सुयश महाविद्यालयामध्ये कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची १२२ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख करत मामांनी समाजासाठी दिलेल्या योगदानाची माहिती संस्थापक श्री. शिवदास नलवडे यांनी विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक शिवदास नलावडे, संचालिका प्रतिभा नलावडे, मुख्याध्यापक सागर मंडलिक, शाहीर,मुंडे, अडगळे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



### श्री वटवृक्ष स्वामी मंदिरात पत्रकार स्वामीराव गायकवाड यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ५ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या राज्य कार्यकारणी सदस्यपदी पत्रकार स्वामीराव गायकवाड यांच्या निवडीबद्दल श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महेश इंगळे यांनी स्वामीराव गायकवाड यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या राज्य कार्यकारणी सदस् पदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी जेष्ठ पत्रकार नंदकुमार जगदाळे, पत्रकार राजेश जगताप, पत्रकार रमेश भंडारी उपस्थित होते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## अकोले खुर्दच्या उपसरपंचपदी द्रोपदा जगताप



**टेंभुर्णी, दि. ५ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील अकोले-खुर्द ग्राम पंचायतच्या उपसरपंचपदी द्रोपदा वामन जगताप यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सरपंच रूपाली कांतीलाल नवले यांच्या अध्यक्षतेखाली निवड झाली.यावेळी ग्रामसेवक बी.ए.दास यांनी ही निवड जाहीर केली.निवड झाल्यानंतर सरपंच रुपाली नवले यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.अकोले-खुर्द ग्रामपंचायतमध्ये पाच वर्षात पाच सदस्यांना उपसरपंचपदी संधी देण्यात आली. यावेळी विकास सेवा सोसायटीचे चेअरमन हरिदास पाटील, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष संभाजी पाटील, संतोष पाटील, दीपक पाटील, रमेश पाटील, महादेव घाडगे, अनिल तोडकर, सचिन पाटील, सुधाकर नवले, प्रताप चिंतामण, भारत नवले,प्रकाश घाडगे, नागेश पाटील, कुबेर महाडिक, रणजीत पाटील, अनिल तोडकर, गजानन तोडकर, तानाजी जगताप, सागर महाडिक, सिद्धेश्वर जगताप, सतीश लिंगे, तानाजी मासुळे, महादेव मासुळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात कर्मवीर जगदाळे मामा यांची जयंती साजरी

**बार्शी, दि. ५ फेब्रुवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात मंगळवार दि. ४ फेब्रुवारी रोजी कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांची १२२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्या हस्ते कर्मवीर मामासाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. गावातून प्रतिमेसह सवाद्य जनजागरण फेरी काढण्यात आली. यामध्ये विविध प्रकारच्या लेझीम, लोकनृत्य, लोकगीत, पथनाट्य, स्वच्छता अभियानविषयक चित्ररथ यांचे प्रात्यक्षिक चौका-चौकातून सादर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये अनेक मान्यवर ग्रामस्थांकडून कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. जनजागरण फेरीमधील विद्यार्थ्यांना चौका-चौकातून पाणी, सरबत, खाऊचे वाटप करण्यात आले. विकास पाटील, महादेव बुरगुटे, संतोष बुरगुटे यांनी विद्यार्थ्यांना मिष्टान्नाचे भोजन दिले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख तवले यांनी केले होते तर महाले यांनी संपूर्ण जनजागरण फेरीचे संचलन केले. लेझीम पथकाला सहशिक्षक डी. डी. राऊत व मकरंद जगदाळे यांनी दिंडीसाठी आर. आर. लंकेश्वर व सोनके यांनी लोकगीत, लोकनृत्यासाठी तवले व डोईफोडे-बुरगुटे यांनी मार्गदर्शन केले होते.



### केडगाव येथे नूतन अधिकाऱ्यांचा सन्मान

**करमाळा, दि.५ फेब्रुवारी-**

केडगाव (ता. करमाळा) येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये यशस्वी झालेल्या नूतन अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. अन्नसुरक्षा अधिकारी रोहित लोकरे यांची मिरवणूक काढून नागरी सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील होते. सपोनि टिळेकर उपस्थित होते. खडकेवाडी तुषार शेळके, प्रथमेश माने व नम्रता मोहिते या नूतन अधिकाऱ्यांची आलिशान गाडीतून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मकाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक दिनकर सरडे, मच्छिंद्र सरडे, पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोकरे, सुनील कापसे, गजेंद्र पोळ, प्रशांत नाईकनवरे, लावंड, श्रीपाल गव्हाणे, शिवाजी बोराडे, बापूसाहेब पवार, दरगुडे उपस्थित होते. सूत्रसंचालन विलास दोलतोडे यांनी केले तर आभार हवालदार रवींद्र लोकरे यांनी मानले.




### यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातर्फे किरण दुरगुडे यांचा सत्कार

**करमाळा, दि. ५ फेब्रुवारी-**

करमाळा शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे वृक्ष लागवडीच्या कार्याबद्दल करमाळा नगरपरिषदेमधील बागमाळी किरण दुरगुडे यांचा सत्कार डॉ. रुपालीताई विक्रांत घुमरे, डॉ. अनिल साळुंखे, प्रा. लक्ष्मण राख यांच्या हस्ते सन्मानपत्र, हार, नारळ देऊन सत्कार करण्यात आला. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या समोरील प्रांगणात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून देखभाल करून तेथील परिसर आनंददायी व सुखावह मनाला आनंद देणारा झाला आहे. त्यांच्या या कार्याची दखल महाविद्यालयाने घेऊन संस्थेचे सचिव विलासराव घुमरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून किरण दुरगुडे यांना सन्मानित करण्यात आले.



### न्यू इरा पब्लिक स्कूलमध्ये महिला, पालक, हळदी-कुंकू समारंभ


**करमाळा, दि. ५ फेब्रुवारी-**

जेऊरच्या न्यू इरा पब्लिक स्कूलच्या वतीने महिला पालक, हळदी- कुंकू समारंभ पार पडला. यावेळी डॉ. शारदा सुभाष सुराणा उपस्थित होते. महिलांनी उखाणे, गाणे, भारुडे, घे भरारी, खेळ रंगला पैठणीचा , संगीत खुर्ची, जोडी जोडीची उठाबशी, फुगा फुगवून त्यावर बसून फोडणे अशा खेळांचा समावेश होता. या स्पर्धेत पूजा बाळू मत्रे (जेऊर) पैठणी, द्वितीय तेजा सर्जेराव कर्चे (जेऊर) गिफ्त हॅमर, तृतीय पूजा औदुंबर रोकडे व चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले तर घाडगे यांनी आभार मानले.

## शिक्षणातून स्वावलंबनाचे धडे द्यावे

### राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे : कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे समाजपरिवर्तन गौरव पुरस्कारांचे वितरण

#### पद्मविभूषण प्रो. रघुनाथ माशेलकर, पद्मविभूषण प्रो. अनिल काकोडकर सन्मानित



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ फेब्रुवारी-**

पुरस्कारार्थींचे कर्तुत्व महान आहे. मामांनी वससतिगृहातून शैक्षणिक कार्य सुरु केले. गावाचा विकास साधण्यात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. सामाजिक सुधारणेत अनेक घटकांचे योगदान गरजेचे आहे. शिक्षणातून आदर-सन्मान करण्याचे संस्कार केले पाहिजेत. समाज व देशाप्रती आत्मियता जोपासली पाहिजे. शिक्षणातून स्वावलंबनाचे धडे दिले पाहिजेत, असे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी सांगितले.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त संस्थेच्यावतीने बुधवारी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे समाजपरिवर्तन गौरव पुरस्कार पद्मविभूषण प्रो. रघुनाथ माशेलकर व पद्वविभूषण प्रो. अनिल काकोडकर यांना राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते देण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

यावेळी माजी आ. राजेंद्र राऊत, संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

अनिल काकोडकर यांनी मामासाहेबांनी शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रात महान कार्य केले आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय केली. समाजाच्या सर्वस्तरावर सुधारणा करण्याचे कार्य केले. तंत्रज्ञानाने साक्षरता निर्माण होते. नवनिर्मिती करता येते. तंत्रज्ञान आत्मसात केल्याने सक्षमता येते. सक्षम नवी पिढी घडविणे गरजेचे आहे. समाजाला पुढे नेणारी व शोषण मुक्त करणारी व्यवस्था निर्माण करावी. तंत्रज्ञान कसे राबवायचे याची स्वायत्तता अबाधित राखा, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांनी स्वागतपर संबोधनात संस्थेचा इतिहास व पुरस्काराची माहिती विशद केली. संस्थेचे जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पुरस्काराच्या सन्मानपत्राचे वाचन व सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले. आभार संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी मानले.

#### शिक्षणगंगा घरोघरी पोहोचविली

मामासाहेबांनी शिक्षणाची गंगा घरोघरी पोहचवली. मामांनी समतेचा विचार मांडला. मामांनी समाज परिवर्तनाचे पवित्र कार्य केले. स्त्री शिक्षण, शेतकरी, आर्थिक स्वावलंबन, अंधश्रद्धा निर्मूलन यावर मामांनी भर दिला. संस्थेने सर्वच क्षेत्रांत प्रगती केली आहे. संस्थेचे स्वतंत्र विद्यापीठ असावे. सध्या शिक्षणाला मर्यादा राहिली नाही. जे तंत्रज्ञान गरिबांसाठी विकसित केले जाते ते महत्वाचे आहे, असे रघुनाथ माशेलकर यांनी यांनी सांगितले.

## बार्शीत विद्यापीठ स्थापन करावे

### डॉ. अशोक चौसाळकर : कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त समाजदिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ फेब्रुवारी-**

मामांची संस्था ही पुरोगामी विचारांची आहे. संस्थेने स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करावे. बार्शीत विद्यापीठ सुरु करावे, असे वाटते. यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षण क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य केले आहे. तोच वारसा जपला जाण्याची गरज आहे. महाराष्ट्र हे आर्थिकदृष्ट्या जगातील सक्षम राज्य आहे. तरीदेखील विकासाच्या प्रक्रियेत अनेक आव्हाने आहेत. प्रचलित शिक्षण पद्धतीत बदल आवश्यक आहेत. ग्रामीण भागात विषमता आहे. मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. शिक्षण संस्थेपुढे अनेक आव्हाने आहेत, असे प्रतिपादन डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी या संस्थेचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त संस्थेच्यावतीने मंगळवारी समाजदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख व विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते. अध्यक्षस्थानी साहित्यिक बाबा भांड उपस्थित होते. यावेळी आ. दिलीप सोपल, माजी आ. राजेंद्र राऊत, संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, डॉ. प्रकाश बुरगुटे, राजेंद्र पवार, डॉ. गुलाबराव पाटील आदी उपस्थित होते.

आ. दिलीप सोपल यांनी संस्थेची सुरुवात बोर्डिंगच्या माध्यमातून झाली. संस्थेची विधायक वाटचाल आहे. मामांनी जोपासलेल्या परंपरा समाजास प्रेरक आहेत. वैद्यकीय सेवा देण्यात संस्था अग्रेसर आहे. संस्थेच्या विविध उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. बाबा भांड यांनी वैचारिक विवेचनातून अध्यक्षीय समारोप केला. यावेळी शहीद जवान ज्ञानेश्वर खाडे व नितीन कोळी यांच्या वीर माता-पिता, वीर पत्नी व वीर सुपुत्र यांचा संस्थेच्यावतीने सन्मान करण्यात आला. संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांनी स्वागतपर संबोधन केले. संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला. अध्यक्षांचा परिचय संस्थेचे खजिनदार जयकुमारबापू शितोळे यांनी करुन दिला. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. पी. एम. लावंड यांनी करुन दिली. डॉ. राहुल पालके लिखित कर्माक्षरे या चरित्रात्मक ग्रंथाचे प्रकाशन झाले. सूत्रसंचालन प्रा. किरण गाढवे व नीता देव यांनी केले. आभार संस्थेचे सहसचिव ए. पी. देबडवार यांनी मानले.



### हुरड्याचा आस्वाद...

सोलापूर : तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांच्या निसर्गाने नटलेल्या शेतात हुरडा पार्टी रंगली. यात माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे, पोलीस उपनिरीक्षक म्हाळप्पा सुरवसे, प्रा. अशोक काजळे, प्रा. एस. आर. पाटील, ॲड. रामण्णा गुरव, मुख्याध्यापक सुधीर सोनकवडे, शिवराज बिराजदार, महेश पट्टणशेट्टी, श्रीशैल बाळीकाई, डॉ. सखाराम आवटे, पत्रकार विठ्ठल आहेरवाडी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग घेऊन हंगाम संपत आलेल्या हुरड्याचा शेवटच्या चरणात आस्वाद घेतला.



### प्रा. राहुल पालके लिखित 'कर्माक्षरे'चे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ फेब्रुवारी-**

डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. अशोक चौसाळकर, विचारवंत, राज्यशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व अध्यक्ष बाबा भांड, साहित्यिक, प्रकाशक, यांच्या हस्ते प्रा. डॉ. राहुल पालके लिखित 'कर्माक्षरे' या पुस्तकाचे प्रकाशन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाप्रसंगी श्री. दिलीप सोपल,आमदार, बार्शी व श्री.राजेंद्र राऊत, माजी आमदार, बार्शी, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय.यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, उपसचिव ए.पी.देबडवार, जयकुमार शितोळे, विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

या पुस्तकाला श्री.जयकुमार शितोळे यांची प्रस्तावना लाभली आहे. डॉ. सी.एस.मोरे, डॉ. सुब्राव जाधव, श्री प्रशांत काळे यांचे अभिप्राय पुस्तकात आहे. 'कर्माक्षरे' या चरित्रात्मक ग्रंथात पालके सरांनी कर्मवीर मामांच्या कार्याचा विविधांगी दृष्टिकोनातून अभ्यास मांडला आहे. त्यांनी मामासाहेबांच्या शैक्षणिक, वसतिगृहाबाबत, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, स्त्रीविषयक, कृषी व पर्यावरणविषयक, मजुरांविषयक, आरोग्यविषयक, नवइतिहासवादी, मानवतवादी, राष्ट्रीय दृष्टिकोनांचा समावेश केला आहे. तसेच त्यांनी कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे स्मृती संग्रहालय व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांच्या या पुस्तक प्रकाशनाबद्दल श्री शिवाजी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. शेख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

## वंचित घटकांच्या विकासात लेखणीची भूमिका महत्त्वाची

### सपोनि मनोज पवार : दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनच्या पुरस्कारांचे वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ५ फेब्रुवारी-**

देशातील वंचित घटक विकास व न्यायापासून वंचित असताना पत्रकारांनी वंचितांच्या व्यथा लेखणीतून मांडल्यामुळे ते विकासाच्या प्रवाहात सामिल होत आहेत, म्हणून वंचित घटकांच्या विकासात पत्रकारांची भूमिका महत्वाची आहे, असे प्रतिपादन मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी केले.

मंद्रुप येथील मळसिध्द मंदिरात दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशन व श्री सिध्देश्वर सामाजिक बहुउद्देशिय संस्थेच्यावतीने आदर्श पत्रकार पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हतुरे होते. यावेळी नायब तहसीलदार जितेंद्र मोरे, तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे, माजी कृषी सभापती अप्पाराव कोरे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिध्द मुगळे, सरपंच अनिता कोरे, उपसरपंच भगवान व्हनमाने, दक्षिण सोलापूर पत्रकार असोसिएशनचे संस्थापक रेवणसिध्द मेंडगुदले, नांदणीचे सरपंच शिवानंद बंडे, संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य जवाहर मोरे, लोकसेवा विद्यामंदिरचे प्राचार्य बसवराज कुमठेकर, बरूरचे प्रगतशील शेतकरी विक्रांत हविनाळे, पशु वैद्यकीय अधिकारी प्रणाली क्षीरसागर, असोसिएशनचे तालुकाध्यक्ष अमोगसिध्द मुंजे आदी उपस्थित होते.

यावेळी कंदलगावचे प्रशांत कडते, ग्रामपंचायत सदस्य शिवपुत्र जोडमोटे, सुरेश टेळे, सूर्यकांत जोडमोटे, यासीन मकानदार, ग्रामपंचायत अधिकारी नागेश जोडमोटे, कृषी सहायक रमेश फरताडे, निलेश हेळकर, महेश मेंडगुदले, शिवराज कालदे, सिध्दाराम काळे, सिध्दलिंग म्हेत्रे, प्रविण कुंभार, रविशंकर म्हेत्रे, अप्पू शिळ्ळे, रमेश वाघमोडे, अनमोल केवटे, राम गोसावी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक अमोगसिध्द मुंजे यांनी केले. सूत्रसंचालन नंदकुमार वारे यांनी केले, तर आनंद बिराजदार यांनी आभार मानले.

#### या पत्रकारांना पुरस्कार प्रदान

दैनिक 'तरूण भारत'चे अमोगसिध्द मुंजे यांच्यासह राजकुमार सारोळे, शिवानंद फुलारी, श्रीकांत हाले, नारायण घंटे यांना आदर्श पत्रकार म्हणून शाल, ट्रॉफी, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

#### सरकारचे सहकार्य हवे

यावेळी मळसिध्द मुगळे म्हणाले की, ग्रामीण पत्रकारांना अडचणींना सामोरे जाऊन पत्रकारीता करावी लागते. आर्थिक अडचणीमुळे अनेक प्रश्न उद्भवत असताना दक्षिणचे पत्रकार सामान्यांच्या न्याय व विकासासाठी लेखणीतून वास्तव मांडत असतात. सरकारने पत्रकारांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन मुगळे यांनी केले.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## दिशा नागरी सहकारी पतसंस्थेत हळदी-कुंकू कार्यक्रम



तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.५ फेब्रुवारी -
दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने दि.४ फ ब्रुवारी रोजी मकरसंक्रांत निमित्त महिलांसाठी हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या नळदुर्ग शाखेचे शाखाप्रमुख उमेश जाधव यांनी दि. ४ फेब्रुवारी रोजी पतसंस्थेच्या कार्यालयात महिलांसाठी हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शहरातील महिला म ोठ्या संख्येने उपस्थित होत्या. पुजा जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमासाठी आलेल्या महिलांना हळदी-कुंकु लावुन वाणाचे साहित्य दिले त्याचबरोबर प्रत्येक महिलेला दिशा नागरी सहकारी पतसंस्थेने काढलेले वार्षिक दिनदर्शिका २०२५ ही भेट देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाखेचे शाखाधिकारी उमेश जाधव, कर्मचारी राहुल जाधव, ओंकार महाबोले यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...



### डॉ.सत्येंद्र राऊत साहित्य निर्माता पुरस्कार

जळकोट, दि.५ फेब्रुवारी -
कला, पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव समिती, महाराष्ट्र राज्य आयोजित माँ तुझे सलाम कर्तव्य संमेलनात समाज, संस्कृतीचे संरक्षण व लोकशाही विचारांना एकत्र आणण्यासाठी आणि जगण्याचे चांगले ध्येय बनवणाऱ्या अशा ऐतिहासिक गुणवत्तेच्या सर्वश्रेष्ठ सन्मान सोहळ्यात अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विभाग प्रमुख प्रा.डॉ.सत्येंद्र राऊत यांना साहित्य निर्माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे, राष्ट्रीय सैनिक संस्थेचे संचालक लायन डॉ.प्रशांत, महाराष्ट्र शासन युवक पुरस्कार विजेते तसेच कला, पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव समितीचे संस्थापक प्रा.डॉ.बी. एन.खरात यांच्या शुभ हस्ते पालघर येथे साहित्य निर्माता राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



### कारखान्यांवर कारवाईची मागणी

तुळजापूर, दि.५ फेब्रुवारी -
जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून, अनेक साखर कारखान्यांकडून ऊस बिलाच्या वेळेवर अदा करण्यास टाळाटाळ केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर शेळके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. एफआरपी कायद्यानुसार, गळीत हंगाम संपल्यानंतर १४ दिवसांच्या आत ऊस बिलाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणे बंधनकारक आहे. मात्र, अनेक खाजगी आणि सहकारी साखर कारखान्यांकडून या नियमांचे उल्लंघन होत असून, शेतकऱ्यांना त्यांचा मेहनतीचा मोबदला मिळत नाही. परिणामी, शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची वेळ येत आहे. शेतकरी हा ऊस उद्योगाचा कणा आहे. पण साखर कारखान्यांकडून त्यांच्या हक्काच्या पैशांसाठीच लढावे लागते, हे दुर्दैवी आहे. जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत बिले तातडीने अदा करावीत, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा श्री. शेळके यांनी दिला आहे.यावेळी सुहास कानडे, विकास घोडके रोहित शेंडगे कृष्णा मोरे उपस्थित होते.



### राष्ट्रीय ब्रेन मास्टर प्रोऍक्टिव्ह पुरस्कार प्रदान

मंगरुळ, दि.५ फेब्रुवारी -
राज्यस्तरीय प्रोऍक्टिव्ह अबॅकस स्पर्धा नुकत्याच कोल्हापूर येथे संपन्न झाल्या असून या स्पर्धेत आशिष साठे यांच्या श्री कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याने ब्रेन मास्टर प्रोऍक्टिव्ह पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. साठे यांचा विद्यार्थी आर्यन शिंदे हा देशातून प्रथम आला आहे. तर इतर दहा विद्यार्थ्यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याने त्यांना हा पुरस्कार देण्यात आला यापूर्वीही श्री कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी अनेक पुरस्कार मिळवून मंगरुळची शैक्षणिक पार्श्वभूमी अधोरेखित केली आहे. आशिष साठे यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून गोरगरीब विद्यार्थ्यांची माफक दरात शिकवणी घेऊन आदर्शवत विद्यार्थी घडवत असल्याने प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरी बोलावून त्यांचा विविध भेट वस्तू देऊन यथोचित सन्मान करण्यात येत आहे. त्यांच्या या यशाबद्दल तुळजापूर तालुक्यातील शिक्षणप्रेमी नागरिकांतुन अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

### उमेदचे वस्तू व खाद्यान्न विक्री प्रदर्शन

धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,जिल्हा ग्राम ीण विकास यंत्रणा,जिल्हा परिषद,धाराशिव यांच्या वतीने जिल्हा मिनी सरस प्रदर्शन ६ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत जिल्हा परिषद कन्या प्रशाला,प्रांगण,धाराशिव येथे सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.या प्रदर्शनात धाराशिव व इतर जिल्हातील ग्रामीण भागातील महिला स्वयं सहाय्यता गटांमार्फत होतकरू महिलांनी तयार केलेल्या विविध प्रकारच्या उत्पादित मालाच्या मराठवाड्यातील आकर्षक वस्तू 'म साले,चटण्या,पापड,लोणचे,येसूर, आवळा कॅन्डी,गृहपयोगी वस्तू, हस्तकला,लाकडी वस्तू,लोकरीच्या वस्तू,शोभेच्या वस्तू,विविध खाद्य खमंग पदार्थ,स्वादिष्ट शाकाहारी व मांसाहारी घरगुती पद्धतीने तयार केलेले गावरान जेवण,दही धपाटे, ईत्यादी वस्तूंचा समावेश प्रदर्शनात राहणार आहे. प्रदर्शनाचा आनंद घ्यावा.असे आवाहन जिल्हा अभियान संचालक तथा जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष व जिल्हा सहअभियान संचालक तथा प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं. विलास जाधव यांनी केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी १२ कोटींचा निधी द्यावा : आ.पाटील

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -



धाराशिव तालुक्यातील मौजे कसबे तडवळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २२ व २३ फेब्रुवारी १९४१ रोजी महार मांग वतनदार परिषद घेतली होती. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्याचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या स्मारकासाठी आवश्यक निधी त्वरित उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्याकडे केली आहे.

आमदार पाटील यांनी सांगितले की, महाराष्ट्र सरकारने राज्यातील २८ ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांची निवड केली आहे.

यामध्ये कसबे तडवळेचा समावेश असूनही जागेच्या अभावामुळे स्मारकाच्या कामाला विलंब होत आहे. हा अडथळा दूर करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पर्यायी जागेचा प्रस्ताव तयार करून तो १६ म हिन्यांपूर्वी सरकारकडे पाठवला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

कसबे तडवळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सार्वजनिक वाचनालय आणि क्रांतीस्तंभ उभारण्याचा प्रस्ताव आहे. हा प्रकल्प जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या जागेवर राबवला जाणार होता. मात्र, शाळेसाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्याने काम रखडले आहे. समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त यांनी १२ ऑक्टोबर २०२२ रोजी गावकऱ्यांसह जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती.

या बैठकीत जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी स्पष्ट केले की, प्राथमिक शाळेसाठी नवीन इमारत बांधल्याशिवाय स्मारकाचे काम सुरू होऊ शकत नाही. त्यामुळे शाळेच्या इमारतीसाठी आणि जागेच्या भूसंपादनासाठी एकूण १२ कोटी ८३ लाख रुपये निधी लागणार आहे.

शाळेच्या नवीन इमारतीसाठी -१० कोटी ८६ लाख रुपये जागेच्या भूसंपादन व नुकसान भरपाईसाठी - १ कोटी ९७ लाख रुपये हा निधी मंजूर करण्यासाठी प्रस्ताव २० ऑक्टोबर २०२३ रोजी शासनाकडे पाठवण्यात आला. मात्र, गेल्या १६ म हिन्यांपासून हा प्रस्ताव प्रलंबित असून त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आमदार कैलास पाटील यांनी सांगितले की, कसबे तडवळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक वास्तव्याला महत्त्व देऊन सरकारने स्मारक उभारणीसाठी तातडीने निधी मंजूर करावा. यासाठी त्यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही शासनाने दखल घेतलेली नाही.

आमदार पाटील यांनी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांची भेट घेत स्मारक प्रकल्पाच्या निधीसाठी त्वरित निर्णय घेण्याची मागणी केली. निधी मि ळाल्यास प्राथमिक शाळेची नवीन इमारत लवकरात लवकर बांधता येईल आणि स्मारकाच्या उभारणीस गती मिळेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या ऐतिहासिक महार मांग वतनदार परिषदेचे ठिकाण म्हणून कसबे तडवळे गावाचे महत्त्व अधिक आहे. त्यामुळे येथे भव्य स्मारक उभारणे आवश्यक आहे. सरकारने तातडीने प्रस्ताव मंजूर करून १२ कोटी ८६ लाख रुपयांचा निधी वितरित करावा, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली आहे.

## सोयाबीन खरेदीसाठी शेतकऱ्यांचा रस्ता रोको



तुळजापूर, दि.५ फेब्रुवारी -
तालुक्यातील महाराष्ट्र शासनाने सोयाबीन ऑनलाईन नोंद झालेली ते सोयाबीन शासनाने दिलेल्या हमीभावात खरेदी न केल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांनी ५ फेब्रुवारी बुधवार रोजी दुपारी जुन्या बसस्टॅन्ड चौकात सोयाबीनने भरलेल्या वाहनासकट रास्ता रोको आंदोलन केले.

तालुक्यातून मोठ्या संख्येने या आंदोलनासाठी आलेल्या शेतकऱ्यांमुळे जुने बस स्टॅन्ड चौक ते गोलाईपर्यंत वाहतूक ठप्प झाली. शेतकऱ्यांनी सरकार विरोध घोषणाबाजी केली. त्यानंतर आंदोलनस्थळी नायब तहसीलदार यांनी भेट दिल्यानंतर शेतकऱ्यांनी त्यांना निवेदन दिले. आंदोलनासाठी तालुका आणि परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## आरोग्याची काळजी घ्या; जीबीएस घाबरू नये : डॉ.कोमल जाधव

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.५ फेब्रुवारी -
सध्या राज्यभरात 'जीबीएस' मुळे नागरिकाम ध्ये चिंतेचे वातावरण आहे. महाराष्ट्रात नवे रुग्ण आढळून येत आहेत. नागरिकांनी काळजी घेतल्यास या आजारापासून बचाव होऊ शकतो. आजार झाल्यानंतरही योग्य उपचार घेतल्यास हा आजार लवकरच बरा होतो. सध्यातरी उमरगा-लोहारा तालुका सुरक्षित असून, या आजाराचा एकही रुग्ण तालुक्यात नाहीफ यामुळे सध्यातरी धोका नाही. मात्र नागरिकांनी दक्षता घेणे गरजेचे आहे.

गुइलेन-बॅरे सिंड्रोम यालाच जीबीएस' म्हणून संबोधले जाते. हा एक ऑटोइम्यून डिसऑर्डर आहे. जिथे शरीराची रोगप्रतिकारक प्रणाली मज्जासंस्थेवर हल्ला करते. शरीरामध्ये अशक्तपणा जाणवतो, स्नायूमध्ये कमकुवतपणा येतो आणि गंभीर आजारांमध्ये अर्धांगवायू होतो. हा आजार वेगाने वाढत असला तरी लक्षणे दिसताच लवकर डॉक्टरांशी संपर्क साधून निदान आणि उपचार घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञ सांगतात. हा आजार सर्व वयोगटातील लोकांना होऊ शकतो. हा आजार संसर्गजन्य नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये.

उमरगा तालुक्यात जीबीएस आजाराच्या लक्षणाचे एकही रुग्ण आढळून आलेले नाही. हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही. पिण्याचे पाणी शुद्ध आहे का नाही याची खात्री करावी, मांसाहारी अन्न टाळावे, शक्यतो शिळे आणि बाहेरचे अन्न खाण्याचे टाळावे, स्वच्छतेबाबत विशेष काळजी घ्यावी.काही त्रास जाणवल्यास तत्काळ आरोग्य केंद्र, डॉक्टरांशी संपर्क साधावा, असे आवाहन वैद्यकिय अधिक्षक डॉ. कोमल जाधव यांनी केले आहे.

## परंड्यात पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -
कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत शिक्षित बेरोजगार आणि नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता शिक्षणमहर्षी गुरुवर्य आर.जी.शिंदे महाविद्यालय, परंडा येथे आयोजित करण्यात आला आहे.

जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर धाराशिव आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र, परंडा यांच्या संयुक्त विद्यमाने या रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे.

या मेळाव्याचा मुख्य उद्देश शिक्षित बेरोजगार आणि नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे.या रोजगार मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर,धाराशिव,बार्शी आणि परंडा येथील १२ खासगी आस्थापना सहभागी होणार असून २१२ रिक्त पदांसाठी उमेदवारांची निवड केली जाणार आहे. त्यामुळे नोकरीच्या शोधात असलेल्या तरुण-तरुणींनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

रोजगाराच्या संधींसोबतच इच्छुक उमेदवारांना विविध शासकीय योजनांची माहिती,कर्ज उपलब्धता तसेच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले जाणार आहे.त्यामुळे नोकरीच्या शोधात असलेल्या तसेच स्वतःचा व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या उम ेदवारांसाठी हा मेळावा अत्यंत फायदेशीर ठरणार आहे.

या रोजगार मेळाव्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे व अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक (०२४७२) २९९४३४ येथे संपर्क साधावा. असे जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र धाराशिवचे सहायक आयुक्त संजय गुरव यांनी कळविले आहे.

## ११२ खाजगी रुग्णालयांची केली तपासणी

धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -
महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी नियम २०२१ अंतर्गत ग्रामीण भागातील नोंदणीकृत ११२ खाजगी रुग्णालयाची तपासणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांचे मार्गदर्शनात नियुक्त केलेल्या पथकाने केली. ग्रामीण भागातील खाजगी रुग्णालय तपासणी मोहिमेत रुग्णालयांची खाजगी व्यावसायिकाकडून नियमांचे काटेकोर पालन होते किंवा नाही याची खातरजमा करण्यात आली. रुग्णालयातील मंजूर खाटा व प्रत्यक्षात असलेल्या खाटा, जैव कचरा व्यवस्थापन प्रमाणपत्र अग्निशाम क प्रमाणपत्र, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र यांची पडताळणी करण्यात आली. ज्या खाजगी रुग्णालयांमध्ये त्रुटी आढळल्या त्या रुग्णालयांना व नोंदणी परवानगीचे नुतनीकरण केले नाही पत्र देण्यात आले.

## मामासाहेब जगदाळे यांना जयंतीनिमित्त अभिवादन



तभा वृत्तसेवा
तेर, दि.५ फेब्रुवारी -
धाराशिव तालुक्यातील तेर येथील महाराष्ट्र संत विद्यालयात दि.४ कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक जनक बेद्रे, सुशीलकुमार पाटील, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष अविनाश पाडोळे, माजी सरपंच नवनाथ नाईकवाडी, पूजा चौहान, पोलीस पाटील फातेमा म नियार, माजी मुख्याध्यापक विश्वनाथ अबदारे, आत्माराम लोमटे, शिवाजी नाईकवाडी, पवन लाकाळ, चंद्रकांत कोळेकर, सतिश बळवंतराव, महेश गोडगे स लक्ष्मण चव्हाण, नवनाथ पसारे, विश्वनाथ धाबेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक जनक बेदरे, पर्यवेक्षक सुशीकुमार पाटील, सतिश बळवंतराव, महेश गोडगे, मारुती कानेकर, लक्ष्मण चव्हाण, संतोष कोळी, सोमनाथ घाडगे,बाळासाहेब कांबळे, रत्नप्रभा साखरे आदींनी परिश्रम घेतले.

## सदस्य नोंदणीचे उत्कृष्ट काम; राठोड यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.५ फेब्रुवारी -
तुळजापुर तालुका भाजपचे सरचिटणीस व भाजपा सदस्य नोंदणी अभियानाचे तालुका संयोजक विलास राठोड यांनी १००० सदस्य नोंदणी केली आहे तर त्यांच्या पत्नी व भाजपा महिला मोर्च्याच्या धाराशिव जिल्हा उपाध्यक्षा रंजना राठोड यांनी ५०० सदस्य नोंदणी करुन सदस्य नोंदणीचे काम उत्कृष्टपणे पार पाडल्याबद्दल आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी त्यांचा सत्कार करून त्यांचा गौरव केला आहे.

विलास राठोड व त्यांच्या पत्नी रंजना राठोड यांनी सदस्य नोंदणीचे काम उत्कृष्टपणे पार पाडल्याबद्द भाजपचे मराठवाड संघटन मंत्री संजय कौडगे, भाजपचे प्रदेश कार्यकारीणी सदस्य नितीन काळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य सदस्यता नोंदणीचे मराठवाडा प्रमुख किरण पाटील व तुळजापुर तालुका अध्यक्ष संतोष बोबडे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## लिंग गुणोत्तर वाढीसाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

### नागरिकांनी पुढाकार घेण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -
जिल्हा बेटी बचाओ,बेटी पढाओ आणि नीती आयोगाच्या कार्यक्रमातर्गत येतो.नीती आयोगाच्या निर्देशांकांपैकी लिंग गुणोत्तर हा महत्त्वाचा घटक आहे. जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर कमी झाल्यास समाजात मुला-मुलींच्या प्रमाणात असमतोल निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जिल्ह्यात आरोग्य विभागामार्फत पीसीपीएनडीटी (पूर्वलिंग निदान प्रतिबंध) व एमटीपी (वैद्यकीय गर्भपात) कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे.

जिल्ह्यात लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी प्रशासनाकडून पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रांची त्रैमासिक तपासणी तसेच क्रॉस तपासणी केली जाते. अवैध गर्भलिंग निदान रोखण्यासाठी डिकॉय केस (गुप्त तपासणी) तंत्राचा वापर केला जात आहे. आतापर्यंत ५ डिकॉय केसेस करण्यात आल्या आहेत.

जिल्हा व तालुकास्तर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली बैठका आयोजित केल्या जातात.मुलींच्या जन्म ाचे प्रमाण वाढवण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत.

मुलींच्या जन्माचे स्वागत करण्यासह जनजागृतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत.तालुकास्तरावर कार्यशाळांचे आयोजन करून नागरिकांना पीसीपीएनडीटी कायद्याची माहिती दिली जात आहे.

अवैध गर्भलिंग निदान किंवा गर्भपाताबाबत तक्रार करा,बक्षीस मिळवा - कोणीही अवैधरित्या गर्भलिंग निदान किंवा गर्भपात करत असल्याची माहिती खालील माध्यमांतून देऊ शकतो : टोल-फ्री क्रमांक १८००२३३४४७५/१०४ किंवा http://amchimulgimaha.in या संकेतस्थळावर माहिती देता येते. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल,तसेच पुराव्यांच्या आधारे गुन्हा दाखल झाल्यास राज्य सरकारतर्फे १ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी यासाठी पुढाकार घेऊन लिंग समानता आणि स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधासाठी आपले योगदान द्यावे,असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. धनंजय चाकूरकर यांनी केले आहे.

## सिलिंगमध्ये मिळालेली जमीन बळकवण्याचा प्रयत्न

**तुळजापूर खुर्द येथील प्रकार... सिलिंग जमीन धारक लाभार्थीच्या वारसांची न्यायासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव...**

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.५ फेब्रुवारी -
सिलिंग जमीन वाटप कायद्यानुसार तुळजापूर खुर्द येथे जमीन सर्वे नंबर १०३/१ मध्ये चार एकर २९ गुंठे जमीन येथील रहिवाशी लक्ष्मण सिताराम कदम यांना मिळाली होती. त्यावर ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. दरम्यान त्यांना अर्धांग वायू झाल्याने शेती पडीक होती व शेताकडे जाणे-येणे बंद झाले होते. याचाच गैरफायदा घेऊन तुळजापूर खुर्द येथील नागनाथ भोजने यांनी लक्ष्मण सिताराम कदम हे ज्या गावचे रहिवासी नाहीत. त्या गावचे म्हणजे शिंदगाव येथील रहिवासी दाखवून बनावट इसार पावती व बनावट दस्त तयार करून तहसील कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना हाताशी धरून संगमताने सातबारा उताऱ्यावर नाव लावली व सदरील जमीन खरेदी केली असा बोभाटा करून जमीनीवर बेकायदेशीर कब्जा केला. सदरील सिलिंग जमीन नेमाकुल करण्यासाठी लक्ष्मण कदम यांनी तहसीलदार यांच्याकडे तक्रार केली आहे. तहसीलदार यांनी नोटीस काढून दोघांचे म्हणणे घेऊन सर्व कागदपत्राच्या मजकुराची पडताळणी करणे तपासणी करणे आवश्यक होते. परंतु तहसीलदार यांनी फक्त भोजने यांनाच नोटीस काढली व त्यानुसार प्रकरण नेमाकूल करण्यास जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवले. असा आरोप कदम यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या तक्रारीत केला आहे.

सदर सिलिंग जमिनीचे तडवळा कॉर्नर येथे अंदाजे पाऊन एकर मध्ये विनापरवानगी एन ऐ लेआउट न करता प्लॉट पाडून विक्री केलेली आहे. मागासवर्गीयांना मिळालेली सिलिंग जमीन संघटितपणे वळवण्याचा हा प्रकार आहे सदर बाब सिलिंग जमीन धारकाचे कायदेशीर वारस शांताराम कदम यांनी तहसीलदार यांना तीन-चार अर्ज देऊन दोघांना नोटीस काढून जागेवर जाऊन पाहणी व पंचनामा करून अहवाल पाठवण्याबाबत अर्ज दिले आहेत परंतु त्याची दखल घेण्यात आली नाही त्यामुळे कदम यांनी जिल्हाधिकारी यांना २३ जानेवारी २०२५ रोजी सविस्तर तक्रार अर्ज केला आहे. या तक्रार अर्ज मध्ये सिलिंग जमीन फसवणूक करून सातबारावर नाव लावून मागासवर्गीयांना सिलिंगमध्ये मिळालेली जमीन बळकवण्याचा हा प्रकार असून सदरील प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी शांताराम कदम यांनी केली आहे.

धाराशिव: शहरात मोटरसायकल चोरीची घटना घडली असून, फिर्यादी प्रविण धनाजी सरवळे (वय २२, रा. जय मल्हार नगर, बाळे, सोलापूर) मोटरसायकल अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

**NA शेतजमीन विकणे आहे**

जळकोट (ता.तुळजापूर) येथील नॅशनल हायवे नं.६५ पासून १०० मीटर अंतरावरील हंगरगा रोडलगत गट नं.४९४ मधील कलेक्टर NA-Lay out झालेली एकूण १ हेक्टर १४ आर शेतजमीन त्वरित विकणे आहे. संपर्क : ९८९०३८०४४९, ८३९०१५२५२५.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेतकऱ्यांना मिळण्यासाठी पाटबंधारे विभागाचे शर्तीचे प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.५ फेब्रुवारी -**
नळदुर्ग बोरी धरणातील पाणी शेतकऱ्यांना शेती पिकासाठी कॅनलद्वारे सोडण्यात आले असून शेतकऱ्यांना सुरळीत पाणी मिळावं. यासाठी प्रशासन युद्ध पातळीवर काम करीत पाटबंधारे अधिकारी व कर्मचारी शर्तीचे प्रयत्न करीत आहेत .

बोगद्यातील अडकलेले चिंध्या पालापाचोळा यंत्राच्या साह्याने युद्ध पातळीवर काढून शेतकऱ्यांना शेती पिकासाठी वेळेत पाणी पोहच करण्यासाठी पाटबंधारे विभागाचे सहाय्यक अभियंता आर.व्ही.टोकलवड, कनिष्ठ अभियंता एस.सी.जगताप, डी. एन. घोंगडे, मोजणीदार, आर.बी.डोईफोडे, ए. डी.डावरे, तुळशीराम मोरेव त्यांच्या टीमने परिश्रम घेतल्यामुळेच २८६ व शहापुर फाट्यास कॅनल द्वारे पाणी उशिरा का होईना सोडण्यात आले.

जवळपास वागदरी शिवारात पाणी पोहचविण्यासाठी अधिकारी व कर्मचारी युध्द पातळीवर काम करीत आहेत . कॅनलच्या काही भागात पाणी तुंबल्याने जेसीबीच्या साह्याने कॅनल दुरुस्ती करीत शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना पाणी पोच करण्यासाठी देखील शर्तीचे प्रयत्न केले जात आहेत. तरी शेतकऱ्यांनी पाणी फॉर्म भरून सहकार्य करावेत. असे आवाहन पाटबंधारे विभाग नळदुर्गचे सहाय्यक अभियंता यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...



**अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त कोळी यांचा सत्कार**

**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**
शिवशंकर ईराप्पा कोळी यांनी त्यांच्या मुलाचे अवयव दान केले होते. अवयव दान म्हणजे एक प्रकारे नवजीवनच आहे. हे अतिशय अनमोल कार्य कोळी यांनी केल्याबद्दल मराठ्यांचे क्रांतीसुर्य अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त छावा संघटनेच्यावतीने त्यांचा पुष्पगुच्छ, शाल व प्रमाणपत्र देऊन यथोचित गौरव दि.५ फेब्रुवारी रोजी करण्यात आला. औसा तालुक्यातील टेंभी येथील मराठ्यांचे क्रांतीसुर्य अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या समाधीस्थळी नानासाहेब जावळे पाटील यांच्या हस्ते कोळी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे पाटील, धाराशिव जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके, औसा तालुका अध्यक्ष बाजीराव एकुरगे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तुळजापूर, दि.५ फेब्रुवारी -**
कोल्हापूर येथे प्रोऍक्टिव्ह अबॅकस नॅशनल कॉम्पिटिशन ३१जानेवारी २०२५ रोजी संपन्न झाली. या स्पर्धेत कळंब येथील ब्रेन मास्टर प्रोऍक्टिव्ह अबॅकस सेंटरच्या माध्यमातून ऑनलाईन अबॅकस शिकणारी इयत्ता ४ थी ची विद्यार्थीनी भक्ती मोहिते हिने अबॅकस स्पर्धेमध्ये लहान गटात भारत देशात ३ रा क्रमांक पटकावला.

# आता रामलिंग होणार मराठवाड्याचे माथेरान

**विस्तृत आराखड्याचे काम सुरु : आमदार राणाजगजितसिंह पाटील**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**
बालाघाट पर्वतरांगांच्या कुशीत वसलेल्या येडशी अभयारण्यातुन नागमोडी वाट काढत पुढे जाणारी नॅरोगेज रेलगाडी, पिसारा फुलवून नाचणारे मोर, धबधब्याचा कर्णमधुर आवाज, कोणाचेही लक्ष वेधून घेणाऱ्या माकडांच्या उड्या, गुरुकुलमध्ये वनौषधींवर सुरू असलेली पारंपरिक प्रक्रिया, त्याच्या जोडीला शंभरहून अधिक वर्ष जुने असलेले दुर्गादेवी हिलस्टेशन आणि मनाला अपूर्व शांतता देणारे श्री क्षेत्र रामलिंग देवस्थान. येडशी अभयारण्य म्हणजे मराठवाड्याचे माथेरानच! अगदी माथेरानच्या धर्तीवर व्यापक स्वरूपात पर्यटनस्थळ म्हणून हा सगळा परिसर विकसित करण्यासाठी, त्यातून रोजगार निर्मिती आणि मोठी अर्थकारणाला चालना मिळावी यासाठी विस्तृत आराखडा तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर धाराशिव शहरापासून अवघ्या २३ किलोमीटर अंतरावर पौराणिक आणि नैसर्गिक दृष्ट्या महत्वपूर्ण असे रामलिंग तीर्थक्षेत्र आहे. येडशी अभयारण्यातील हा परिसर म्हणजे मराठवाड्याचे माथेरान होय. दरवर्षी श्रावणात लाखोंच्या संख्येने भाविक आणि पर्यटक या ठिकाणी येतात.





नजीकच्या काळात या संख्येत मोठी वाढ होत आहे. पर्यटकांची वाढती संख्या ध्यानात घेऊन त्यासाठी अत्यावश्यक असलेल्या सोयी-सुविधा निर्माण करणे, मंदिर परिसराचा व्यापक विकास करणे आणि एक संपन्न हिलस्टेशन म्हणून जगभरातून पर्यटक याठिकाणी यावे यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठीच या सर्व परिसराला पुन्हा एकदा भेट देऊन पाहणी केली असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

राज्यभरात मोठ्या आदराने आणि सन्मानाने येडशी अभयारण्यातील आर्यसमाजच्या गुरुकुलचे आजही नाव घेतले जाते. काही अडचणी आणि असुविधांमुळे आज ते बंद पडण्याचा मार्गावर आहे.

या अभयारण्यात मोठ्या प्रमाणात वनौषधींची झाडे आहेत. त्यापासून गुरुकुलमध्ये पारंपरिक पद्धतीने प्रक्रिया करून औषधी बनवली जात. त्याला देशभरात मोठी मागणी होती. तसेच संस्कृतमधून याठिकाणी निवासी शिक्षण दिले जात पुन्हा नव्याने या सर्व बाबींना पूर्ववत करण्याचा मानस असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नमूद केले.

ऐतिहासिक लातूर-मिरज या नॅरोगेज रेल्वेमार्गावर शंभर वर्षाहून जुने दुर्गादेवी हिलस्टेशन आजही मोठ्या दिमाखात उभे आहे. धुरांच्या रेषा हवेत काढत धावणारी रेलगाडी आणि भोवताली निसर्गाचा अभूतपूर्व अविष्कार निश्चितच पर्यटकांसाठी मोठी पर्वणी ठरणार आहे. १०० वर्षापूर्वीची अनुभूती पर्यटकांना मिळावी यासाठी त्याच पद्धतीने याठिकाणी पुनर्विकास करण्याचे ठरले आहे.

दुर्गादेवी हिलस्टेशनलगत पूर्वी विठ्ठलवाडी नावाचे गाव होते. जुन्या काळात गाव जसे होते अगदी तसेच साकारून याठिकाणी नॅरोगेज जुनी रेलगाडी त्याचे इंजिन आणि जुन्या पद्धतीचे डबे आणून माथेरान प्रमाणे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करून एक रमणीय व अविस्मरणीय पर्यटन केंद्र विकसित करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

अभयारण्यात जंगल सफारी ट्रेल्स, तंबू टाकून राहण्यासाठी ठिकाण, पाणवठे, इथल्या मातीत बारमाही हिरवी आणि तजेलदार राहणारी वृक्षसंपदा, गवताळ भागातील प्राण्यांसाठी सुरक्षित वातावरण, आदी अनुषंगिक कामांचाही या आराखड्यात गंभीरपणे विचार करण्यात येणार आहे. तसेच हे सर्व करीत असताना स्थानिकांचा यात सहभाग महत्वपूर्ण सहभाग राहणार आहे त्यासाठी एक सुकाणू समिती गठीत करण्यात येईल. स्थानिकांसह पर्यटन विकास समितीचे सदस्यही त्यात असतील. यामाध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती आणि या भागातील अर्थकारणाला बळकटी मिळावी यासाठी आपला प्रामाणिक प्रयत्न आहे. जिल्ह्यातील जे महत्वपूर्ण १५ प्रकल्प आपण हाती घेतले आहेत. त्यापैकीच हा एक प्रकल्प असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

## धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बँकेला माजी अध्यक्ष प्रा.सुरेश बिराजदार यांचे मदतीचे आवाहन

**धाराशिव, दि.५ फेब्रुवारी -**
मुंबई येथे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सध्यस्थितीत आर्थिक निधीची अडचण असणाऱ्या वर्धा, बुलढाणा, नागपूर, नाशिक, बीड व उस्मानाबाद या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या

बैठकीसाठी उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक सुरेश बिराजदार यांनी बँकेच्या विविध अडचणी बैठकीत मांडत बँकेला मदतीचे आवाहन केले.

सहकार विभागाचे उपसचिव संतोष पाटील , सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, व्यवस्थापकीय संचालक दिघे व डॉ. माने मुख्य सरव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य, सहकारी बँक मुंबई, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धाराशिव हे उपस्थित होते. धाराशिव बँकेंचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी संजय एम. गायकवाड हे उपस्थित होते. बँकेला सालसन २०१३ पासुन शासनाचे कोणत्याही प्रकारची इतर बँकेसारखी मदत मिळालेली नाही. शासनाकडुन भागभांडवलापोटी साधारण रु.७४.०० कोटीची मागणी केलेली आहे. सदरचा प्रस्ताव हा शासन दरबारी यापूर्वी दाखल केलेला आहे. तो मंजुर करण्यात यावा. अशी मागणी केली. सालसन २०२२ मध्ये स्थापन केलेल्या देवरा समितीने उस्मानाबाद जिल्हा बँकेकडून शासकीय थकहमीवर दिलेल्या कर्जाची १३५ कोटी इतकी रक्कम मान्य केली होती.

## तुळजापूरात विद्युत महामंडळाचा अजब गजब कारभार

**तभा वृत्तसेवा/सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.५ फेब्रुवारी -**
शहरात महावितरण विद्युत महामंडळाचा वस्ती असलेल्या भागात असुविधा आणि वस्ती नसलेल्या भागात सुविधा पुरवल्याने अजब गजब कारभार चव्हट्यावर आल्याचे दिसून येत आहे. तसेच शहरात होणारे महावितरण विद्युत महामंडळाचे कामे निकृष्ट दर्जेचे आणि ठेकेदारांनी अधिकारी कर्मचारी यांच्या संगमताने मनमानी पद्धतीने केल्याचे दिसून येत आहे. येथील

स्मशान भूमि अपसिंगा रोड, वंदे मातरम नगर व शिक्षक कॉलनी रोड, या ठिकाणी विद्युत महामंडळ कार्यालयामार्फत देण्यात आलेला विद्युत पुरवठा या ठिकाणच्या पोलवरील

तारावर बसविण्यात येत असलेले एअर बंच केबल हे जाणीवपूर्वक ज्या ठिकाणी बसविणे आवश्यक होते तसे न करता सदरचे केबल दुसऱ्या ठिकाणी बसवून

जाणीवपूर्वक त्या ठिकाणी सदर एअर बंच केबलची आवश्यकता नसताना तसेच ज्या भागात ग्राहक राहतच नाही त्या ठिकाणी पण विद्युत पुरवठा व पोल तसेच विद्युत वाहिका केलेली असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांनी महावितरणाचे अधीक्षक अभियंता यांच्याकडे केली होती पांढरे यांच्या तक्रारीची दखल घेऊन महावितरण विभागाने त्या अनुषंगाने अतिरिक्त कार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय यांनी कामाची पाहणी केली.



त्यांच्या पाहणीत असे निष्पन्न झाले की, तक्रार केलेल्या सर्व भागांमध्ये म.रा.वि.वि.कंपनी, तर्फे ग्राहकांसाठी देण्यात आलेल्या विद्यूत पुरवठा वाहिनी व त्यावरील ऐअर बंच व केबल दुसऱ्या ठिकाणी बसवील्या बाबत तक्रार अर्ज प्रमाणेच ऐअर बंच केबल बसविले आहे पण जुनी एल. टी लाईन तशीच ठेवलेली आहे . त्यामुळे लाईन वरील वीज चोरीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसत नाही.गरज नसलेल्या ठिकाणी ऐअर बंच केबल बसविल्याचे दिसत आहे .शेवटच्या पोलला ऐअर बंच केबल लटकवत ठेवलेले आहे. एकूण कंपनीच्या नियमाप्रमाणे काम झालेले दिसत नाही. महावितरण विभागाचा ताळमेळ नसल्याचे या अहवालातून दिसून येत आहे वस्ती नसलेल्या ठिकाणी जाणून-बुजून महावितरणाची कामे करण्यात आले तर वस्ती असणाऱ्या ठिकाणी

*** पोलवरील तारावरचे एअर बंच केबल हे जाणीवपूर्वक वस्ती असलेल्या ठिकाणी न बसवता वस्ती नसलेल्या ठिकाणी**
*** ठेकेदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने वस्ती असलेल्या ठिकाणी असुविधा...**
*** महावितरणाच्या निष्काळजीपणामुळे धोकादायक पद्धतीने एअर बॅच केबल लटकवत ठेवल्याने भविष्यात संभाव्य दुर्घटना घडू शकते**

महावितरणाचे कामे झाले नसल्याने या भागातील नागरिकांना विनाकारण विद्युत समस्यांना सामोरे जावे लागते. महावितरण अधिकारी कर्मचारी आणि ठेकेदारांचे एक प्रकारे संगमत आणि आर्थिक लागेबांधे असल्याचे यावरून दिसून येत आहे.

## अकलुज येथील राज्यस्तरीय लावणी स्पर्धेत चोराखळीचे कालिका कला केंद्र प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.५ फेब्रुवारी -**
सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती, यांच्या वतीने शंकरनगर अकलूज येथे (ता.१ व २ फेब्रुवारी ) २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील स्मृती चषक प्रसिद्ध लावणी नृत्य स्पर्धेत कळंब तालुक्यातील चोराखळी येथील कालिका सांस्कृतिक लोककला केंद्राने प्रथम क्रमांक मिळवला.

लावणी ही महाराष्ट्राची जग प्रसिद्ध पारंपरिक लोककला म्हणुन प्रसिद्ध आहे. सध्या डिजिटल युगातही लावणी लोककला जपण्याचं आणि या लावणी लोककलेला केवळ राजाश्रयच नाही तर लोकाश्रयही देण्याचे काम सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील अकलूजच्या सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समितीने केले आहे.




लावणी ही महाराष्ट्राची शान आणि मराठी रसिक मनाचा प्राण मानली जाते.

कालप्रवाहात अविरतपणे २६ वर्षे चाललेल्या लावणीचा प्रवाह थोडासा थांबला होता. तोच प्रवाह अखंडितपणे प्रवाहीत करण्यासाठी कलाकारांच्या व कला रसिकांच्या आग्रहास्तव सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समितीच्या वतीने २०२४ ला पुन्हा प्रताप क्रिडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकलुज येथील सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील स्मृती भवन शंकर नगर येथे चालु करण्यात आली.

१ आणि २ फेब्रुवारीला घेण्यात आलेल्या या प्रसिद्ध लावणी स्पर्धेत राज्यातील दहा कलाकेंद्र सहभागी झाले होते त्यात चोराखळी (ता.कळंब) च्या निर्मला आष्टीकर यांच्या कालिका सांस्कृतिक लोककला केंद्राने प्रथम पारितोषिक पटकावले.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ; आता तालुकास्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही मिळणार लाभ

शिक्षण हे प्रत्येक विद्यार्थ्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक महत्त्वाचे साधन आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण प्राप्त करणे हे अनेकदा मोठे आव्हान असते.या पार्श्वभूमीवर,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ही राज्य सरकारची एक महत्त्वपूर्ण योजना ठरली आहे.आतापर्यंत केवळ जिल्हास्तरावर उपलब्ध असलेली ही योजना आता तालुकास्तरावरही लागू करण्यात येणार आहे.या शासनाच्या या निर्णयामुळे ग्रामीण भागातील गरीब आणि वंचित विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असलेल्या तसेच वसतिगृह प्रवेशासाठी रीतसर अर्ज केलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी इयत्ता ११ वी व १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यवसायिक तसेच बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी विविध स्तरावरील महाविद्यालयात / शिक्षण




संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे,म्हणून भोजन,निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वत : उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केली आहे.

या योजनेंतर्गत शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या तसेच शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी रीतसर अर्ज केलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या नवबौद्ध समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदतीचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. याअंतर्गत महाविद्यालयीन आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि निवासासाठी आवश्यक असणारा खर्च भागवण्यासाठी मदत केली जाते.

शैक्षणिक संधींचा विस्तार-गरीब आणि मागास विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देणे.आर्थिक मदत उपलब्ध करणे निवास,भोजन,शिक्षण साहित्य यासाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे. ड्रॉपआउट कमी करणे - आर्थिक अडचणीमुळे शिक्षण अर्धवट सोडण्याचे प्रमाण कमी करणे.स्वावलंबन वाढवणे - विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळवून रोजगारक्षम बनवणे हा या योजनेचा उद्देश आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ आतापर्यंत जिल्हास्तरावरच उपलब्ध होता.त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याचा पाहिजे तसा फायदा मिळत नव्हता. मात्र,तालुकास्तरावर योजनेंचा विस्तार केल्यामुळे अनेक सकारात्मक परिणाम होणार आहेत. अनेक हुशार विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे मोठ्या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेऊ शकत नाहीत.

तालुकास्तरावर योजना लागू झाल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्वतःच्या तालुक्यातच शासकीय मदतीचा लाभ घेता येईल. शहरात राहण्याचा खर्च मोठा असतो. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते.आता तालुक्यातच स्वाधार योजनेचा लाभ मिळाल्याने विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर शिक्षण पूर्ण करू शकतील.

गावखेड्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रवास किंवा स्थलांतर करावे लागते.परंतु आता स्वाधार योजनेचा तालुकास्तरापर्यंत विस्तार झाल्यामुळे ते आता स्वतःच्या परिसरात राहून उच्च शिक्षण घेऊ शकतील,ज्यामुळे साक्षरतेचे प्रमाणही वाढण्यास मदत होणार आहे. शिक्षणामुळे नोकरीच्या संधी वाढतात.त्यामुळे समाजातील मागास घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यास मदत होईल.शिक्षण घेतलेल्या तरुणांनी स्वयंरोजगार किंवा चांगल्या नोकऱ्या मिळवल्यास संपूर्ण कुटुंबाचा आणि समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल.

**स्वाधार योजनेअंतर्गत मिळणारे फायदे**

तालुकास्तरावर लागू झाल्यानंतर योजनेचे फायदे अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतील.

या योजनेंतर्गत खालील प्रकारची आर्थिक मदत दिली जाते निवास आणि भोजन खर्च - ज्यांना वसतिगृह मिळाले नाही अशा विद्यार्थ्यांना दरमहा ठराविक आर्थिक मदत.शिक्षण साहित्य आणि फी - पुस्तके,स्टेशनरी, महाविद्यालयीन फी यासाठी आर्थिक सहाय्य.व्यावसायिक शिक्षणासाठी मदत - अभियांत्रिकी, वैद्यकीय,फार्मसी,लॉ,एमबीए यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागणाऱ्या खर्चासाठी विशेष अनुदान.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा तालुकास्तरावर विस्तार हा शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीसारखा आहे.यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठी मदत मिळेल, शिक्षणसंख्येत वाढ होईल आणि आर्थिक प्रगतीलाही चालना मिळेल.

महाराष्ट्र सरकारचा हा निर्णय स्वागतार्ह असून, योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणार असल्यामुळे भविष्यात अनेक विद्यार्थ्यांचे जीवन सकारात्मकपणे बदलू शकते.

**योजनेंतर्गत लाखोंचा निधी वितरित**

जिल्ह्यातील स्वाधार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना दरवर्षी मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य दिले जात आहे.सन २०१८-१९ मध्ये ५७८ अर्जांपैकी ४२४ पात्र ठरले होते आणि २३ लक्ष ५८ लाख रुपये वाटप झाले.त्यानंतर, २०१९-२० मध्ये ८५८ अर्जांपैकी ६२७ लाभार्थ्यांना ८४ लक्ष २९ लाख रुपये वितरित झाले. २०२०-२१ मध्ये ८४९ पात्र अर्जदारांना १ कोटी ९८ लाख रुपये मिळाले.२०२१-२२ मध्ये १२७१ पैकी १०७५ विद्यार्थ्यांना १ कोटी २६ लाख रुपयांचा लाभ मिळाला. २०२२-२३ मध्ये १०५६ अर्जांपैकी ८९२ पात्र ठरले,आणि ३ कोटी ४३ लाख ५३ हजार रुपये निधी वाटप झाला. २०२३-२४ मध्ये अर्जांची संख्या वाढून १३०३ झाली असून, १०५६ विद्यार्थ्यांना १० कोटी १५ लाख ७४ हजार रुपये मिळाले. त्यामुळे या योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होण्यास मदत झाली आहे.

**-संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालयें**
**धाराशिव**

## संक्षिप्त वृत्त

### डॉ.विनय पाटील होणार एम.एस. जनरल सर्जन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ फेब्रुवारी**



माजलगाव येथील भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा सिद्धीविनायक अर्बनचे अध्यक्ष डॉ.प्रशांत पाटील यांचा मोठा मुलगा डॉ विनय पाटील यांचा एमबीबीएस च्या शिक्षणानंतर एम एस जनरल सर्जरी साठी रामा मेडिकल कॉलेज पिलकुवा हापूर एनसीआर दिल्ली येथे नंबर लागला आहे.

त्या बद्दल डॉक्टर विनय प्रशांतराव पाटील यांचे राजकीय, वैद्यकीय, सहकार, शिक्षण, कृषी, उद्योग, पत्रकारिता, क्रीडा, रोटरी अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांना पुढील उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे.

### माजलगावमध्ये भव्यदिव्य मूकनायक सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ फेब्रुवारी**

राज्याला आदर्श निर्माण करुन देईल असा, मूकनायक पुरस्कार सोहळा दरवर्षी आयोजित केला जातो. त्या अनुषंगाने निर्भिड पत्रकार संघ माजलगावकडून शहरातील वैष्णव मंगल कार्यालय येथे गुरुवार (ता.६) रोजी दुपारी १२ वाजता भव्यदिव्य मूकनायक पुरस्कार वितरण सोहळा साजरा केला जात आहे.या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन निर्भिड पत्रकार संघाचे माजलगाव तालुका अध्यक्ष बाळासाहेब आडागळे यांच्यासह पत्रकार संघाने केले आहे.

मूकनायक पुरस्कार वितरण सोहळस उदघाटक म्हणून आ.सुरेश धस, विशेषतः उपस्थिती रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर, तसेच अध्यक्ष म्हणून आ.प्रकाश सोळंके असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून खा.बजरंग सोनवणे,आ.संदिप क्षीरसागर,आ.विजयराजे पंडित,मोहन जगताप,बाबुराव पोटभरे,बदामराव पंडित, अशोक डक, ऑल इंडिया पँथर सेनेचे दिपक केदार, धर्मवीर प्रतिष्ठानचे बाजीराव चव्हाण,प्रशांत दैठणकर, मिलिंद ,सुनिता मलवारी,लोकपत्रकार भागवत तावरे,संग्राम धन्वे, सुनिल डोंगरे आदींची उपस्थिती असणार आहे.

माजलगाव शहरात सपन्न होत असलेला भव्यदिव्य मूकनायक पुरस्कार वितरण सोहळा यंदा अतिशय व्यपाक प्रमाणात साजरा केला जातो आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक नावाचे वृत्तपत्र ३१ जानेवारी १९२० साली सुरु केले होते. त्याला आज १०५ वर्ष पूर्ण झाले आहेत. तत्कालीन व्यवस्थेने बहुजन वर्गाला त्यांच्या मानवी अधिकारापासून दूर ठेवण्याचे काम केले. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक नावाचे वृत्तपत्र सुरु करुन मुक्याना बोलके केले. हाच तो पत्रकारितेचा खरा काळ उदयास आला जिथे समानतेची बीजे रोवली गेली. या ऐतिहासिक घटना नव्या पिढीला माहीत राहाव्यात यासाठी निर्भिड पत्रकार संघ माजलगावकडून मूकनायक सोहळा आयोजित केला जातो आहे. या कार्यक्रमाला मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन निर्भींड पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब आडागळे.यांनी केले आहे.

यांचा होणार पुरस्कार देवून सन्मान

दैनिक जय महाभारतचे संपादक विजयकुमार वाव्हळ, साप्ताहिक गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे, दैनिक वास्तव चे उपसंपादक अरविंद ओव्हाळ, विजय दादा साळवे, मा. कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा.सभापती संभाजी शेजुळ, डॉ. दीपक कोडगिरकर, शिवाज्ञा क्लोजिंग क्लासेस चे, जीवन नखाते, रघुप्रयाग पतसंस्थेचे चेअरमन सागर खुर्पे, मुख्याध्यापक किशोर मोताळे, नवनाथ गिलबिले, सरपंच भागवत शेजुळ, ग्रामसेवक आनंदकुमार सिरसट, अँड, अजित जगताप, तलाठी प्रमोद चव्हाण, पिके उद्योग समूहाचे पद्माकर कांबळे, नगरसेवक शरद यादव , पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीराम नरवडे, महसूल सेविका कौशल्याताई लोखंडे, एकतेखार जकीबाबा सोशल फाउंडेशनचे शेख शोकत यांना हा पुरस्कार प्रदान होणार आहे.

भव्य दिव्य मूकनायक पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन, निर्भींड पत्रकार संघटनेचे, अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे, शेख हमीद, राजरतन डोंगरे, सिद्धेश्वर गायकवाड, संतोष रासवे, विजय कापसे, अनिकेत विलेगावकर, विजय डावरे, दिगंबर गिरी, प्रदीप कुलकर्णी, प्रचंड सोळंके, मुंजा गाडेकर, रामभाऊ यादव, गणेश तौर, तेजस शिंदे, दत्ता जाधव, रंजीत आडागळे यांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले.आहे

# अनुदान,पिकविमा व कर्जमाफी कधी ?

## शेती प्रश्नावर किसान सभेचा सवाल

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.५ फेब्रुवारी**

शेती प्रश्नावर किसान सभेकडून जिल्हाधिकारी कार्यलयासमोर करण्यात आलेल्या निदर्शनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत किसान सभेच्या शिष्टमंडळाने अतिवृष्टी अनुदान, सोयाबीन कापूस सानुग्रह अनुदान व कर्जमाफी आदी प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेतली यावेळी यावेळी केवायसी केलेल्या शेतकऱ्यांना लवकरच त्यांच्या खात्यात अनुदान प्राप्त होईल व ज्यांची केवायसी होऊ शकलेली नाही, अथवा केवायसी च्या यादीत ज्यांचे नाव येऊ शकलेले नाही, आशां शेतकऱ्यांसाठी गाव स्तरावर लवकरच कॅम्पचे आयोजन करण्यात येईल व संबंधित शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात येतील असे आश्वासन जिल्हा प्रशासनाने शिष्टमंडळाला दिले.

शेती प्रश्नावर किसान सभेने दि २७ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर जोरदार निदर्शने आंदोलन केली या निदर्शनाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी मंगळवार दि ४ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती हॉलमध्ये सायंकाळी ५ वा. बैठक पार पडली. यावेळी किसान सभेच्या शिष्टमंडळाने अतिवृष्टी अनुदान व सोयाबीन कापूस सानुग्रह अनुदान यापासून वंचित शेतकऱ्यांचा प्रश्न जिल्हा कृषी अधीक्षक यांच्यासमोर उपस्थित केला. यावेळी केवायसी केलेल्या शेतकऱ्यांना लवकरच त्यांच्या खात्यात अनुदान प्राप्त होईल व ज्यांची केवायसी होऊ शकलेली नाही, अथवा केवायसी च्या यादीत ज्यांचे नाव येऊ शकलेले नाही, आशां शेतकऱ्यांसाठी गाव स्तरावर लवकरच कॅम्पचे आयोजन करण्यात येईल व संबंधित शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात येतील असे आश्वासित करण्यात आले.

यावर्षी पिके वाढीच्या विविध टप्प्यात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले होते. त्या अनुषंगाने पिक विमा धारक शेतकऱ्यांनी आपल्या पीक नुकसानीच्या तक्रारी रीतसर पिक विमा कंपनीकडे केलेल्या आहेत. विमाप्रावधनानुसार ज्यावेळेस व्यापक नुकसान होऊन या नुकसानीच्या २५ टक्के पेक्षा जास्त तक्रारी पीकविमा कंपणीकडे दाखल होतात त्यावेळी तातडीचा दिलासा म्हणून २५% पीक विमा ग्रीम देणे कंपनीला बंधनकारक असते. मात्र अजूनही पिक विमा कंपनीने हे पैसे दिलेले नाहीत. शिवाय तक्रारी संदर्भात प्रक्रिया पूर्ण होऊन शेतकऱ्यांना संबंधित नुकसानाचे विम्याचे पैसे खात्यावर जमा होणे अपेक्षित असताना हे पैसे का मिळाले नाहीत? हा प्रश्न किसान सभेचे जिल्हाध्यक्ष अजय बुरांडे यांनी उपस्थित केला असता पिक विमा प्रतिनिधींनी आम्हाला शासनाकडून मिळणारा हप्ता आला नाही, त्यामुळे कंपनीने पैसे दिले नाहीत. ज्यावेळेस शासनाकडून पैसे येतील त्यावेळेस आम्ही शेतकऱ्यांना हे विम्याचे पैसे देऊ अशी भूमिका मांडली. यात जिल्हाधिकाऱ्यांनी हस्तक्षेपकरत शेतकऱ्यांनी कंपनीशी करार केलेला आहे, शेतकऱ्याचा विमा क्लेम जर मंजूर असेल तर विमा कंपनीने शेतकऱ्यांना पैसे देणे बंधनकारक आहे. यात उगाच आपण शासनाला बदनाम करू नये. जर आपली हीच भूमिका असेल तर आम्ही तुमच्यावर कारवाई करू असा दम भरला. एकंदर या पार्श्वभूमीवर पिक विमा मिळणे आणखी किती दिवस रखडणार हा प्रश्न शिष्टमंडळाने उपस्थित केला. त्यावर विमा कंपनीकडून समाधानकारक उत्तर मिळू शकले नाही. या प्रश्नी तीव्र संघर्ष अटळ असल्याची भूमिका किसानसभेने मांडली. किफायतशीर हमीभाव, कर्जमाफी व शक्तिपीठ महामार्ग स्थगिती हे धोरणात्मक मुद्दे असून आम्ही शासनपर्यंत आमच्यामार्फत आपल्या मागण्या पोहचवू असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

सोयाबीन खरेदीच्या मुद्द्यावर शासनाने ०६ फेब्रुवारी पर्यंत खरेदीस दिलेली मुदतवाढ पुरैशी नसल्याचे चर्चेतून निदर्शनास आले. बीड जिल्ह्यातील ४४ हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी सोयाबीन खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी केलेली आहे. नोंदणी केल्या पैकी १८ हजार शेतकऱ्यांचेच सोयाबीन मुदतीपर्यंत खरेदी होईल. म्हणून उर्वरित शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी होणे शक्य नसल्याचे पुढे आले. याला आणखी मुदत वाढीची आवश्यकता आहे. याशिवाय साठवणीसाठीचे वेअर हाऊस उपलब्ध नसणे, जिल्हा बाहेरील वेअर हाऊस पर्यंत पोहोचण्याचा वाहतूक खर्च, तेथील वाहन खाली होण्यासाठी होणारा वेळ, वाहन होल्डिंग चार्ज इत्यादी समस्या असल्याच्या बाबीही चर्चेतून समोर आल्या. सोयाबीन खरेदीचा प्रश्न गंभीर असल्याचे एकंदर निदर्शनास आले. एकतर सर्व सोयाबीन हमीभावाने खरेदी करा नसता बाजार भाव व हमीभाव यातील भावांतर शासनाने अनुदान देऊन पूर्ण करा. या पार्श्वभूमीवर किसान सभा आपला लढा आणखीन तीव्र करण्याची भूमिका किसान सभेच्या प्रतिनिधी मंडळांनी मांडली.

शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटप करत असताना बँक प्रोसेसिंग फी च्या नावाखाली मोठी रक्कम वसूल करते याशिवाय इन्स्पेक्शन चार्ज व इतर चार्जेस च्या नावाखाली खात्यातून आपोआप रक्कम काढते यामुळे शेतकऱ्यांना नाहक बुर्दंड सोसावा लागत आहे. तो बंद झाला पाहिजे ही भूमिका मांडली यावर जिल्हाधिकाऱ्यांनी यातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी लवकरच बँकांशी स्वतंत्र मीटिंग बोलवण्याचे आश्वासित केले. तसेच पीएम किसान, विविध अनुदाने व पिक विमा यांचे पैसे हे खाते होल्ड केल्यामुळे रोखले जाऊ शकत नाहीत असे नोटीस सुद्धा काढण्यार आसल्याचे सांगितले.या बैठकीसाठी बीड जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, जिल्हा मार्केटिंग अधिकारी व जिल्हा पिकविमा कंपनी प्रतिनिधी यांच्यासह किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. अजय बुरांडे, कॉ. दत्ता डाके, कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ भगवान बडे, कॉ. ब्रम्हानंद देशमुख, कॉ.बालाजी कडभाने, कॉ. सय्यद रजाक, खुर्शीदभाई, व जगन्नाथ घाळे, सिद्राम सोळंके हे शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

## सूर्यनमस्कार म्हणजे सर्वांगसुंदर व्यायाम ; दत्तात्रय इटके सर



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.५ फेब्रुवारी**

सूर्यनमस्कार म्हणजे शरीराचा सर्वांगसुंदर व्यायाम आहे. प्रत्येक व्यक्तीने फक्त सूर्यनमस्कार केले तर कुठलाही व्यायाम करण्याची गरज नाही असे प्रतिपादन जागतिक सूर्यनमस्कार दिनी दत्तात्रय इटके सर यांनी केले.

रथसप्तमी हा दिवस जागतिक सूर्यनमस्कार दिन म्हणून साजरा करण्यात येत असतो. या निमित्ताने स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत असलेल्या हनुमान व्यायाम शाळेतर्फे मंगळवार, दिनांक ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना इटके सर यांनी व्यायामाचे महत्व मानवी शरिरासाठी आवश्यक असल्याचे सांगितले. प्रत्येकाने वेळ मिळेल तेव्हा व्यायाम केला पाहिजे. शरीरासाठी सूर्यनमस्कार हा परिपूर्ण व्यायाम आहे. सूर्यनमस्कार केला तर इतर कुठलाही व्यायाम करण्याची गरज नाही. या सूर्यनमस्कार स्पर्धेत ४५ स्पर्धकांनी सहभाग घेतला.मोठा गट प्रथम क्रमांक सुदर्शन लिखे , द्वितीय पवन साळुंके तरलहान गठ प्रथम रोहन बागवाले दुतीय पवन मुंडे तृतीय क्रमांक निशांत स्वामी

यांनी पटकावला. विजयी स्पर्धकांना पुष्प गुच्छ व रोख रकम देऊन गौरविण्यात आले

या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून श्री योगशिक्षक सुभाष नाणेकर सर व विजय मुंडे सर सुवर्णपदक विजेता सोमेंद्र शास्त्री नरसिंग देशमुख शिवशंकर कराड माजी नगरसेवक महादेव इटके, वैजनाथ इटके दिगंबर नागराळे. यांची उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने स्पर्धक व नागरिक उपस्थित होते

## विद्यार्थ्यांनी जीवनाची दिशा निश्चित करून ध्येयाकडे वाटचाल करावी – व्यंकटराव रेड्डी

### विद्यार्थी वार्षिक स्नेह संमेलन बक्षीस वितरण समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ फेब्रुवारी**

विद्यार्थ्यांनी स्वतःतील गुण, क्षमता आणि कमतरता ओळखून जीवनाची दिशा निश्चित करून ध्येयाकडे वाटचाल करावी असे विचार लोकमान्य टिळक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व्यंकटराव रेड्डी यांनी व्यक्त केले.



दि.०५ फेब्रुवारी २०२५ बुधवार रोजी पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात संपन्न झालेल्या 'विद्यार्थी वार्षिक स्नेह संमेलन बक्षीस वितरण' कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना रेड्डी म्हणाले की,शाळेने केलेल्या संस्कारांचा उपयोग करून आपण सातत्य,मनन, चिंतन यातून ध्येय प्राप्ती कडे वाटचाल करावी जेणेकरून आपल्या प्रगतीचा मार्ग सुकर होईल.संमेलनाच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांमध्ये धाडस,निर्भयता आणि आत्मविश्वास निर्माण होतो. यातुन विद्यार्थ्यांची खरी जडण-घडण होते.विद्यार्थ्यांनी भावी काळाचे योग्य नियोजन करत आई,वडील आणि गुरुजनांचे स्वप्न पूर्ण करावे असे विचार शेवटी त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते आणि संमेलन प्रमुख ज्ञानेश मातेकर उपस्थित होते.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविकात संमेलन प्रमुख ज्ञानेश मातेकर यांनी विविध मंडळांतर्गत स्नेह संमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या वैशिष्ट्य पूर्ण स्पर्धेची माहिती दिली.

अध्यक्षीय समारोपात संजय विभूते यांनी बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे कौतुक करत भविष्यात विद्यार्थ्यांनी समाज आणि राष्ट्राच्या विकासासाठी आपल्यातील कलागुणांचा वापर करावा असे प्रतिपादन केले.या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी सर्व मान्यवरांच्या हस्ते वार्षिक स्नेह संमेलनातील विविध स्पर्धेतील यशवंत आणि नागपूर येथील एकलव्य स्पर्धा परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. अतिशय उत्साहात संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू तेलंगे,वैयक्तिक पद्य कु.नेहा वाघमारे तर आभार प्रदर्शन राकेश मोरे यांनी केले.कार्यक्रमाची सांगता शांतिमंत्राने करण्यात आली.कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी, शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.

## रेल्वे पुलांचा विषय आ.संदीप क्षीरसागरांनी रेल्वे सुरक्षा आयुक्तांसमोर मांडला

### बीड मतदारसंघात ब्रीज नसलेल्या ठिकाणी वाहतुकीस अडचण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ फेब्रुवारी**

बीड मतदारसंघातील काही ठिकाणी रेल्वे ब्रीज नसल्यामुळे वाहतुकीस अडचण होत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू आहे. दरम्यान बुधवारी (दि.५) रोजी बीड रेल्वेची हाय स्पीड टेस्ट करण्यासाठी रेल्वेचे सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा आले असता त्यांच्यासमोर आ.संदीप क्षीरसागर यांनी हा विषय मांडला.



बीड मतदारसंघातील क्षेत्रांतर्गत शिरूर कासार तालुक्यातील हिवरसिंगा, बरगवाडी, जवळागिरी तसेच बीड तालुक्यातील चर्हाटा येथे जाण्यासाठी रेल्वे पूल करण्यात आला नाही. त्यामुळे या गावांमध्ये वाहतुकीस मोठी अडचण होत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. शासन आणि प्रशासनाकडे याविषयी आ.क्षीरसागर यांनी अनेकवेळा पत्रव्यवहार आणि बैठका घेतल्या आहेत. यावेळीही, अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाची जलदगती चाचणी करण्यासाठी पुणे विभागाचे रेल्वे वाहतूक सुरक्षा आयुक्त मनोज अरेरा यांच्यासह रेल्वे प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आले असता आ.संदीप क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांची भेट घेऊन रेल्वे पुलांचा विषय त्यांच्यासमोर मांडला. तसेच रेल्वे विभागाने याबाबतचा सविस्तर प्रस्ताव याप्रकरणी तोडगा काढण्यासाठी कार्यवाही करण्याची मागणी केली. याप्रसंगी खा.बजरंग सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष गणेश वरेकर आदी उपस्थित होते.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत राकॉचे श्रीहरी काळे यांचा जागीच मृत्यू

### खरात आडगाव फाट्यावरील घटना

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ फेब्रुवारी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे प्रदेश सचिव श्रीहरी शिवाजीराव काळे (वय ४८ वर्ष)यांचा अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत जागिच मृत्यू झाला.ही घटना सोमवार दि ३ रोजी राष्ट्रीय महामार्गावर खरात आडगाव फाटा येथे रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत समजलेली माहिती अशी की,श्रीहरी काळे व डॉ भगवान सरवदे हे दोघे नातेवाईकाच्या लग्न कार्यक्रमास मोटारसायकल वरून परभणीला गेले होते. लग्नकार्य उरकुन ते सायंकाळी परभणी कडून माजलगावकडे मोटार सायकलवर राष्ट्रीय महामार्ग कल्याण विशाखापट्टणम वरून येत होते.माजलगाव शहरा नजीक असणाऱ्या खरात आडगाव फाटा येथे चहापाणी घेण्यासाठी त्यांनी रात्री ७ वाजण्याच्या दरम्यान गाडी थांबवली.यावेळी त्यांच्या सोबत असणारे डॉ.सरवदे हे मोटार सायकलच्या एका बाजूने उतरले. तर दुसऱ्या बाजूने श्रीहरी काळे उतरत होते.याच दरम्यान भरधाव वेगात असणाऱ्या अज्ञात चार चाकी वाहनाने श्रीहरी काळे यांना जोराची धडक दिली.या धडकेत काळे यांचा जागीच मृत्यू झाला.तर दुसऱ्या बाजूने मोटारसायकल वरून उतरणारे डॉ.सरवदे हे सुखरूप आहेत.दरम्यान अपघात करणारी गाडी पसार झाली असून श्रीहरी काळे यांचे शवविच्छेदन ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले.मंगळवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.पुढील तपास माजलगाव ग्रामीण पोलीस करत आहेत.

## तुळजाभवानी अर्बनचा सामाजिक बांधिलकीचा वसा

### चंद्रकांत शेजुळ यांच्या वाढदिवसानिमित्त ५४ रक्तदात्यांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ फेब्रुवारी**

सहकार क्षेत्रातील मानबिंदू असलेल्या तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत शेजुळ यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकीचा वसा घेत रक्तदान शिबीर घेण्यात आले. या रक्तदान शिबीरात तब्बल ५४ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजासमोर आदर्श प्रस्थापित केला.



सहकार क्षेत्रातील अव्वल असलेल्या तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ यांचा सोमवार, दि.३ फेब्रुवारी रोजी वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला. दरवर्षी वाढदिवसाच्या निमित्ताने चंद्रकांत शेजुळ यांचे समर्थक आणि संस्थेचे कर्मचारी विविध समाजोपयोगी उपक्रम राबवितात. यंदाही रक्तदान शिबिरातून 'चला रक्ताचे नाते जोडूया..' हा संदेश दिला. तब्बल ५४ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजासमोर नवा आदर्श प्रस्थापित केला. या आदर्शवत कार्याचे कौतुक केले जात आहे. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटच्या सर्व कर्मचारी, अधिकारी यांनी अथक परिश्रम घेतले.

वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची गरज : चंद्रकांत शेजुळ

तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यासाठी संस्थेचे ग्राहक, अधिकारी, कर्मचारी, समर्थक, आणि चाहत्यांची अक्षरशः रीघ लागली होती. यावेळी बोलताना चंद्रकांत शेजुळ म्हणाले, सार्वजनिक जीवनात काम करत असताना आपण समाजाचे काही तरी देणेकरी लागतो, या भावनेतून काम करणारे आम्ही आहोत. वाढदिवसाच्या निमित्ताने प्रत्येकाने समाजोपयोगी उपक्रम राबविणे ही काळची गरज आहे.

## आनंद नगरीत जि. प. सादोळा शाळेच्या विद्यार्थ्यांनी केले डिजिटल ट्रांजेक्शन (क्यूआर कोड) चा वापर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ फेब्रुवारी**

परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सादोळा शाळेमध्ये आनंददायी शनिवार निमित्त आनंद नगरी मध्ये खाऊ गल्लीचे आयोजन केले होते त्याला गावातील नागरिकांनी प्रचंड उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शाळेतील विद्यार्थ्यांनी खमंग ढोकळा, हलवा, भेळ, पाणीपुरी ,इडली सांबर बोरकुट, पापड, हरभरा उसळ ,लिंबू शरबत ,पाणी बॉटल ,पौष्टिक कचोरी, वडापाव ,समोसा इत्यादी पदार्थांचे स्टॉल लावले होते हे सर्व पदार्थ पौष्टिक हेल्दी आणि उत्कृष्ट क्वालिटीच्या तेलामधून तळलेले होते त्यामुळे ते आरोग्यास पौष्टिक होते तसेच या समयी सर्व विद्यार्थ्यांना बौद्धिक खेळ, व्यावसायिक प्रशिक्षण मिळाले तसेच विद्यार्थ्यांनी या व्यवहारासाठी डिजिटल ट्रांजेक्शन ,क्यू आर कोडचा वापर केला त्यामुळे एक वेगळाच अनुभव विद्यार्थ्यांना या व्यावसायिक खेळ प्रशिक्षणानिमित्त आला यासाठी सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ शिंनगारे, सांस्कृतिक विभाग प्रमुख पुरुषोत्तम काठुळे ,राधाकृष्ण मुंडे , प्रमोद काळे ,तेजसकुमार बनसोडे ,गणेश गायकवाड , श्रीमती अनिता लांडगे मॅडम ,श्रीमती सविता पिल्लेवाड मॅडम, श्रीमती राजश्री गोरे यांनी मार्गदर्शन केले.

आनंददायी शनिवार निमित्त आनंद नगरी मध्ये खाऊ गल्ली कार्यक्रमचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद शिंदे, सुनील खंडागळे, विकास नीलकंठ, अशोक राऊत, डॉ. अरुण साळुंके , पवनराव सोळंके, बाळासाहेब सोळंके, शालेय व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष रामप्रसादजी सोळंके ,सतीश राव सोळंके ,गौतमराव सोळंके , किशोर एरंडे ,अशोकराव सोळंके तसेच गावातील शिक्षण प्रेमी नागरिक व पालकांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे कौतुक केले. त्याबद्दल सर्वांचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले अशा उत्सवाच्या आनंदाच्या वातावरणात आनंद नगरीला गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे प्रचंड प्रतिसाद मिळाला.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी संघटनेचे रविवारी अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
महाराष्ट्र राज्य स्वतंत्र बहुजन वीज कर्मचारी संघटनेचे रविवार दि. ९ रोजी शहरातील राहिचंद्र मंगल कार्यालय याठिकाणी अधिवेशन संपन्न होणार असून यासाठी राज्यभरातून वीज कंपनीचे कर्मचारी सहभागी होणार असल्याची माहिती केंद्रीय उपाध्यक्ष तथा संयोजक प्रमोद कांबळे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्य स्वतंत्र बहुजन विज कर्मचारी संघटनेचे २ रे राज्यव्यापी व्दिवार्षिक अधिवेशन रविवारी राहिचंद मंगल कार्यालय, लातूर येथे तथा मराठवाडा विभागातील महत्वपुर्ण विषयावर अधिवेशन होणार असून यावेळी राज्यभरातून मोठ्या संख्येने विज कर्मचारी सहभागी होणार आहेत. वीज वितरण कंपनीचे कामगारांच्या विविध प्रश्नांना हात घालणार आहेत. संघटनेचे केंद्रिय अध्यक्ष सिध्दार्थ लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन संपन्न होणार असून उद्घाटन सेवानिवृत्त आयएएस अधिकारी ई. झेड. खोब्रागडे, प्रथम मार्गदर्शन सत्रात प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ कामगार नेते शामदादा गायकवाड, जेष्ठ पत्रकार तथा विचारवंत राजु परूळेकर, प्रसिध्द अभिनेता व व्याख्याता किरण माने हे उपस्थित राहणार आहेत.

या राज्यव्यापी एकदिवशीय व्दिवार्षिक अधिवेशनामध्ये विज कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसोबत एकूणच भारतीय कामगार चळवळीचा आढावा घेण्यात येणार असून कामगार चळवळीची भविष्यातील दिशा स्पष्ट होण्याच्या दृष्टीकोणातून चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चा सत्रामध्ये ई. एस.खोब्रागडे हे संविधान अंमलबजावणीतील अडथळे व उपाय, शामदादा गायकवाड श्रमिकांची चळवळ आणि डॉ. बाबासाहेबांची भुमिका या विषयावर तर राजु परूळेकर हेही मार्गदर्शन करणार आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात वाचन पंधरवडा साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
नुकतेच महाराष्ट्र शासनातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम राबविण्या संदर्भात आवाहन करण्यात आले होते. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा साजरा करण्यात आला.

या पंधरवड्यात महाविद्यालयांमध्ये ग्रंथ प्रदर्शन तसेच सामूहिक वाचन यासारखे उपक्रम राबवण्यात आले. सामूहिक वाचनामध्ये विद्यार्थ्यांनी अधिकाधिक पुस्तके वाचून त्यावर भाष्यही केले. या पंधरवड्यात जास्तीत जास्त उपस्थिती असलेल्या चार विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे प्रमाणपत्र व पुस्तक बक्षीस म्हणून देण्यात आले. यामध्ये चि. प्रमोद सरवदे, चि. सुरज भदाडे, कु. मीरा सदानंदे आणि कु वैभवी पाटील या विद्यार्थ्यांनी हे पारितोषिक मिळवले. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य वीरभद्र बाळे, प्रा. श्रीकांत तांदळे, डॉ.सुरज दामरे तसेच ग्रंथपाल बी.बी.खोबरे यांनी त्यांचे स्वागत व अभिनंदन केले तसेच वाचनाची सवय जोपासण्यासाठी प्रोत्साहन ही दिले.

## विश्व मराठी संमेलनात लातूरच्या बालकलाकारांचे जोरदार सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
महाराष्ट्र शासनाच्यावतीने ३ रे विश्व मराठी संमेलन पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. यात जगभरातून मराठी माणसे सहभागी झाली होती. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार, आमदारांसह अनेक विशेष निमंत्रित मान्यवर साहित्यिक, कलाकार, युट्युबर्स व भाषाप्रेमी विविध सत्रामध्ये मंचावर सहभागी होते.तीन दिवस चाललेल्या या संमेलनात एक सत्र बालरंगभूमी परिषदेसाठी देण्यात आले होते.

त्यात वरील दिग्गजांच्या रांगेत लातूरचे २५ बाल तबलावादक सहभागी झाले होते. असा सामूहिक तबला वादनाचा अनोखा अनुभव पुणेकरांनी पहिल्यांदाच घेतला. ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प द्वारा संचलित,ज्ञानप्रकाश संगीत विद्यालयाचा हा उपक्रम होता. श्री मयूर येणगे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या त्यांच्या शिष्यानी पुण्यात विश्व मराठी संमेलनात लातूरचा झेंडा दिमाखात रोवला आहे. लातूरच्या या कलाकारांना बालरंगभूमी परिषदेच्या महाराष्ट्राच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के व उपाध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्या प्रयत्नातून ही संधी मिळाली आणि मिळालेल्या संधीचं मुलांनी सोनं केलं. या प्रसंगी सिने अभिनेते प्रविण तरडे, भाषा विभागाचे संचालक डॉ. शंकांत देवरे यांनी तबला वादनानंतर स्वतःहून मुलांशी संवाद साधला. त्यांचं कौतुक केलं. या उपक्रमासाठी येणगे यांना सागर कोळी, अतुल जाधव, जीवन पांचाळ, अमोल शिंदे यांनी सहकार्य केले. या उपक्रमाचे सर्वदूर कौतुक होत असून ज्ञानप्रकाशचे सतीश नरहरे, मुख्याध्यापिका सविता नरहरे, अशोक गुरधाळे, वनिता गोजमगुंडे, बालरंगभूमी परिषद लातूर शाखेच्या अध्यक्षा सुमती सोमवंशी, मयूर राजापुरे, प्रा. नवलाजी जाधव, सौ. हिरा वेदपाठक, सुवर्णा बुरांडे, रवी आघाव, रणजित आचार्य, ॲड. बालाजी म्हेत्रे यांनी अभिनंदन केले आहे.

## फरकाची रक्कम मिळण्यासाठी मनपासमोर आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
लातूर शहर महानगरपालिकेच्या सर्व कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी, मृत कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम १ जानेवारी २०१६ पासून थकीत आहे.

ती रक्कम मिळत नसल्याने कामगार संघटना आक्रमक झाली असून, १० फेब्रुवारीला मनपाच्या दारात पायरी आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र मुस्लीम मेहत्तर सफाई कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सज्जाद शेख यांनी मंगळवारी दिली. राज्य शासनाने ७ वा वेतन आयोग लागू केल्यावर सर्व कर्मचाऱ्यांना वाढ करण्यात आली; परंतु १ जानेवारी १०१६ पासून जी काही त्यांची वेतन आयोगातील फरकाची रक्कम आहे, ती अद्याप देण्यात आलेली नाही. ती रक्कम तत्काळ देण्याची मागणी मनपा आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

## शिक्षकांनी आदर्श नागरिक घडविण्यासाठी योगदान द्यावे

### आ. विक्रम काळे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
शिक्षण हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शिक्षण आणि ज्ञान केवळ वैयक्तिक विकासासाठी आवश्यक नाही, तर अर्थव्यवस्थेच्या विकासासाठीही आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना उद्याच्या भारताचा आदर्श नागरिक घडविण्यात योगदान द्यावे, असे आवाहन आमदार विक्रम काळे यांनी केले.

येथील तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाचे उडान-२०२५ वार्षिक स्नेहसंमेलन स्व. दगडोजीराव देशमुख सभागृहात पार पडले, त्यावेळी उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता



शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार सौदागर तांदळे, प्रा. राजकुमार जाधव, प्रा. अंकुश नाडे, प्रा. राजकुमार मगर उपस्थित होते. मंचावर तुळजाभवानी शैक्षणिक संकुलाच्या सचिव के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, राजेंद्र जायेभाये, सोनिया जायेभाये, तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य जी. आर. मुंडे, तुळजाभवानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांची उपस्थिती होती.

शिक्षण हे खूप महत्त्वपूर्ण आहे. शिक्षण हे लोकांना योग्य दिशा दाखवते, त्यांना विकसित करते. ते काम या संकुलात होत आहे, ही बाब स्तुत्य असल्याचे तहसीलदार तांदळे म्हणाले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य केंद्रे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कलागुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संकुलात 'के. जी. टू पी. जी.' पर्यंत शिक्षणाची सोय आहे. या विद्यालयाचा गतवर्षीचा दहावीचा निकाल ९८ टक्के लागला आहे. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमात या शाळेला तालुकास्तरावरील तृतीय पुरस्कार मिळाला आहे, असे सांगितले.

प्रास्ताविकात मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांची शाळेचा चढता शैक्षणिक आलेख उपस्थितांसमोर मांडला. यावेळी विद्यार्थ्यांनी समूह नृत्य, एकांकिका व विविध देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळविल्या. विविध स्पर्धेतील खेळाडूंचे कौतुक करण्यात आले.

यावेळी आमदार विक्रम काळे यांना ट्रॉफी, पुष्पगुच्छ व शाल देऊन शिक्षण क्षेत्रातील विशेष सेवा योगदान व उपक्रमशीलता मराठवाडा भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## सरपंच देशमुख यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
लातूर तालुक्यातील खाडगाव ग्रामपंचायतीचे सरपंच ॲड. नेताजी देशमुख यांनी अल्पावधित गावात विविध विकासकामे करुन ग्राम विकास साधला आणि गावात रमाई व प्रधानमंत्री आवास योजनेची कामे एक मॉडेल म्हणून विकसित केली आहेत.

यासह सामाजिक, आरोग्य व शिक्षण आदी कामांची दखल घेऊन सोशल टिम लातूरतर्फे सरपंच नेजाती देशमुख यांना सर्वोत्तम राज्यस्तरीय ग्रामभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सूर्यकांत नागलगावे, आदींसह सोशल टिमचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## वीज खंडीत केलेल्या ग्राहकांना अभय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
वीजबिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजनेचा लाभ घेत जानेवारी अखेर पर्यंत लातर परिमंडळातील ७ हजार २०१ वीजग्राहकांनी लाभ घेतला आहे.

या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे ३१ मार्च अखेर पर्यंत देण्यात आलेल्या वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले आहे. राज्यातील महावितरणच्या ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू केली होती. योजनेचा कालावधी ३० नोव्हेंबर रोजी संपला होता, तो वाढवून सदर योजनेस ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.

## अपयश ही यशाची पहिली पायरी आहेः भातलवंडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ रोजी स्नेहसंमेलनानिमित्त बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. सर्वप्रथम मंचावरील मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीमाता व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री विष्णू सोनवणे, प्रमुख पाहुणे पोलीस उप-अधीक्षक गृह, लातूर, श्री. गजानन भातलवंडे, शालेय समिती अध्यक्ष श्री गंगाधर खेडकर, शालेय समिती सदस्य श्री नरेंद्र पाठक,



प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक महेश कस्तुरे, स्नेहसंमेलन प्रमुख धनंजय कुलकर्णी, सहप्रमुख श्री जितेंद्र जोशी, विद्यार्थी प्रतिनिधी कु. श्रावणी ईश्वरशेट्टे, चि. सार्थक जहागिरदार, माजी शिक्षक श्री विलास स्वामी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे पोलिस उप- अधीक्षक गजानन भातलवंडे यांनी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था व श्री केशवराज विद्यालयाच्या उज्ज्वल परंपरेचे भरभरून कौतुक केले. बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांचे आणि त्यांना घडविणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

अपयश ही यशाची पायरी आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी खचून न जाता आपला आत्मविश्वास वाढवावा, असे आवाहन केले. तसेच 'नाराज दाजीबा','पुन्हा एकदा' या स्वरचित कविता सादर करून, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. अध्यक्षीय समारोपात विष्णू सोनवणे यांनी ऑलिंपिक स्पर्धेतील खेळाडू आणि माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करणारी अरुणिमा सिन्हा यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. तसेच त्यांच्यामधील आत्मविश्वास, जिद्द, उत्साह हा गुण विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जितेंद्र जोशी यांनी केले. स्वागत,परिचय व आभार प्रदर्शन आणि सूत्रसंचालन प्रदीप कटके यांनी केले. बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांचे वाचन श्री प्रयागराज गरूड यांनी केले. सामूहिक कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## जागतिक कर्करोग दिनानिमित्त बाभळगावात जनजागृती शिबिर



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
जागतिक कर्करोग दिन कर्करोगा बाबत जागृती निर्माण करण्यासाठी मानला जातो. यानिमीत्ताने विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या वतीने जागतिक कर्करोग दिनाच्या निमित्ताने बाभळगाव येथे कर्करोग जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले, या शिबिरात डॉ. सुरेखा काळे (स्त्रीरोग तज्ज्ञ) यांनी कर्करोग बाबत जागृती करण्यासाठी सखोल असे मार्गदर्शन केले.

ट्वेंटीवन ग्रीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बाभळगाव येथे मंगळवार दि. ४ फेब्रुवारी रोजी कर्करोग जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात आज असंसर्गजन्य आजारामुळे होणारे मृत्यू वाढले आहेत. यामध्ये जास्त म्हणजे सरासरी ६३ टक्के मृत्यू हे असंसर्गजन्य रोगांमुळे होतात. त्यापैकी कॅन्सरमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण नऊ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर, कॅन्सर प्रतिबंधासाठी जागृती व्हावी म्हणून कर्करोग जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मुखाच्या, स्तनांच्या आणि गर्भाशयाच्या कॅन्सरचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे कॅन्सरसंदर्भात जनजागृती होणे गरजेचे आहे. यासाठी शिबिरात डॉ. सुरेखा काळे (स्त्रीरोग तज्ज्ञ) यांनी कर्करोग होण्याची कारणे काय आहेत, कर्करोग टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.

## बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात जागतिक सूर्य नमस्कार दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात जागतिक सूर्य नमस्कार दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डिप्लोमाचे प्रभारी प्रमुख प्रा. सुरज बिराजदार, तसेच प्रा. दहिटनकर , प्रा. महाजन तर अध्यक्ष स्थानी डॉ. एन.एम.हलगरे उपस्थित होते. योगशिक्षीका प्रा. सुवर्णा आर्य यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत विद्यार्थ्यांना सूर्य नमस्काराचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर कु.रोशनी जयशेट्टे हिने सर्व विद्यार्थिनींच्या वतीने मनोगत व्यक्त केले. तद्नंतर प्रा. डॉ. हलगरे यांनी आपल्या ओघवत्या भाषेत आणि मार्मिक शब्दांत आजवरच्या उत्स्फूर्त कार्याचा आढावा घेत विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले.

तद्नंतर विद्यार्थिनींनी सूर्य नमस्काराचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक वृंद आणि मोठ्या प्रमाणात विद्यार्थिनी उपस्थित होत्या. आभार प्रदर्शन कु. शिवानी चेमेले हिने केले. प्रार्थनेने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी अनेकजण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेची राज्यस्तरीय बैठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
गंजगोलाई हे लातूरचे ऐतिहासिक वैभव असून गंजगोलाईला जोडणारे रस्ते आणि परिसराच्या सुशोभिकरणाला निधी उपलब्ध करून देण्यात येईल. या कामाचा सविस्तर आराखडा सादर करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिल्या.

जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ च्या राज्यस्तरीय बैठकीत ते बोलत होते. लातूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या मंजूर नियतव्ययापेक्षा अधिक निधी देण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या या बैठकीला पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार संजय बनसोडे, जिल्ह्याच्या पालक सचिव मनीषा म्हैसकर यांच्यासह जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांच्यासह कार्यान्वयीन यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

गंजगोलाईकडे जाणारे रस्ते आणि परिसराचे सुशोभीकरण करताना या वास्तूचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेवून त्यानुसार आराखडा तयार करावा. या आराखड्यात समाविष्ट कामे गंजगोलाईचे ऐतिहासिक स्थान अधोरेखित करणारी, या वास्तूला साजेशी आणि दर्जेदार होतील, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री ना. पवार यांनी केल्या. लातूर शहर आणि शहराच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ राहण्यासाठी तातडीने उपाययोजना हाती घ्याव्यात. समन्वयाने काम करून शहर स्वच्छ राहील, यासाठी प्रयत्न करावेत. तसेच नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### चांगल्या सुविधा पुरविण्याला प्राधान्य देण्याच्या सूचना

जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाकडून गर्भवती महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या 'बाळंतविडा' उपक्रमाचाही उपमुख्यमंत्री ना. पवार यांनी यावेळी माहिती घेतली. तसेच उपक्रम चांगला असून पात्र आणि गरजू महिलांना चांगल्या दर्जाच्या वस्तू, साहित्य यामाध्यमातून उपलब्ध होईल, याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

लातूर जिल्ह्यात विद्युत रोहित्र वारंवार नादुरुस्त होत असल्याच्या तक्रारी आहेत. विद्युत भार वाढल्याने नादुरुस्तीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे या रोहीत्रांची क्षमता वाढविण्यासाठी निधीची गरज आहे. यासोबतच ऐतिहासिक वारसा असलेल्या गंजगोलाई परिसरातील रस्ते विकास आणि सुशोभीकरणासाठी निधी मिळावा, अशी मागणी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी यावेळी केली. वाढीव निधी मिळाल्यास 'बाळंतविडा' कीटमध्येही आणखी काही वस्तूंचा समावेश करता येईल, असे शेवटी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

## महत्वाकांक्षी योजनांच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ फेब्रुवारी -**
प्रधानमंत्री आवास योजना व इतर सर्व आवास योजना, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, आभा कार्ड वितरण आणि गडकिल्ले स्वच्छता या योजनांच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी जिल्ह्यात ५ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी दरम्यान पंचसूत्री विशेष पंधरवडा राबविला जाणार आहे. सर्व संबंधित यंत्रणांनी या कालावधीत कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून त्यानुसार कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, नगरविकास विभागाचे जिल्हा सहआयुक्त मंगेश शिंदे, ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाचे डॉ. कलमे, डॉ. बालाजी गोरे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

प्रधानमंत्री आवास योजनेसह इतर सर्व आवास योजनेतून जिल्ह्यात मंजूर करण्यात आलेली घरकुले पूर्ण करण्यासाठी विशेष पंधरवडा कालावधीत पाठपुरावा होणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण भागात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि शहरी भागात महानगरपालिका व नगरविकास विभागाने १५ दिवसांचा कृती आराखडा तयार करावा. त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना द्याव्यात. तसेच प्रत्यक्ष फिल्डवर काम करणारे अधिकारी, कर्मचारी यांचा नियमित आढावा घ्यावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.



आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेतील लाभार्थ्यांना आरोग्य कार्डचे वितरण करण्यासाठी पंधरवडा कालावधीत विशेष मोहीम राबवावी. शहरी व ग्रामीण भागातील कार्ड वितरणासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. या कामासाठी इतरही विभागांची मदत घेवून २० फेब्रुवारीपर्यंत अधिकाधिक नागरिकांना या कार्डचे वितरण होईल, यासाठी आरोग्य विभागाने सूक्ष्म नियोजन करावे, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. यासोबतच आभा कार्ड वितरणासाठी शासकीय कार्यालयांमध्येही विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

जल जीवन मिशनची अपूर्ण कामे पूर्ण करणे, जिल्ह्यातील गडकिल्ल्यांची स्वच्छता करून त्याठिकाणी मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी ५ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत विशेष प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या. आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कार्ड तयार करण्यासाठी मोहीम स्वरुपात काम करणे आवश्यक आहे. ग्रामीण व शहरी भागात अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती यांची मदत घेवून प्रत्येक पात्र कुटुंबांचे कार्ड तयार करून त्यांना वितरीत करण्यासाठी नियोजन करावे. या कार्यवाहीचा सातत्याने आढावा घेतला जाईल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर म्हणाले.